दैनिक **अजिंक्य भारत** — बातम्यांचा गतिमान पाठलाग

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

www.ajinkyabharat.com | अकोला । गुरुवार, दि. १ मे २०२५ | वर्ष : १९ अंक : ६१ | पाने : ८ + ४ | स्वागत मूल्य ३ रुपये

### अजिंक्य भारत
#### उद्या अंक नाही

गुरुवार, दि. १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिन तथा जागतिक कामगार दिनानिमित्त दै. अजिंक्य भारत कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे शुक्रवार दि. २ मे, २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार आणि एजंट यांनी कृपया नोंद घ्यावी. - संपादक

# न्यायमूर्ती भूषण गवई देशाचे ५२ वे सरन्यायाधीश!

**नवी दिल्ली, दि. ३०** वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी नियुक्ती केली. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयाने त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे ५१ वे सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ मे २०२५ रोजी निवृत्त होत आहेत. त्यांच्यानंतर ५२ वे सरन्यायाधीश म्हणून मुळचे महाराष्ट्रातील असणारे न्यायमूर्ती भूषण गवई १४ मे रोजी सरन्यायाधीशपदाची शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यांना शपथ देतील.

विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी १६ एप्रिल रोजी केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे न्यायमूर्ती बी. आर. गवईंच्या नावाची पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची नियुक्ती वरिष्ठतेच्या आधारावर केली जाते. सध्या सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश खन्ना



यांच्यानंतर न्यायमूर्ती गवई सर्वात वरिष्ठ आहेत. त्यामुळे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती गवई यांची पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. न्यायमूर्ती गवई २४ मे २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश आहेत.

### न्यायमूर्ती गवईंचे महत्त्वाचे निर्णय

- डिसेंबर २०२३ मध्ये जम्मू आणि काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणाऱ्या कलम ३७० च्या तरतुदी रद्द करण्याच्या केंद्राच्या निर्णयाला मान्यता देणाऱ्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाचा न्यायमूर्ती गवई हे भाग होते.
- राजकीय निधीसाठी निवडणूक रोखे योजना रद्द करणाऱ्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाचा ते भाग होते.
- केंद्राच्या २०१६ च्या नोटाबंदीच्या निर्णयाला ४:१ बहुमताने मान्यता देणाऱ्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाचा भाग होते.
- राज्यांना अनुसूचित जातींमध्ये उप-वर्गीकरण करण्याचा घटनात्मक अधिकार आहे, असा निर्णय देणाऱ्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाचे देखील भाग होते.
- न्यायमूर्ती गवई हे पर्यावरणविषयक बाबींवरील ग्रीन बेंचचेही नेतृत्व करत आहेत. जंगले आणि झाडे बेकायदेशीरपणे तोडण्याबाबत त्यांनी अनेक कठोर आणि मोठे निर्णय दिले आहेत.



### तापमान °C
#### विदर्भात आज

| जिल्हा | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | 45.0 | 29.3 |
| चंद्रपूर | 44.2 | 00.0 |
| ब्रम्हपूरी | 42.9 | 22.5 |
| अमरावती | 44.0 | 25.9 |
| वर्धा | 42.4 | 00.0 |
| नागपूर | 41.6 | 24.2 |
| यवतमाळ | 41.6 | 25.0 |
| गडचिरोली | 40.2 | 23.4 |
| वाशिम | 42.4 | 00.0 |
| भंडारा | 39.6 | 23.0 |
| गोंदिया | 37.4 | 22.4 |
| बुलढाणा | 41.1 | 25.8 |

# मोदी सरकार करणार जातनिहाय जनगणना
## केंद्रीय मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली, दि. ३०** वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आगामी राष्ट्रीय जनगणनेत जातनिहाय जगणनेचा समावेश करण्यास बुधवारी (दि.३) मंजुरी दिली. ''कॅबिनेट कमिटी ऑन पॉलिटिकल अफेअर्सने आज निर्णय घेतला आहे की आगामी राष्ट्रीय जनगणनेत जातनिहाय गणनेचा समावेश करावा,'' असे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

राष्ट्रीय जनगणनेत जातनिहाय जनगणनेचा समावेश करण्याच्या निर्णयाबाबत माहिती देताना मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, ''काँग्रेस सरकारांनी नेहमीच जातनिहाय जनगणनेला विरोध केला. २०१० मध्ये, दिवंगत पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग म्हणाले होते की जातनिहाय जनगणनेचा मुद्दा मंत्रिमंडळात विचारात घेतला पाहिजे. या विषयावर विचारविनिमय करण्यासाठी मंत्र्यांचा एक गट स्थापन करण्यात आला होता. बहुतांश राजकीय पक्षांनी जातनिहाय जनगणनेची शिफारस केली आहे. असे असताना काँग्रेस सरकारने जातनिहाय सर्वेक्षण अथवा जातीय अथवा जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. पण काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी जातनिहाय जनगणनेच्या मुद्याचा केवळ राजकीय कारणासाठी वापर केला. काही राज्यांनी याबाबत चांगले केले आहे, तर काही राज्यांनी अशा प्रकारचे सर्वेक्षण केवळ राजकीय दृष्टिकोनातून अपारदर्शक पद्धतीने केले. अशा सर्वेक्षणांमुळे समाजात अनेक शंका निर्माण झाल्या. राजकारणामुळे आपल्या सामाजिक रचनेवर परिणाम होऊ नये म्हणून, सर्वेक्षणांऐवजी राष्ट्रीय जनगणनेत जातनिहाय जनगणनेचा **(पान २ वर)**

### जातनिहाय जनगणनेचे महत्त्व

- ओबीसींची अचूक संख्या जाणून घेणे
- सामाजिक आणि आर्थिक धोरणांची अचूक आखणी करणे
- आरक्षणाच्या गरजा आणि वितरण यांचा फेरआढावा
- वंचित घटकांचा विकास प्रभावीपणे साधणे



## जातनिहाय जनगणनेचा निर्णय निवडणुकीच्या तोंडावरच का?

**नागपूर, दि. ३०** वृत्तसंस्था

देशात जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने आज (दि.३०) घेतला. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ही मागणी सातत्याने केली होती. मात्र, फक्त बिहार निवडणुकीपुरतीच ही घोषणा नसावी, असे काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

ज्यांची जितकी संख्या त्यांची तितकी हिस्सेदारी या भूमिकेतून काँग्रेसची ही मागणी होती. सत्ताधाऱ्यांनी याला आधी विरोध केला होता. पण आज तडकाफडकी निर्णय झाला. उद्या बिहारची निवडणूक होऊ घातली आहे. म्हणून तर ही घोषणा नसावी.



ओबीसी समाज त्यांच्या हक्कापासून वंचित होता. जातीनिहाय जनगणना झाल्यावर तो हक्क मिळू शकेल. याकडेही वडेट्टीवार यांनी आवर्जून माध्यमांशी बोलताना लक्ष वेधले.

**फुले चित्रपट टॅक्स फ्री करा :** दरम्यान, महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित फुले चित्रपट हा टॅक्स फ्री करा, अशीही मागणी वडेट्टीवार यांनी आज राज्य सरकारकडे केली आहे.

### थोडक्यात

#### खून खटल्यामध्ये १२ जणांना जन्मठेप!

**बारामती :** दौंड येथील एका खून खटल्यामध्ये बारामतीच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाने बाराजणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. यामध्ये चार सख्या भावांसह तीन महिलांचा समावेश आहे. बारामतीत जिल्हा सत्र न्यायालय स्थापन झाल्यापासून अधिक जणांना जन्मठेप सुनावण्याचा हा पहिलाच खटला आहे. संजीत जयप्रकाश टाक, सुजीत जयप्रकाश टाक, रवी जयप्रकाश टाक, रणजित जयप्रकाश टाक, आकाश उर्फ छोटू दिपक बेहोत, नरेश प्रकाश वाल्मिकी, बबलू हिरामण सरवान, सुरेश हिरालाल सरवान, मयुरी संजीत टाक, माधुरी संजीत टाक, शोभा किशोर वाल्मिकी व विकी नरेश वाल्मिकी अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत. दौंड येथे ३ मे २०१८ रोजी ही घटना घडली होती.

# राज्यात पुन्हा उष्ण लहरी तीव्र
## अकोला ४४.६ : पुणे ४२.२ अंशांवर

**पुणे, दि. ३०** वृत्तसंस्था

राज्यातील उष्ण लहरी पुन्हा तीव्र होण्यास सुरुवात झाली असून मंगळवारी (दि.२९) अकोला ४४.६ तर पुणे शहरातील लोहगाव आणि कोरेगावचे तापमान ४२ अंशांवर गेले होते. राज्यातील सर्वच जिल्हा भट्टीप्रमाणे तापला असून यंदाचा उन्हाळा असह्य ठरला आहे.

यंदाचा एप्रिल आजवरच्या अनेक उन्हाळ्यात वेगळा आणि सर्वात उष्ण ठरला आहे. कारण उन्हाळ्यात



पडणारा सरासरी पाऊस एकही दिवस न झाल्याने उन्हाची तीव्रता अतिप्रखर गटांत गणली गेली. दिवसभर वणवा पेटावा तसा यंदाचा उन्हाळा जाणवत असल्याचे नागरिकांसह शास्त्रज्ञांचे मत आहे. मंगळवारी राज्यातील बहुतांश भागाचे तापमान ४२ ते ४३ अंशांवर गेले होते.

**मंगळवारचे तापमान :** अकोला ४४.६, अमरावती ४३, बुलडाणा ४०.७, ब्रम्हपुरी ४२.५, चंद्रपूर ४२.८, गोंदिया ३७.४, नागपूर ४३.३, वाशिम ४२.६, वर्धा ४३, यवतमाळ ४१.४, पुणे (लोहगाव ४२.२, शिवाजीनगर ४०.२,), जळगाव ४३.१, कोल्हापूर ३७.८, महाबळेश्वर ३२.९, मालेगाव ४२.५, नाशिक ३९.८, सातारा ४०.७, सोलापूर ४२.९, मुंबई ३४.२, धाराशिव ४१.६, छ. संभाजीनगर ४२.६

## मंदिराची भिंत कोसळली; ७ जणांचा मृत्यू

**विशाखापट्टणम :** आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथील श्री वराह लक्ष्मी नरसिंह स्वामी मंदिरात चंदनोत्सवादरम्यान २० फूट लांबीची भिंत कोसळली. या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला, तर अनेक लोक जखमी झाले. एनडीआरएफ आणि एपीएसडीआरएफच्या टीम घटनास्थळी दाखल झाल्या असून मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. या घटनेबाबत एसडीआरएफच्या एका जवानाने सांगितले की, ही घटना रात्री अडीच वाजता घडली. या घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला असून ४ जण जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. एसडीआरएफ जवानाने सांगितले की, घटनेची माहिती मिळताच आम्ही तातडीने घटनास्थळी पोहोचलो आणि मदत आणि बचाव कार्य सुरू केले. भाजपचे माजी आमदार माधव यांनीही अपघाताची माहिती देताना अक्षय्य तृतीयेदिवशी घडलेली ही दुर्दैवी घटना असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# कोलकातामध्ये भीषण अग्नितांडव!
## हॉटेलला लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यू

**कोलकाता, दि. ३०** वृत्तसंस्था

पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील एका हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले आहेत. आगीचे कारण अद्याप कळू शकले नाही, परंतु शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी असा अंदाज एका अधिकाऱ्याने वर्तवला आहे. मंगळवारी रात्री ही घटना घडली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या पोहोचल्या आणि आगीवर नियंत्रण मिळवले.

कोलकात्याचे महापौर फिरहाद हकीम आणि पोलिस आयुक्त मनोज कुमार वर्मा यांनी घटनास्थळी भेट दिली. आगीची घटना रात्री ८:१५ वाजता ऋतुराज हॉटेलच्या परिसरात घडली. चौदा मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. अनेक लोकांनी इमारतीच्या खिडक्यांमधून आणि बाल्कनीतून उड्या मारून जीव वाचवला, असे पोलीस आयुक्त वर्मा यांनी सांगितले. **(पान २ वर)**



### चौकशीसाठी विशेष पथक

आगीचे कारण अद्याप कळू शकलेले नाही, असे वर्मा यांनी सांगितले. मात्र, ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. बचाव कार्य सुरू आहे आणि घटनेची चौकशी करण्यासाठी एक विशेष पथक तयार करण्यात आले असल्याचे वर्मा यांनी सांगितले. केंद्रीय मंत्री आणि पश्चिम बंगाल भाजप अध्यक्ष सुकांता मजुमदार यांनी राज्य सरकारला तातडीने पीडितांना वाचवण्याचे आदेश दिले. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी अग्निसुरक्षा उपायांचे कठोर निरीक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत.

# पाकच्या नापाक कारवाया थांबणार; पंजाब सीमेवर अँटी ड्रोन सिस्टम तैनात करणार!

**चंदीगड, दि. ३०** वृत्तसंस्था

पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान सीमेवर वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पंजाब सरकारने राज्याला लागून असलेल्या सीमेवर अँटी-ड्रोन सिस्टम तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. पंजाबच्या मुख्यमंत्री कार्यालयाने ही माहिती दिली आहे.

अँटी-ड्रोन सिस्टम तैनात केल्यानंतर, पाकिस्तानकडून येणाऱ्या ड्रोनद्वारे शस्त्रे आणि ड्रग्ज पाठवण्याचा कट अयशस्वी होईल. या तंत्रज्ञानामुळे पोलिस आणि



सुरक्षा संस्था पाकिस्तानी ड्रोन तात्काळ शोधून नष्ट करू शकतील. पंजाबच्या मुख्यमंत्री कार्यालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, ''पंजाब सरकार पंजाबला लागून असलेल्या पाकिस्तानी सीमेवर अँटी-ड्रोन सिस्टम तैनात करेल. त्यामुळे पाकिस्तानकडून ड्रोनद्वारे शस्त्रे आणि ड्रग्ज पाठवण्याचा कट अयशस्वी होईल. तसेच ड्रोन पाडण्यासाठी अँटी-ड्रोन सिस्टम तैनात केले जातील. या तंत्रज्ञानाच्या मदतीने पोलिस आणि सुरक्षा एजन्सी पाकिस्तानी ड्रोनच्या घुसखोरीचा तात्काळ मागोवा घेऊ शकतील आणि नष्ट करू शकतील.

पहलगाम हल्ल्यानंतर, गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तानकडून नियंत्रण रेषेवर सतत शस्त्रसंधीचे उल्लंघन होत आहे. पाकिस्तानी लष्कराने २९ एप्रिलच्या मध्यरात्री जम्मू आणि काश्मीरच्या अनेक सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेवरील (एलओसी) त्यांच्या चौक्यांवरून विनाकारण गोळीबार सुरू केला.






## भगवान परशुराम जयंती, गंगा जयंती व अक्षय तृतीयेदिनी डाबकी रोड विकासकामाचा शुभारंभ!



### आ.रणधीर सावरकर व खा. अनुप धोत्रे यांची उपस्थिती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३०** :भगवान परशुराम जयंती, गंगा जयंती, बसवेश्वर जयंती आणि तुकडोजी महाराज जयंती या पवित्र दिवशी अकोल्यातील डाबकी रोड (जकात नाका ते रेल्वे गेट) या महत्त्वाच्या रस्त्याच्या डांबरीकरण कामाचा शुभारंभ उत्साहात पार पडला. या कामामुळे पालखी मार्गाला गती मिळणार असून, नागरिकांना दर्जेदार रस्त्यांची सुविधा उपलब्ध होणार आहे.

या कार्यक्रमात भाजपा प्रदेश सरचिटणीस व आमदार रणधीरभाऊ सावरकर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार अनुपजी धोत्रे होते. यावेळी बोलताना आमदार सावरकर म्हणाले, ''अक्षय तृतीयेसारख्या पवित्र दिवशी विकास कामांना गती देण्याचा शुभारंभ होत आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. डाबकी रोडवरील हे काम म्हणजे अकोल्याच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.''

यावेळी त्यांनी बसवेश्वर महाराज व तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा गौरव करत सामाजिक समरसता, अन्यायाविरोधातील संघर्ष आणि राष्ट्रचेतना यांचे महत्व पटवून दिले. त्यांनी असेही सांगितले की, ''हद्दवाढ क्षेत्रातील नागरिकांच्या समस्या दूर करण्यासाठी भाजपचे लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते तत्पर आहेत.''

खासदार अनुप धोत्रे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशभरात विकासाची गंगा वाहत आहे. भारतीय जनता पक्ष हे संघटन केवळ निवडणूक जिंकण्यापुरते मर्यादित नाही, तर राष्ट्रनिर्मितीचा एक आधारस्तंभ आहे. येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत भाजपचे उमेदवार प्रचंड बहुमताने विजयी होतील, असा विश्वास जनतेच्या आशीर्वादावर आम्हाला आहे.''

या रस्त्याच्या डांबरीकरणामुळे वाहतुकीला मोठी सुलभता मिळेल, तसेच परिसरातील नागरिकांना सुविधा व सुरक्षिततेचा लाभ होणार आहे. कार्यक्रमाला माजी महापौर विजय अग्रवाल, भाजपा महानगर अध्यक्ष जयंतराव मसने, सतीश ढगे, तुषार भीरड, सतीश येवले, चंदाताई शर्मा, रश्मीताई कायंदे, साधनाताई येवले, शिव शर्मा, डॉ. सुभाष लवाले, सुभाष मसने, माधुरीताई शिरसागर, वैशालीताई शेळके, संगीता मागटे, रवी दुतोंडे, निलेश निनोरे, गिरीराज तिवारी, अनिल गरड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोमय मूल्यवर्धित उत्पादनाचे मंत्रालयात स्टॉल्स

। समीर मोकासदार ।

**मुंबई, दि. २९** : गाईला माते प्रमाणे पूजन करून तिला संरक्षण दिल्या जात आहे . गाईच्या दुधापासून बनविलेल्या पदार्थाची तुलना आपल्या हिंदू धर्मात अमृतासोबत केलेली आहे . तेहतीस कोटी देवांचा वास असलेली गोमाता आपल्या धर्म संस्कृतीनुसार महाराष्ट्र शासनाने गोवंश हत्या बंदीसारखा कायदा राबवून गोवंशाचे संवर्धन करणाऱ्या गोरक्षण संस्थांना विशेष प्रोत्साहन दिल्या जात आहे . हीच पार्श्वभूमी समोर ठेऊन आज गोमय मूल्यवर्धित उत्पादन दिनानिमित्त मंत्रालयात उत्पादनाचे स्टॉल लावण्याची परवानगी देण्यात आली.



देशातील गोवंश हत्याबंदी सारखा कायदा ज्या राज्यामध्ये अंमलात आणला त्यापैकी एक राज्य म्हणजे महाराष्ट्र . हिंदू संस्कृतीनुसार अन्यसाधारण महत्व असलेल्या गाईंचे रक्षण व्हावे आणि गाईचे संरक्षण करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन मिळावे म्हणून आजचा दिवस दि. २९ एप्रिल गोमय मूल्यवर्धित उत्पादन दिवस म्हणून साजरा केला जात आहे . याच दिवसाचे औचित्य साधून गाईचे दूध , शेण , गोमूत्र यापासून बनवलेल्या आरोग्यदाई उत्पादनांचा प्रसार आणि प्रचार व्हावा म्हणून मंत्रालयात गोमय मूल्यवर्धक उत्पादन करणाऱ्या संस्थांना आपली उत्पादनाचा स्टॉल लावण्याची परवानगी देण्यात आली होती.

गायीच्या दुधापासून बनवलेले तूप , शेणाच्या गोवऱ्या आदि साहित्य विक्रीसाठी उपलब्ध होते. यावेळी मंत्रालयात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांनी आणि अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात साहित्य खरेदी करून मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले .

## राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी घेतले श्री राजराजेश्वराचे दर्शन



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३०** : राज्याचे उद्योग, आदिवासी विकास, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी आज अकोल्याचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वर मंदिरात दर्शन घेतले व महाआरती केली. यावेळी आमदार संजय खोडके, आमदार अमोल मिटकरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राज्यमंत्री श्री. नाईक यांचे कलश रथयात्रेनिमित्त जिल्ह्यात आगमन झाले. सर्वप्रथम त्यांनी पातूर येथे भेट दिली.

पातूर येथे शहाबाबू दर्गा व सिदाजी महाराज मंदिर येथून पवित्र मातीचे पालखीमधून रथयात्रेत आगमन झाले. त्यानंतर राज्यमंत्री नाईक यांनी अकोला येथे श्री राजराजेश्वर मंदिराला भेट दिली व दर्शन घेतले.

यावेळी राज्यमंत्री श्री. नाईक यांच्या हस्ते महाआरती झाली. असदगड येथील माती, पवित्र नद्यांचे पाणी जलकलशात विसर्जित आले.

## शिक्षक परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा शिक्षक आघाडीत प्रवेश

### अकोल्यात शिक्षक परिषदेला मोठा धक्का

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३०** :अमरावती विभागाचे माजी शिक्षक आमदार प्रा. श्रीकांत देशपांडे यांच्या नेतृत्वात आणि प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या अकोला जिल्हा कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांसह संपूर्ण सदस्यांनी शिक्षक आघाडीमध्ये जाहीर प्रवेश घेतला. शिक्षक परिषदेतील काही पदाधिकाऱ्यांच्या कुरघोडीच्या राजकारणाला कंटाळून जिल्हा कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांनी घेतलेला हा निर्णय शिक्षक परिषदेसाठी मोठा धक्कादायक असल्याची चर्चा शिक्षक वर्तुळात सुरू आहे.



यावेळी शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रा. अतुल पिलात्रे, जिल्हाध्यक्ष ग्रामीण गजानन जायभाये, कार्याध्यक्ष डॉ. सौरभ म्हात्रे, अनंत डिवरे, उपाध्यक्ष प्रा. राहुल महाजन, प्रा. रोशन चौरे, विलास सातरोटे, जवळकर, सहसचिव प्रा. निलेश ढाकरे, संजय वाघमारे, प्रा. प्रशांत राठी, प्रा. प्रशांत सरकटे, निलेश लहाने, प्रा. नंदकिशोर थुटे, अनिल गावंडे, संदीप मार्के, अनुप इंगोले, रत्नाकर इंगळे, गणेश वाघ, गजानन कांबळे, शिक्षकेतर युनिटचे जिल्हाध्यक्ष अभिषेक लांडे, प्रा. सुनील गवई, प्रा. राजू क्षीरसागर, प्रा. अश्विनी तायडे, रोशनी कातकडे, मंगला डोईफोडे, प्रा. आर. जे. भालेराव यांच्यासह महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे संपूर्ण जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, संपूर्ण जिल्हाभरातील सदस्य, तालुका पदाधिकारी व सदस्य, महिला शाखा, शिक्षकेतर कर्मचारी शाखा, ग्रंथालय विंग, यांच्यासह परिषदेच्या संपूर्ण कार्यकारिणीने सर्वानुमते शिक्षक आघाडीमध्ये प्रवेश घेतला. यावेळी शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष सादिक सर, संजय राजहंस, गजेंद्र काळे उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना माजी शिक्षक आमदार श्रीकांत देशपांडे यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या संपूर्ण कार्यकारिणीचे, जिल्हा, तालुका पदाधिकारी, व सदस्यांचे स्वागत करीत शिक्षक परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा शिक्षक आघाडीमध्ये यथोचित सन्मान राखण्याचे आश्वस्त केले.

### शिक्षक, कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देऊ–श्रीकांत देशपांडे

शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी शिक्षक आघाडीने वेळोवेळी लढा उभारत शिक्षक, कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला आहे. यापुढेही शिक्षकांच्या समस्या, ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी आपला प्रयत्न राहणार असल्याचे शिक्षक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार प्रा. श्रीकांत देशपांडे यांनी सांगितले.

अकोला जिल्ह्यात शिक्षक परिषद मोडकळीस आलेली असताना सन २०१८ पासून शिक्षक परिषदेच्या आमच्या नवनियुक्त कार्यकारिणीने जिल्हाभरातच नव्हे तर विभागीय आणि राज्यस्तरावर अनेक शैक्षणिक समस्या सोडवण्याकरिता प्रामाणिक प्रयत्न केले, परंतु अलिकडच्या काळात शिक्षक परिषदेत सेवानिवृत्त पदाधिकाऱ्यांचा आणि निष्क्रिय पदाधिकाऱ्यांचा भरणा झाल्यामुळे, तसेच विभागीय आणि राज्यस्तरावरच्या नियुक्ती यामूळे शैक्षणिक समस्या निराकरणाचे काम थांबले होते, शिक्षकांच्या व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अडचणींना न्याय देण्याकरिता सक्षम नेतृत्वाची गरज असल्यामुळे आम्ही सर्वांनी शिक्षक आघाडीमध्ये प्रवेश घेण्याचा सामूहिक निर्णय घेतला आहे.

- **प्रा. अतुल पिलात्रे** जिल्हाध्यक्ष (महानगर)

## सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगाराला राजरोस परवानगी?

**अकोला, दि. ३०** :जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक आटोकाट प्रयत्न करीत आहेत. मात्र गुन्हेगारी नियंत्रणात येण्याचे नाव घेतले जात नाही.

शहरासह जिल्ह्यातील गुन्हेगारांवर एम पी डी ए ची कारवाया करीत त्यांना कारागृहात स्थान बद्ध केले जात असताना मात्र मध्यवार्ती बस स्थानकला लागूनच असलेल्या अ वैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहन तळावर खुलेआम टेबल टाकून सकाळी ८ ते रात्री ६ वाजेपर्यंत हे जुगाराचे दुकान सुरु असते याची माहिती मध्यवर्ती बस स्थानकात कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांना आहे तर याच रस्त्याने विविध लोकांची ये जा असताना खुलेआम जुगार चालवीण्याची परवानगी सिव्हिल लाईन पोलिसांनी दिली कशी? याचीच चर्चा केली जात आहे.

## संस्कार शिबिरात मुलींना जीवनशैली व नैतिकतेचे मार्गदर्शन-डॉ. संदीप चव्हाण



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३०** : बालाजी कॉन्व्हेन्ट, मलकापूर येथे श्री गुरुदेव मंडळाच्या वतीने सुरू असलेल्या संस्कार शिबिरामध्ये डॉ. संदीप चव्हाण यांनी मुलींना पाण्याचे योग्य सेवन, सकाळपासून रात्रीपर्यंतची संतुलित दिनचर्या, आरोग्यदायी आहार याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ''आजचे संस्कार म्हणजेच उद्याचे राष्ट्रनिर्माण'' हे त्यांनी त्यांच्या चिंतनातून अधोरेखित केले.

कार्यक्रमात श्री. अमोल गोंडचवर यांनी विनोदी शैलीत संवाद साधून मुलींच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले, तर डॉ. गजानन वाघोडे यांनी नैतिक संस्कारांवर भाष्य करत त्यांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमानंतर डॉ. संदीप चव्हाण यांनी उन्हापासून बचावासाठी सनकुल औषधाचे वाटप केले.

### आजचे संस्कार म्हणजे उद्याचे राष्ट्रनिर्माण : डॉ. चव्हाण यांचे चिंतन

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय वाघमारे, तर आभार प्रदर्शन संयोजक श्री. रामराव पाटेखेडे यांनी केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून युवा उद्योजक श्री. पंकज राठी उपस्थित होते. तसेच श्री. भीमराव पाटेखेडे, श्री. भुजंगराव देशमुख, श्री. सचिन ढोले, श्री. वसंत सिंहे, श्री. देविदास गावंडे, श्री. वसंत भाकरे व इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

शिबिरामध्ये दररोज अभंग गायन, लाठी प्रशिक्षण आणि योगा अशा उपक्रमांद्वारे मुलींना शारीरिक, मानसिक आणि नैतिकदृष्ट्या सशक्त बनवण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. हे शिबिर केवळ मुलींसाठी आहे.

## पान 1 वरुन...

### मोदी सरकार करणार ...

समावेश करायला हवा....''भारतीय राज्यघटनेच्या कलम २४६ नुसार, जनगणनेचा विषय सातव्या अनुसूचीच्या संघ यादीत ६९ व्या क्रमांकावर आहे. यामुळे तो केंद्राच्या अधिकाराखालील विषय बनतो. काही राज्यांनी जातनिहाय सर्वेक्षण केले असले तरी, त्यांच्या दृष्टिकोनात लक्षणीय बदल झाला आहे. काहींनी हे सर्वेक्षण पारदर्शक आणि संघटित पद्धतीने केले आहे, तर काहींनी ते राजकीय हेतू साध्य करण्यासाठी केल्याचे दिसून आले आहे. त्यात पारदर्शकतेचा अभाव आहे. यामुळे समाजात अनेक शंका निर्माण केल्या जात आहेत. अशा विसंगत प्रयत्नांमुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता आहे,'' असे वैष्णव यांनी नमूद केले.

**जातनिहाय जनगणनेची काँग्रेसकडूनही मागणी**

देशात तातडीने जातनिहाय जनगणना केली पाहिजे, अशी मागणी काँग्रेस अध्यक्ष तथा राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी नुकतीच केली होती. जनगणना करण्यासाठी होत असलेल्या उशिरामुळे अनेक नागरिक कल्याणकारी योजनांपासून वंचित राहत असल्याचे सांगत त्यांनी जनगणना करण्यात होणाऱ्या विलंबाबद्दल चिंता व्यक्त केली होती.

### कोलकातामध्ये भीषण अग्नीतांडव!

८ मृतदेहांची ओळख पटली कोलकाता पोलिसांनी सांगितले की, हॉटेलमध्ये एकूण ६० लोक होते. १४ जणांचा मृत्यू झाला आहे, ज्यामध्ये ११ पुरुष, एक महिला आणि दोन मुले आहेत. एकूण ८ मृतदेहांची ओळख पटली आहे. यासोबतच १३ जण जखमी झाले आहेत, त्यापैकी १२ जणांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

## खासगी प्राथमिक शाळांच्या संचमान्यता वितरीत

### प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांचा पुढाकार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३०** : अकोला जिल्हातील खाजगी प्राथमिक शाळांच्या सत्र २०२४-२५ च्या संचमान्यता वितरीत व्हाव्या करीता महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेच्या वतीने प्राथमिक शिक्षणाधिकारी मा.श्री.रतनसिंग पवार साहेब यांना *शुक्रवार दि.२५ एप्रिल २०२५* रोजी विनंती करण्यात आली होती.

यावर संघटनेच्या मागणीवर श्री.पवार साहेब यांनी आज सोमवार दि.२८ फेब्रुवारी



२०२५ रोजी संचमान्यता शिबिर आयोजित केले होते. यावेळी ज्या शाळांच्या संचमान्यता अचुक आल्या त्यांना डिजीटल स्वाक्षरी द्वारा वितरण करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी श्री.पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली उपशिक्षणाधिकारी मा.श्री.कैलास राठोड साहेब, विस्तार अधिकारी मा.श्री.विनोद मानकर साहेब, वरीष्ठ लिपीक मा.श्री.दिनेश काटे सर, डाटा एन्ट्री ऑपरेटर मा.श्री.सुशील दुतोंडे सर, समग्र शिक्षा चे श्री.लहाने सर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्री.मनिष गावंडे राज्य उपाध्यक्ष श्री अल्केश खेंडकर राज्य सहसचिव श्री सवडतकर राज्य सहसचिव श्री सुरोळकर सर कोषाध्यक्ष श्री गाठे सर सर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी शिबिर आयोजित केल्याबद्दल मा.श्री.पवार साहेब यांचे आभार मानले.ज्या शाळांच्या संचमान्यता चुकीच्या आल्या आहेत त्यांनी ड्राफ घेऊन प्रस्ताव शिक्षणाधिकारी कार्यालयात सादर करावा संघटना त्याचा पाठपुरावा करेल.






अजिंक्य भारत
# आपला विदर्भ
अकोला, गुरुवार, दि. १ मे २०२५






## थोडक्यात

### महापालिका शासनाला देणार साडेबारा कोटी रुपये

**अकोला :** मालमत्ता कर महापालिकेचे महत्वाचे उत्पन्नाचे स्रोत आहे. दरवर्षी महापालिकेला ५० टक्क्याच्या आत मालमत्ता कर वसुल करता आलेला आहे. यावर्षीही महापालिकेने २०२४-२५ या आर्थिक वर्षात ६७ कोटी ५९ लाख १३ हजार २० रुपयाचा मालमत्ता कर वसुल केला. मात्र हा संपूर्ण मालमत्ता करातून मिळालेला महसुल पूर्णपणे महापालिकेला मिळालेला नाही. मालमत्ता करात आकारण्यात येणारे शिक्षण उपकर, रोजगार हमी योजना कर तसेच मोठ्या इमारतीवरील करातील (पाच टक्के कर वगळता) हे शासनाच्या तिजोरीत जमा करावे लागतात. त्यामुळे महापालिकेला प्रत्यक्षात ५५ कोटी ५ लाख ३४ हजार ६१७ रुपये मालमत्ता करातून मिळाले आहेत. नागरिकांना देण्यात येणाऱ्या मालमत्ता कराच्या देयकात शिक्षण उपकर हा ४ ते ६ टक्के आकारला जातो. मनपाने वसुल केलेल्या एकुण मालमत्ता करातून ११ कोटी १ लाख ३६ हजार तर रोजगार हमी योजना कर २ टक्के आकारला जातो. यातून १ कोटी ३७ लाख ७० हजार तसेच मोठ्या इमारतीवरील वसुल केलेल्या करातून १४ लाख ७१ हजार असा एकुण १२ कोटी ५३ लाख ७८ हजार रुपयाचा कर शासनाला द्यावा लागणार आहे. महापालिकेला कर्मचाऱ्यांचे वेतन, सेवा निवृत्ती वेतन आदींसाठी महिन्याकाठी १२ कोटी रुपयाचा खर्च येतो. म्हणजेच १४४ कोटी रुपये वेतनावर खर्च होतात. तर मालमत्ता करातून मनपाला केवळ ५५ कोटी रुपये महसुल मिळाला.

### जागेचा वाद विकोला गेल्याने भावानेच केली भावाची हत्या

**यवतमाळ:** जागेचा वाद विकोपाला जाऊन भावानेच भावाची चाकूने वार करून हत्या केल्याची घटना आज, बुधवारी (दि.३०) सायंकाळी स्थानिक पिंपळगाव येथील अनुश्री पार्क परिसरात येथे घडली.
शहर गुन्हे शाखेच्या (डीबी) पथकाने दिलेल्या माहितीवरून प्रमोद पंढरी पेन्दोर (वय ४५) रा. अनुश्री पार्क व त्याचा भाऊ बालाजी पंढरी पेन्दोर (वय ४१) रा अनुश्री पार्क हे दोघे सख्खे भाऊ असून या दोघांमध्ये जागेवरून वाद सुरू होता. या वादातून प्रमोदवर अनेकदा हल्ला करण्यात आला. मात्र शेजाऱ्यांनी या वादाला समजूत घालून प्रकरण निवळले. मात्र, आज दुपारी सुरू झालेल्या वादात संशयित आरोपी बालाजी याने प्रमोदवर चाकूने हल्ला चढविला यात बालाजीने प्रमोदच्या गळ्यावर, पोटावर तसेच मानेवर वर्मी घाव घातल्याने अतिरक्तस्राव झाला. प्रमोद याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, अतिरक्तस्राव झाल्याने डॉक्टरांनी प्रमोद याला मृत घोषित केले. या घटनेची माहिती शहर पोलिस स्टेशनला मिळताच पिंपळगाव येथील अनुश्री पार्क गाठून या प्रकरणातील संशयित आरोपी बालाजी यास ताब्यात घेऊन विचारपूस करण्यात आली. या घटनेची तक्रार वृत्त लिहीपर्यंत दाखल करण्यात आली नव्हती.

### पीएम आवास योजनेच्या सर्वेक्षणाला १५ मेपर्यंत मुदतवाढ



**अकोला :** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सुरू असलेल्या आवास+ २०२४ सर्वेक्षणाच्या कालमर्यादित केंद्र सरकारने १५ मे २०२५ पर्यंत वाढ जाहीर केली आहे. यामुळे सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना ग्रामीण भागातील अतिरिक्त पात्र कुटुंबांची ओळख पटवण्यासाठी अंतिम संधी मिळाली आहे.
ग्रामीण विकास मंत्रालयाने ३० एप्रिल रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, यापूर्वी ३० एप्रिल ही अंतिम तारीख होती. मात्र अनेक राज्य सरकारांनी वेळ वाढवण्याची मागणी केली होती. त्यानुसार केंद्राने सर्वेक्षणासाठी आणखी १५ दिवस देण्याचा निर्णय घेतला आहे. योजनेतून लाभ घेण्यासाठी नागरिकांनी पूर्वी स्व-सर्वेक्षण केले असल्यास, त्याची पडताळणी करून पात्रता निश्चित करण्याचे काम आता महत्त्वाचे ठरणार आहे. अकोला महापालिका क्षेत्रात पीएमएव्हय (ग्रामीण) योजना लागू नसली तरी जिल्ह्यातील ग्रामीण भागात विशेषतः जिथे नगरपंचायती व ग्रामपंचायती कार्यरत आहेत तेथे ही योजना अंमलात आणली जाते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (डीआरडीए) मार्फत ही मोहीम राबवण्यात येत असून,महापालिका हद्दीत येणाऱ्या नव्या वस्ती विस्तार क्षेत्रांतही काही प्रकरणे या योजनेखाली समाविष्ट होण्याची शक्यता आहे, त्यामुळे **महापालिका प्रशासन व जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वयाची गरज वाढली आहे.
महापालिकेच्या वतीनेही वस्ती सुधार प्रकल्पांच्या माध्यमातून पीएमएव्हय (शहरी) अंतर्गत काही कामे राबवली जात असली तरी, ग्रामीण भागातील लाभार्थी गोंधळात पडू नयेत म्हणून स्पष्ट माहिती देणे गरजेचे आहे. जिल्हा प्रशासनाने आवास+ सर्वेक्षणाच्या विस्तारित कालावधीत काम वेगाने पूर्ण करून पात्र कुटुंबांना योजनेचा लाभ मिळवून देण्याचे निर्देश दिले आहेत.या निर्णयामुळे गृहहीन व गरजू ग्रामीण कुटुंबांना घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# जल व्यवस्थापनाचा जीवनशैलीत अंगीकार आवश्यक -पालकमंत्री आकाश फुंडकर

## जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा समारोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ३० :** जल व्यवस्थापनाची कृती केवळ पंधरवड्यापुरती मर्यादित न राहता जल व्यवस्थापनाचा जीवनशैलीत अंगीकार व्हावा, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश पुंडकर यांनी आज येथे केले.
जलसंपदा विभागातर्फे जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा समारोप कार्यक्रम नियोजन भवनात झाला, त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. जिल्हाधिकारी अजित कुंभार, अकोला सिंचन मंडळाचे अधिक्षक अभियंता योगेश दाभाडे, कार्यकारी अभियंता अमोल वसुलकर आदी उपस्थित होते.
पालकमंत्री श्री. फुंडकर म्हणाले, इस्त्रायल तसेच काही आखाती देशांमध्ये कमी पावसातही उत्कृष्ट नियोजनातून समृध्दी निर्माण करण्यात आली. त्या तुलनेत आपल्याकडे पाण्याची मोठी उपलब्धता आहे. त्याचा उचित वापर झाला पाहिजे. हजारो वर्षांच्या पावसाने जमिनीत निर्माण झालेल्या पाण्याच्या साठ्याचा उपसा हानीकारक ठरेल. त्यामुळे पाण्याचा उचित वापर ही सवय व्हावी. कालव्यांची नियमित स्वच्छता न झाल्याने पाणी शेवटच्या बिंदुपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे स्वच्छतेत सातत्य हवे.पाण्याच्या व्यवस्थापनाबाबत पाणी वापर संस्थांमध्ये जागरूकता निर्माण करावी. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन व्हावे जेणेकरून उन्हाळ्यात टंचाई निर्माण होणार नाही. जल व्यवस्थापनासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान देण्याचे आवाहनही त्यांनी केले.
'प्रत्येक थेंब अधिक उत्पादन' या सूत्रानुसार शेती सिंचनासाठी पाण्याचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. त्याबाबत या जागरूकता निर्माण करण्यासाठी कृषी व जलसंपदा विभागाने समन्वयाने कार्य करावे, असे जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांनी सांगितले.

उपक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी जलप्रतिज्ञाही घेण्यात आली. पंधरवड्यात कालवा स्वच्छता मोहीम, उपसा सिंचनाबद्दल तक्रार निवारण, अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, पाणी वापर संस्था संवाद आदी अनेक उपक्रम राबविण्यात आले, असे श्री. दाभाडे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

# अकोल्याचे तत्कालीन एसपी देवेन भारती यांची मुंबई पोलीस आयुक्तपदी नियुक्ती!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ३० :** मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्या सेवानिवृत्तीनंतर या सर्वोच्च पदावर कोण विराजमान होणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. अखेर आज यावर पडदा उठत, अकोल्याचे माजी पोलीस अधीक्षक आणि ज्येष्ठ आयपीएस अधिकारी देवेन भारती यांची मुंबई पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या पदोन्नतीमुळे संपूर्ण पोलिस दलात आणि विशेषतः अकोल्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.
देवेन भारती हे १९९४ बॅचचे आयपीएस अधिकारी असून, त्यांचा पोलिस सेवेतला प्रवास अत्यंत प्रभावी आणि यशस्वी ठरला आहे. त्यांनी यापूर्वी मुंबई शहराच्या कायदा व सुव्यवस्था विभागाचे सहआयुक्त, गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त, उपायुक्त, आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख आणि दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या कार्यक्षमतेची दखल घेत राज्य सरकारने महायुती सरकारच्या काळात नवीन स्थापन झालेल्या विशेष पोलीस आयुक्तपदासाठी देवेन भारती यांची पहिली निवड केली होती. आज त्यांची मुंबई पोलीस आयुक्तपदी निवड होणे ही त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान व तेजस्वी सेवेस मिळालेली मोठी पावती आहे.
अत्यंत सजग, निर्भीड आणि चतुर पोलीस अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यात आणि गुप्त माहितीवर आधारित कार्यवाहीत त्यांचा हातखंडा मानला जातो. सुरुवातीच्या काळात देवेन भारती यांनी अकोला जिल्ह्यात पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असताना अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले होते.

# अकोला-वर्धा येथे महिलांच्या गळ्यातील साखळी हिसकावणाऱ्या चोरट्यांचा पर्दाफाश!




## २ आरोपी अटकेत, १.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** शहरातील गौरक्षण रोड परिसरात दोन दिवसांत महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावण्याच्या घटनांनी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकारामुळे पोलीस यंत्रणेपुढे मोठे आव्हान उभे राहिले होते. मात्र, पोलिसांनी अथक तपास करत वर्धा येथे जाऊन आरोपींना गजाआड करण्यास यश मिळवले असून, एकूण २१ ग्रॅम सोनं आणि १.८० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
दिनांक ८ आणि ९ एप्रिल २०२५ रोजी रचना नगर व मलकापूर, गौरक्षण रोड परिसरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावण्याच्या दोन घटना घडल्या. या घटनांनंतर स्थानिक गुन्हे शाखा व खदान पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकांनी तपासाला सुरुवात केली. सीसीटीव्ही फुटेज व प्रत्यक्षदर्शींच्या माहितीच्या आधारे तपास सुरु करण्यात आला. आरोपी रेल्वे स्थानक परिसरातील लॉजमध्ये बनावट आधारकार्डच्या आधारे मुक्काम करत असल्याचे निष्पन्न झाले.
तपासादरम्यान समोर आले की, आरोपींनी बनावट मोबाईल क्रमांक, आधार कार्ड व मोटरसायकलवरही बनावट नंबर प्लेट वापरली होती. त्यामुळे तपास अधिक गुंतागुंतीचा बनला होता. याच दरम्यान वर्धा जिल्ह्यातही अशाच प्रकारची चैन स्नॅचिंगची घटना घडल्याची माहिती मिळाली. स्थानीय गुन्हे शाखेचे प्रमुख पोनि शंकर शेळके व त्यांच्या पथकाने वर्ध्यातील पथकाशी संपर्क साधून दोन्ही घटनांमध्ये साम्य असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर वर्धा बस स्थानक परिसरातील लॉजेसमध्ये शोध मोहीम राबवून आरोपींचा वावर असल्याचे सिद्ध झाले. यानंतर तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून आरोपींची ओळख पटवण्यात आली. पोलीसांनी दिनांक २९ एप्रिल रोजी वर्धा न्यायालयाच्या आदेशानंतर वैभव नारायण अडोळे(२२) रा. येरला, ता. मोर्शी, जि. अमरावती, रोहण मोहनराव हुनंकर, (२२), रा. येरला, ता. मोर्शी, जि. अमरावती या दोघांना ताब्यात घेऊन अकोला येथे आणले .

# किन्हीराजा पोलीस चौकी बंद;अवैध धंदे मात्र तेजीत

## अवैध धंद्यांमुळे अनेकांचे कुटुंब होतेय उद्ध्वस्त, ठाणेदार यांनी द्यावे लक्ष




खुलेआम अवैध व्यवसाय चालु असूनही पोलिसा कडून त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आता कर्तव्यदक्ष ज ऊ ल का पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनीच या गंभीर बाबीकडे लक्ष पुरवावे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अवैध धंद्यात खा–की ची ओढ जास्त असल्याने कदाचित खा–की धवैध धंद्याना जा–की म्हणण्या ऐवजी या–की म्हणत असेल. अवैध धंद्याच्या व्यसनापाई बरबाद झालेल्या कुंटुंबाची हाय नक्की कोणाला लागत असेल याचा विचार खा–णा–यांनी करावा.

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मालेगाव, दि. ३० :** गेल्या काही वर्षापासून किन्ही राजा येथील तरुणाईमध्ये वाढत असलेल्या कमी गुंतवणुक करुन जास्त नफा कमावण्याच्या मानसिकतेमुळे अवैध धंद्याकडे अनेक तरूणांचा कल वाढला आहे. त्याचाच फायदा घेत किन्ही राजा अवैध धंद्यात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसत आहे. अशा धंद्याकडे तरूणांचा वाढलेला कल आणि पोलिस विभागाकडून त्याकडे करण्यात येणारे दुर्लक्ष यामुळे अवैध धंद्यांना जणु मोकळे रानच मिळाले आहे. गावातील विविध भागात सुरू असलेल्या या अवैध धंद्यांमुळे आता गावातील अवैध धंद्यांना पोलिसांनी जणूकाही एनओसीच दिली की काय, असा प्रश्न सर्वसामान्यांमध्ये उपस्थित केल्या जात आहे.
बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर शहरासह ग्रामीण भागातील तरूण कमी गुंतवणुकीचा व्यवसाय म्हणुन पाणठेला, चहाची टपरी अशा व्यवसायाकडे वळत होते. मात्र, आता कमी गुंतवणुकीत जादा नफा कमावण्याच्या नादात दारूविक्री, सट्टा पट्टी, जुगार, मटका, अवैध पेट्रोल साठवणूक,अशा अवैध धंद्याकडे त्यांचा कल वळल्याचे दिसून येत आहे. पान ठेला किंवा चहा टपरीच्या माध्यमातून दहा वर्षांत जेवढा पैसा कमावता येणार नाही, तेवढा पैसा अवैध धंद्यात केवळ दोन ते तीन वर्षांत कमावता येतो असा त्यांचा समज आहे. त्यामुळे अधिक पैसा कमावण्याच्या लालसेनेच किन्ही राजा सह आजु बाजुच्या गावात दारूचा व्यवसाय गृह उद्योग तर सट्टा पट्टी उदरनिर्वाहाचे साधन झाले आहे. तरूणांनी सट्टा पट्टीला स्वतःच्या उदरनिर्वाहाचे साधन बनविले आहे. घरून पाहिजे तेवढा पॉकेटमनी मिळू शकत नाही, घरून मिळालेल्या पकिटमनी मध्ये तरूणांच्या गरजा भागू शकत नाहीत, यावर तरुणांनी उपाय शोधला असून,सट्टा पट्टीवर पैसा लावून जादा पैसा कमावण्यात तरूण लागले आहेत. सट्टा पट्टीवर तरूणांना सव्वा रूपयात शंभर रूपये मिळविता येत आहेत. क्रमांकाच्या अंदाजावर आकडेमोड करून सट्ट्याचे गणित मांडल्या जात आहे. तरुणांसोबत, मजुर, महिला वर्ग देखील सट्टयाच्या आहारी जात आहेत. मात्र या नादात पैसा मिळवण्यापेक्षा
गमावणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यातुनच कर्जबाजारीपणा आणि नशेच्या आहारी जाणारे तरुण अनपेक्षितपणे गुन्हेगारी कडेही वळत आहे.या सट्टा पट्टीच्या नादी लागुण कित्येक तरुण दिवसभर आकडे मोडीच्या गणिताचा अभ्यास करीत असतात. जिल्ह्यात कित्येक सट्टा पट्टी दलालांनी पट्टी घेण्याचे कार्यालय लावलेले आहे. या अवैध धंद्यांनी कित्येक कुटुंब उद्ध्वस्त केले आहेत. तरीही या धंद्याच्या नादी लागणाऱ्यांची संख्या कमी झालेली नाही. या व्यवसायाबद्दल आरडाओरड झाल्यास काही दिवसांसाठी हे व्यवसाय छुप्या पद्धतीने चालविण्यात येतात. तात्पुरते बंद केल्या जातात त्यानंतर मात्र, परिस्थिती जैसे थे असते. जऊळका पोलिस ठाण्यांच्या हद्दीत खुलेआम सट्टापट्टीसह, वरली, गावठी दारु व इतर अवैध व्यवसाय सुरू आहेत. मात्र असे असतांनाही जऊळका पोलीस स्टेशन चे ठाणेदार हिवरकर यांची कर्तव्यदक्ष अधिकारी अशी ओळख असतानाही त्यांच्याच कर्मचार्याकडून डोळ्यात धूळ फ ेक करून ऑल इज वेल... दाखवल्या जात असल्याचे दिसून येत आहे.

# कामगारांचे धोरणात्मक प्रश्न सोडवणुकीसाठी त्रिपक्षीय माथाडी मंडळाची रचना करा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**नवी मुंबई, दि. ३०:** माथाडी अधिनियम सुधारणा विधेयक क्रमांक ३ व सुरक्षा रक्षक अधिनियम सुधारणा विधेयक क्रमांक ४ मध्ये माथाडी व सुरक्षा रक्षक कामगारांचा न्याय हक्क/अधिकार अबाधित रहाण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर सुधारणा-तरतुदी करा,माथाडी अधिनियम, १९६९ मधील तरतुदीनुसार माथाडी कामगार व मालकांच्या धोरणात्मक प्रश्नांची सोडवणुक व निर्णय होण्यासाठी महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार सल्लागार समितीची पुनर्रचना करा अन्यथा आंदोलन करणार असल्याचा इशारा कामगार नेते नरेंद अण्णासाहेब पाटील यांनी दिला आहे.
अनुभवी कामगार नेत्यांच्या नेमणुका करा, विविध माथाडी मंडळाच्या त्रिपक्षिय सदस्यांच्या मुदती सन २००४ मध्ये संपुष्टात आल्या आहेत, त्यामुळे त्या-त्या माथाडी मंडळाचा कारोभार एक सदस्यीय सुरु आहे, कामगारांच्या धोरणात्मक प्रश्न व दैनंदिन प्रश्नांची सोडवणुक होण्यासाठी त्रिपक्षिय माथाडी मंडळाच्या रचना करा, विविध माथाडी मंडळांना ५० वर्षे पुर्ण झाली असून, कार्यालयीन सेवेतील ५०% पेक्षा जास्त कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, त्यामुळे माथाडी मंडळाच्या कार्यालयीन सेवेत माथाडी कामगारांच्या शिकलेल्या मुलांची आवश्यक परीक्षा घेऊन भरती करा या धोरणात्मक प्रश्नाबरोबर कामगार विभागाअंतर्गत प्रलंबित असलेल्या प्रश्नांची सोडवणुक करण्याकडे महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनेक वेळा महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनने तसेच माथाडी व सुरक्षा रक्षक कायदा बचाव कृती समितीच्यावतिने आझाद मैदान येथे उपोषण तसेच लाक्षणिक संप यासारखी आंदोलने केली, त्या-त्या वेळी प्रश्नांची सोडवणुक करण्याचे आश्वासन शासनाने दिले, मात्र प्रश्नांची सोडवणुक झाली नाही. माथाडी कामगारांचा न्याय हक्क /अधिकार अबाधित ठेवण्यासाठी माहे मे, २०२५ पासून माथाडी व सुरक्षा रक्षक कायदा व बचाव कृत्ती समितीमार्फत आणि महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनच्यावतिने तीव्र आंदोलन करणे भाग पडणार असल्याचा इशारा माथाडी कामगार नेते नरेंद अण्णासाहेब पाटील यांनी दिला आहे. माथाडी भवन, नवीमुंबई याठिकाणी आयोजित पत्रकार परिषदेत हा इशारा देण्यात आला. राज्य शासनाने माथाडी अधिनियम सुधारणा विधेयक क्रमांक ३४ विधीमंडळात आणले, या विधेयकात माथाडी कायदाच संपुष्टात आणणारी कांही खंड व कलमे वगळण्यात आली व सल्लागार समितीऐवजी मालक व कामगार प्रतिनिधींना वगळून सरकारी अधिका-यांच्या नेमणुकीचे प्राधिकरण आणले, अधिनियमातील व्याख्या बदलली तसेच माथाडी कामगारांच्या अधिकार/हक्काला बाधा येणारी सुधारणा आणल्यामुळे त्यास विरोध करण्यात आला व ते विधेयक स्थगित करण्यात आले, आतां शासनाच्या कामगार विभागाने माथाडी अधिनियम सुधारणा विधेयक क्रमांक ३ महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आणले, मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीससाहेब यांच्या व संबंधित अधिका-यांच्या उपस्थितीत दि.११ मार्च, २०२५ रोजी विधानभवन, मुंबई येथे सादरीकरण करण्यात आले व हे विधेयक दि.२० मार्च, २०२५ रोजी विधानपरिषद आणि दि.२१ मार्च, २०२५ रोजी विधानसभेत चर्चेसाठी आणण्यात आले, त्यावर सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार मुख्यमंत्री व कामगार मंत्री यांनी संयुक्त बैठक घेण्याचे आश्वासन सभागृहात दिले होते, त्याप्रमाणे संयुक्त बैठक घेण्यात आलेली नाही, ती बैठक घेण्याचे वारंवार मागणी करण्यात आली आहे. माथाडी अधिनियम सुधारणा विधेयकात मूळ अधिनियमातील व्याख्या बदलू नये, कारखान्यात यंत्राच्या सहाय्याने काम करणा-या कामगारांच्या हक्काला बाधा येऊ नये म्हणून विधेयकात तरतुदी करण्यात याव्या, फेक माथाडी व माथाडी अधिनियमाचा दुरुपयोग टाळण्यासाठी उपाययोजना कराव्या, ख-या माथाडी कामगारांना न्याय मिळण्यासाठी तरतुदी करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, मात्र शासनाकडून दखल घेतली जात नाही.
माथाडी चळवळीमध्ये घुसखोरी केलेल्या गुंडांचा बंदोबस्त करावा, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नव्यामुंबईतील बाजार आवारात बांगलादेशींचा झालेला शिरकाव रोखणे, पिंपरी-चिंचवड पुणे येथिल मे. टाटा मोटर्स लिमिटेडमधील माथाडी कामगारांवर खोटे गुन्हे दाखल केले आहेत, त्याची व मुकादमाच्या हत्येची चौकशी करण्याची मागणी देखिल माथाडी कामगार नेते नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी यावेळी केली आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# महाराष्ट्र देशा!

सह्याद्रीचे आम्ही मावळे.. शिवबांची आशा..
प्रणाम करितो आम्ही,आमुच्या महाराष्ट्र देशा..||

राष्ट्रभक्त अन् सेनानींच्या क्रांतीच्या देशा..
मशाल घेऊनी स्वातंत्र्याची क्रांती घडवली देशा..|
सह्याद्रीचे आम्ही मावळे.. शिवबांची आशा..
प्रणाम करितो आम्ही,आमुच्या महाराष्ट्र देशा..||

शाहू, फुले अन् भिमरायांच्या उज्वल महान देशा..
संतांच्या वाणीने दाविली अध्यात्माची दिशा..|
सह्याद्रीचे आम्ही मावळे.. शिवबांची आशा..
प्रणाम करितो आम्ही, आमुच्या महाराष्ट्र देशा..||

सह्याद्रीचे गडकिल्ले अन् अजस्त्र दुर्गांच्या देशा..
देशभक्तीचे बीजे रोवली या छत्रपतींच्या देशा..|
सह्याद्रीचे आम्ही मावळे.. शिवबांची आशा..
प्रणाम करितो आम्ही, आमुच्या महाराष्ट्र देशा..||

सुजलाम सुफलाम पात्र नद्यांचे या मंगल देशा..
बोलीभाषा अनेक आमुच्या एक मराठी भाषा..|
सह्याद्रीचे आम्ही मावळे.. शिवबांची आशा..
प्रणाम करितो आम्ही, आमुच्या महाराष्ट्र देशा..||

**- राजकुमार तडस कौलखेड,** अकोला

# १ मे जागतिक मराठी भाषा दिन उत्साहात साजरा व्हायला हवा...

दरवर्षी आपण मोठ्या उत्साहामध्ये संपूर्ण महाराष्ट्र राज्यात १ मे हा दिवस महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करतो,ही अतिशय आनंदाची बाब आहे;पण त्यासोबतच याच दिवशी जागतिक मराठी भाषा दिन हा सुद्धा तेवढ्याच उत्साहाने, आनंदाने, गौरवाने साजरा व्हायला हवा,असे मत मराठी भाषा



प्रा. दीपाली सोसे, अकोला

अभ्यासक, प्रसिद्ध लेखिका तथा नर्सरी ते आठवी या इयत्तेपर्यंत सीबीएसई आणि आयसीएसई शाळांमध्ये मागील तीन वर्षांपासून शिकवल्या जात असलेल्या अभिजात मराठी आणि माय मराठी या पाठ्यपुस्तकाच्या लेखिका, प्रा.दीपाली आतिश सोसे यांनी व्यक्त केले आहे.

आपली भाषा ही आपली जननी असते, त्या अर्थाने मराठी ही आपली मातृभाषा आहे. आणि आपल्या आईचा वाढदिवस हा १ मे महाराष्ट्र शासनाने जाहीर केल्याने हा दिवस त्याच उत्साहाने साजरा व्हायला हवा; आणि हा दिन साजरा व्हावा म्हणून गेली अनेक वर्षे मी या दिनाचे महत्व प्रत्येकाला कळावे, या दिनाचा प्रचार-प्रसार व्हावा, याकरिता माझ्या लेखनाद्वारे, व्याख्यानांद्वारे हा विचार पोहोचवण्याचं काम मी सातत्याने अत्यंत प्रामाणिकपणे करीत आहे, सर्व मराठी भाषिकांनीच नव्हे; तर महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक नागरिकांनी हा दिवस त्याच उत्साहाने मोठ्या सणांसारखा साजरा करावा,अशी प्रांजळ अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, तेव्हापासूनच १ मे हा दिवस मराठी भाषिकांचे राज्य म्हणून मराठी राजभाषा दिन किंवा जागतिक मराठी भाषा दिन म्हणून अतिशय आनंदात व उत्साहात साजरा व्हायला हवा,महाराष्ट्र राज्याची अधिकृत राजभाषा ही मराठीच असेल,असे जाहीर करीत तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या सरकारने मराठी राजभाषा अधिनियम १९६४ हा सर्वात आधी ११ जानेवारी १९६५ या दिवशी प्रसिद्ध केला.१९६६ पासून तो अमलातही आला. तेव्हापासून दरवर्षी दि.१ मे या दिवशी मराठी राजभाषा दिन किंवा जागतिक मराठी भाषा दिन म्हणून महाराष्ट्र शासनासह प्रत्येक महाराष्ट्रीयन व्यक्ती,संस्था तसेच विविध मंडळे जगभरात अतिशय आनंदाने व विविध उपक्रमांनी हा दिवस अतिशय आनंदाने साजरा करून महाराष्ट्राचा मराठी बाणा जपायला हवा, अशी भावना यावेळी प्रा.दीपाली सोसे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी राज्यकारभार हा इंग्रजी भाषेतून चालत होता, त्यामुळेच राजभाषा मराठीचा राज्यातील शासन व्यवहारात वापर करण्याचे धोरण राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे घेतलेल्या दि.५ जुलै १९६० च्या निर्णयानुसार भाषा संचालनालय स्थापन झाले; व महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार महाराष्ट्राची राजभाषा मराठीत असेल, असे जाहीर करण्यात आले.महाराष्ट्र राज्यासाठी,मराठी माणसांसाठी मराठी भाषा दिनाचे महत्त्व अनन्य साधारण असल्याने महाराष्ट्रातील प्रत्येकाने हा दिवस त्याच उत्साहाने साजरा करावा,अशी भावना प्रख्यात लेखिका प्रा.दीपाली सोसे यांनी व्यक्त केली आहे.

## महाराष्ट्र दिन





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

**आजच आहे कामगार दिन**
**त्यांच्या प्रतिही कृतज्ञ होवू**
**राज्याला बलशाली करण्या**
**मिळून सारे संकल्प करू**

**महाराष्ट्र राज्याची पासष्टी**
**आज होणार ती साजरी**
**राज्यातील नेतृत्व करेल**
**विकासाची कल्पना गोजरी**

**छत्रपतींचा महाराष्ट्र आता**
**सुजलाम सुफलाम करूया**
**कणखर राकट दगडांच्या**
**देशाला सदैव श्रेष्ठ मानू या**

## || अभंगवाणी ||

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



अमेरिका राज्यामध्ये
शिकागो शहर येथे |
आंदोलन केले तेथे
मजुरांनी ||

मजूर बलिदानाचा
आठवणींचा दिवस |
हा कामगार दिवस
असतो या ||

कामगार हक्कासाठी
कामगारांची लढाई |
पडलेत धाराशाही
कामगार ||

त्यांच्या बलिदानामुळे
आठ तास काम झाले |
हक्क मिळवून दिले
कामगारा ||

# जय जय महाराष्ट्र माझा...



विचारायण

साधना काळबांडे
9767993827




''जय जय महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा ''या राजा बढे यांच्या कवितेच्या सुंदर ओळी महाराष्ट्रा बद्दल खूप काही सांगून जातात.महाराष्ट्र म्हणजे भारताच्या शिरावरील जणू मुकुटमणी आहे. महाराष्ट्र राज्याशिवाय भारत देश पूर्णच होवू शकत नाही. आर्थिक, राजकीय, औद्योगिक उलाढाल आपल्या महाराष्ट्रात होते. महाराष्ट्रात अनेक महत्त्वाची शहरे आहेत. ज्यामुळे देशाच्या विविध क्षेत्रात योगदान आहे. महाराष्ट्र निसर्गाची देण मिळालेले राज्य आहे. निसर्गाने सरळ हाताने महाराष्ट्राला देण दिली आहे. निसर्गाने सजलेला हा महाराष्ट्र आपली देशातच नव्हे तर जगातही एक वेगळी ओळख करून देतो. महाराष्ट्राची ही भूमी साधू संतांच्या चरणांनी पावन झालेली आहे. या मातीत अनेक साधुसंत, समाज सुधारक होऊन गेले.त्यामुळे समाजाला एक नवे वळण मिळाले. महाराष्ट्राला अनेक सोनेरी किनार असलेला इतिहासही आहे जो जगाच्या इतिहासामध्ये अमर झालेला आहे.

अनेक साधुसंतांनी या भूमी जन्म घेऊन या भूमीला पावन केले आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव,संत तुकाराम, संत एकनाथ, रामदास स्वामी, तसेच संत चोखामेळा,संत गोरोबा,संत बहिणाबाई,संत सावता माळी, संत गोरा कुंभार, संत जनाबाई, संत मुक्ताबाई,संत सोपान देव,संत गोरोबा,संत निर्मळा, संत निवृत्तीनाथ, संत बँका, संत भागू, संत रोहिदास,संत विसोबा खेचर,संत सोयराबाई, संत नरहरी सोनार,संत कान्होपात्रा अशा कितीतरी संतांनी या भूमीला समृद्ध केले आहे तसेच संत गाडगे महाराज संत तुकडोजी महाराज यांनीही समाजाला आपल्या वाणीतून दिशा देण्याचे काम केले आहे. या थोर संतांनी महाराष्ट्र अमर केला आहे. नद्या डोंगर पर्वतांनी महाराष्ट्राची समृद्धी अतिशय मोठी आहे.अनेक नद्यांनी या पावनभूमीला देशाच्या इतिहासामध्ये मानाचे स्थान दिले आहे.त्यात गोदावरी, रेवा, वरदा, कृष्णा, कोयना, भद्रा, तापी, पूर्णा, वैनगंगा, मांजरा भीमा आणि त्यांच्या उपनद्यांनी महाराष्ट्राला देशाच्या नकाशात मानाचे स्थान दिले आहे. तसेच अनेक राजे महाराजे यांनी या भूमीवर आपले पराक्रम गाजवले आहेत. त्यात आपण छत्रपती शिवाजी महाराज यांना कधीच विसरू शकणार नाही. ज्यांनी या महाराष्ट्रामध्ये स्वराज्य व सुराज्य निर्माण केले. आपले जीवन या देशाच्या मातीला पराक्रमाने अर्पण केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे उपकार हा महाराष्ट्र कधीच विसरू शकणार नाही. छत्रपती शाहू महाराज छत्रपती,संभाजी महाराज,सयाजीराव गायकवाड, अहिल्याबाई होळकर इ. या एक ना अनेक महान विभूतींनी यांनी या महाराष्ट्राला आपल्या कर्तृत्वाने फार मोठे केले आहे. महाराष्ट्राला प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहास आहे. प्रत्येक काळामध्ये महाराष्ट्राची विशेष कामगिरी दिसून येते. महाराष्ट्रामध्ये अनेक समाज सुधारक होऊन गेले ज्यांनी सामाजिक न्याय आणि सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर,न्यायमूर्ती रानडे,गोपाळ हरी देशमुख,धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे,पंडिता रमाबाई,ताराबाई शिंदे,कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा वसंतराव नाईक, पंजाबराव देशमुख,तुकडोजी महाराज,अण्णाभाऊ साठे,बाबा आमटे इ.यासारख्या समाजसुधारकांनी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

समाजातील अनेक समस्या दूर करून त्यावर उपाययोजना करण्याचे कार्य या थोर समाज सुधारकांनी केले आहे महाराष्ट्र भौगोलिक दृष्ट्या सुद्धा समृद्ध आहे अनेक थंड हवेचे ठिकाणे, डोंगररांगा, पर्वतरांगा इथं मोठ्या दिमाखाने उभ्या आहेत.महाबळेश्वर(सातारा), पाचगणी (सातारा), माथेरान (रायगड), इगतपुरी (नाशिक), आंबोली (सिंधुदुर्ग), चिखलदरा (अमरावती), भंडारदरा (पाथर्डी), म्हैस माळ (औरंगाबाद), जव्हार (पालघर)ही थंड हवेची ठिकाणे पर्यटन स्थळे आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेले किल्ले जिंकलेले किल्ले या महाराष्ट्राचे शान आहेत. मानाचे पान आहेत. ज्यात शिवाजी महाराजांनी अनेक किल्ले बांधले आणि जिंकले आहेत. त्यामध्ये अनेक प्रमुख किल्ले आहेत शिवनेरी, लोहगड, रायगड, प्रतापगड, पन्हाळा किल्ला,विजयदुर्ग,सिंधुदुर्ग,राजगड,जिंजीचा किल्ला,तोरणा किल्ला हा शिवाजी महाराजांनी जिंकलेला पहिला किल्ला. साल्हेर किल्ला,खांदेरी किल्ला, सुवर्णदुर्ग,सिंहगड, राजगड, विशालगड, पवनगड कमलगड,चंदगड,ताथवडा किल्ला,नांद गिरी किल्ला सज्जनगड, पांडवगड, महिमानगड,वंदनगड,, चंद्रगड,सुरगड,घोसाळगड,कडासरी असे एक ना अनेक किल्ले आज महाराष्ट्राचे वैभव आहेत.ज्यापासून आजची तरुण पिढी प्रेरणा घेत आहे आणि महाराजांचा इतिहास या पिढीला मार्गदर्शन करीत आहे छत्रपती शिवाजी महाराज,संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी महाराष्ट्राची खरी ओळख आहे. जिजामातेने या भूमीला आपले करण्यासाठी व स्वराज्य निर्माण करण्यासाठी ज्या छत्रपतींची जडणघडण केली ती इतिहासाला प्रेरणा देणारी आहे. अनेक जाती धर्माचे लोक असो अनेक वेशभूषा करणारे मराठी बोली असूनही अनेक बोलीभाषा बोलणारे लोक या भूमीत आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारतामध्ये मराठी भाषकांचे राज्य स्थापन करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळ हा लढा उभारला गेला.यामध्ये अनेक समाजसुधारकांनी नेत्यांनी सहभाग घेतला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये अनेकांनी योगदान दिले त्यामध्ये प्र. के अत्रे, मधु दंडवते प्रबोधनकार केशव ठाकरे,यांच्या भूमिका महत्त्वाच्या होत्या तसेच सेनापती बापट,क्रांतिसिंह नाना पाटील लालजी पेंडसे,अहिल्याबाई रागणीकर,यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ मोठे योगदान दिले आंदोलन हे खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले.महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी बलिदान १०६ हुतात्म्यांनी दिलेले आहे.आणि त्यांच्या या कार्यामुळे एक मे १९६० ला महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. एक मे १९६० ला मुंबई पुनर्रचना कायदा मंजूर झाला आणि या कायद्यानुसार एक मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. एक मे १९६० च्या पहाटे राजभवनात विशेष समारंभामध्ये पंडित नेहरू यांनी कामगार दिनाला महाराष्ट्र राज्याची अधिकृत घोषणा केली.मुंबई,कोकण, विदर्भ, मराठवाडा खानदेश,असे या महाराष्ट्राचे प्रकार पडले. प्राचीन काळात या महाराष्ट्राचे जुने नाव दंडकारण्य असे होते. महाराष्ट्राचे भारतामध्ये क्षेत्रफळ हे तिसऱ्या क्रमांकाचे आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूर आहे.वायव्यस गुजरात,उत्तरेस मध्य प्रदेश, ईशान्य व पूर्वे ला छत्तीसगड, आग्नेयला तेलंगाना,दक्षिणेस कर्नाटका व गोवा ही महाराष्ट्र शेजारी राज्य आहे महाराष्ट्राचे राज्य फळ आंबा हे आहे तर राज्य वृक्ष हे आंबा आहे. महाराष्ट्राचा राज्यपक्षी हा हरियाल आहे तर फुल ताम्हण हे आहे.

महाराष्ट्राचा राज्य खेळ हा कबड्डी आहे. अनेक प्रसिद्ध खेळाडू या मातीमध्ये जन्माला आलेले आहेत.अनेक लेखक कवी हे या महाराष्ट्रामध्ये होऊन गेले. आजही या महाराष्ट्रामध्ये लेखक कवींनी साहित्य निर्मिती करून या महाराष्ट्राला समृद्ध केले आहे. शैक्षणिक दृष्ट्या महाराष्ट्र हा भारतामध्ये प्रसिद्ध आहे अनेक शैक्षणिक संस्था येथे आहेत.या स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण होते.. आज महाराष्ट्रामध्ये ३६ जिल्हे आहेत. निसर्गाने सढळ हाताने दान दिलेल्या या महाराष्ट्र राज्यात आपण राहतो याचा प्रत्येकाला अभिमान वाटायला हवा. १ मे १९६० रोजी अस्तित्वात आलेल्या या महाराष्ट्राचा महाराष्ट्र दिन म्हणून आपण १ मे हा दिवस साजरा करतो या महाराष्ट्राबद्दल अनेकांनी गौरव उद्गार काढलेले आहे त्यात चक्रधर स्वामी म्हणतात '' महंत म्हणूनी महाराष्ट्र बोलीजे ''.अशा या समृद्धीने नटलेल्या महाराष्ट्र राज्याचा प्रत्येकाने सन्मान ठेवावा. ''हान महाराष्ट्र माझा पावन महाराष्ट्र माझा हिरवाकंच निसर्ग भव्य लाल काळी माती पाहुनी अभिमानाने फुगते छाती किल्ले कडे कपारी चा गाजावाजा महान महाराष्ट्र माझा दरा दरातून घुमती येथे शिवरायांच्या गौरवाचे शौर्यगान अशा पावन महाराष्ट्राला साऱ्या जगी असे मान''.

# महाराष्ट्र दिन चिरावू हो!



प्रासंगिक

प्रविण बागडे
नागपूर 9923620919




महाराष्ट्र दिन हा दिवस महाराष्ट्राच्या मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. राज्याच्या स्थापनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी झालेल्या मुंबई राज्याच्या विभाजनापासून महाराष्ट्र दिन हा सामान्यतः परेड आणि राजकीय भाषणे तसेच समारंभांशी संबंधित आहे. तसेच इतर विविध सार्वजनिक आणि खाजगी कार्यक्रमांबरोबरच महाराष्ट्राचा इतिहास आणि परंपरा या दिवशी साजरे करतात.

राज्य पुनर्रचना कायदा, १९५६ सार भाषांच्या आधारे भारतातील राज्यांसाठी सीमा परिभाषित केल्या गेल्या. या कायद्याचा परिणाम म्हणून जे मुंबई राज्य निर्माण झाले, ते मात्र वेगवेगळ्या मराठी, गुजराती, कच्छी आणि कोकणी भाषा बोलल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या क्षेत्रांचे मिळून बनले होते. संयुक्त महाराष्ट्र समिती मुंबई राज्याचे दोन राज्यात विभाजन करण्याच्या चळवळीत आघाडीवर होती; एक भाग जेथे लोक प्रामुख्याने गुजराती आणि कच्छी बोलतात आणि दुसरा भाग जेथे लोक प्रामुख्याने मराठी आणि कोकणी बोलतात. २५ एप्रिल १९६० रोजी भारतीय संसदेने लागू केलेल्या बॉम्बे पुनर्रचना कायदा, १९६० नुसार या चळवळीचा परिणाम म्हणून महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांची निर्मिती झाली. हा कायदा १ मे १९६० रोजी अंमलात आला.

२१ नोव्हेंबर १९५६ दिवशी फ्लोरा फाउंटनच्या परिसरात तणावाचे वातावरण होते कारण राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले त्यामुळे मराठी माणसे चिडली होती. सर्वत्र छोट्यामोठ्या सभांमधून या निर्णयाचा निषेध होत होता. या संगठनामुळे कामगारांचा एक विशाल मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाऊंटनासमोरील चौकात येण्याचे नियोजन झाले. त्यानंतर प्रचंड जनसमुदाय एका बाजूने चर्चगेट स्थानकाकडून व दुसऱ्या बाजूने बोरीबंदरकडून गगनभेदी घोषणा देत, फ्लोरा फाउंटनकडे जमला. मोर्चा पोलिसी ताकद वापरून उधळून लावण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला. मात्र अढळ सत्याग्रहीं मुळे पोलिसांचे हे प्रयत्न अयशस्वी झाले आणि पोलिसांना गोळीबाराचा आदेश मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याद्वारे देण्यात आला. गोळीबार झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक हुतात्मे झाले.

या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे व मराठी माणसाच्या आंदोलनामुळे सरकारने नमते घेऊन १ मे, १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. त्यानंतर १९६५ मध्ये त्या जागी हुतात्मा स्मारकाची उभारणी करण्यात आली. जय जय महाराष्ट्र माझा..गर्जा महाराष्ट्र माझा.. सर्व मराठी बांधवांना आणि महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला महाराष्ट्र आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

''आम्हाला अभिमान आहे महाराष्ट्रीय असण्याचा, आम्हाला गर्व आहे मराठी भाषेचा आम्ही जपतो आमची संस्कृती आमची निष्ठा आहे मातीशी.''

# स्पर्धा परीक्षा म्हणजे काय?

प्रा. इस्माईल खान पठाण
मो. ७९७२१८८९८९

स्पर्धा परीक्षा ही खूप व्यापक आणि मोठी संकल्पना आहे. ज्यामधे राज्य सरकार आणि केंद्र सरकार शासकिय सेवेतील सर्व जागांची भरती या परीक्षेद्वारे केली जाते . शासन गरजेनुसार पदभरती करत असते उच्च पदस्थ अधिकाऱ्याची जी भरती प्रकिया असते ती स्पर्धा परीक्षेतून केली जाते त्याला स्पर्धा परीक्षा असे मनतात स्पर्धा परीक्षा अशी असते की, ज्यात ऐका जागेसाठी अनेक अर्ज येत असतात व अनेक उमेदवार स्पर्धा करत असतात. या परीक्षेमध्ये उमेदवाराची निवड त्याच्या कौशल्य,नॉलेज, आणि क्षमताच्या आधारे केली जाते. स्पर्धा परीक्षेत वस्तुनिष्ठ प्रश्न विचारले जातात.आणि त्याचे मूल्यमापन गुणदान पद्धतीने होते आणि परिक्षा झाल्यावर त्यांची निवड मेरिट नुसार होते. त्यामूळे स्वतंत्रपणे अभ्यास करणे महत्वाचे आहे कारण त्यामुळे झालेल्या चुकां आपणास समजू शकतात. व स्पर्धा परीक्षेला सराव देणे महत्वाचे आहे. त्यामुळे तुम्हाला स्पर्धा परीक्षेची ओळख होईल तसेच तुमची प्रगती समजण्यास मदत होईल स्पर्धा परीक्षेचे तयारी साठी सुपरिचित आणि महत्वाच्या ग्रंथाची निवड करा,ऐक किंवा दोन संदर्भ पुस्तके वाचा आणि त्या माध्यमातून अभ्यास करा दैनंदिन वृत्तपत्र वाचा म्हणजे तुमच्या जनरल नॉलेज आणि चालू घडामोडी पाठ राहतील तसेच तुमच्या महितीत अधिक भर पडेल. जर तुम्हाला अभ्यासात अडचण येत असेल तर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाची मदत घ्या एक अनुभवी मार्गदर्शक तुम्हाला तुमच्या अभ्यासात योग्य दिशा देईल. आणि विशेष म्हणजे स्पर्धा परिक्षसाठी सक्सेस होण्यासाठी शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घ्या. पूरेशी झोप घ्या, निरोगी आहार घ्या, आणि नियमित व्यायाम करा. अभ्यासाला सुरुवात करण्याअगोदर अभ्यासच नियोजन करा, ऐक चांगली योजना तयार अभ्यासासाठी शांत व स्वच्छ वातावरण निवडा त्यामुळे तुमच लक्ष केंद्रित होण्यास मदत होईल आणि विशेष म्हणजे तुम्ही ज्या स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहात त्या परीक्षे करीता सर्व माहिती गोळा करा. जसे परिक्षा कधीआहे? वर्षात किती वेळा परिक्षा होते! कोणत्या विषयात प्रश्न विचारतात? निगेटिव्ह मार्किंग आहे का? मागच्या परीक्षेचा कट ऑफ मार्क्स कसा होता? संबधित स्पर्धा परीक्षेत कोणत्या स्तरावर प्रश्न विचारले जातात? प्रश्न सोडवायला वेळ किती? चालू घडामोडीचे प्रश्न किती? पेपर ऑनलाईन का ऑफलाईन हे पाहावे? परिक्षा किती स्टेप मधे होतात?.. म्हणजेच आपल्याल सर्व परीक्षेचा आवाका येईल आणि सर्वात महत्त्वाचं आपल लक्ष ठरवा कोशिष करनेवाले की कभी हार नहीं होती युही उनकी जयजयकार नहीं होती...

# मुलांना वेध लागले सुटीचे!



मागोवा

चैताली वरघट
९८३४५८३६८५



**मुलांना वेध लागले सुट्टीचे**
**मामाच्या गावाला जाण्याचे**
**मौज मज्जा मस्ती करण्याचे**
**मामाला त्रासून सोडण्याचे**

शाळेत जाणाऱ्या मुलांना सतत वाटतं असते कीं सुट्टीचा दिवस म्हणजे रविवार लवकर यावं, हा सर्वात जास्त बऱ्याच मुलांना आवडणारा दिवस, सुट्टीच्या दिवशी मुलांना खूप मज्जा मस्ती करावी वाटत असते, बऱ्याच मुलांच्या शाळा या सकाळी असतात, त्यामुळे मुलांना सकाळी लवकर उठाव लागते, मुलांची शाळेत जायची इच्छा जरी नसली तरीही आई जबरदस्तीने मुलांची तयारी करून शाळेला पाठवते, मुलांची पूर्ण झोप होवो किंवा नाही, तेच मुलं केव्हा रविवार येते, याची सतत मुलं वाट बघत असतात, शनिवारी शाळेतून आल्या आल्या आईला म्हणतात, उद्या शाळेला सुट्टी आहे.

मला सकाळी लवकर उठवायचं नाही, मी खूप वेळपर्यंत झोपणार,आणि दुसऱ्या दिवशी होते ही तसंच, मुलं बऱ्याच वेळ पर्यंत झोपतात, त्या दिवशी आंघोळही उशिराच करतात, सुट्टीचा आनंद मुलं घेत असतात आणि सोमवार आला की तेच मग दप्तराच ओझं पाठीवर, तोच अभ्यास, मुलांना अशा वेळी नेहमी समजून सांगावं लागते, शिक्षण खूप महत्त्वाचा आहे.

शिक्षणाने माणूस मोठा होतो, पण मुलांचं काही नाही त्यांना फक्त कस तरी शाळेला जाऊन, भरभर लिहून, पाठांतर करून अभ्यास संपवायचा असतो, शाळेत जायच्या दिवशी बऱ्याच मुलांना खूप कंटाळा येत असतो, बऱ्याच मुलांना शाळा नकोशी वाटते, पण सतत त्यांना शिक्षणाची जाणीव करून त्यांना शाळेला पाठवावं लागते, असं करत वर्षाच्या शेवटी वार्षिक पेपर येतात, तेव्हा मात्र मुलं या दरम्यान खूप आंनदात दिसतात, मुलं या दरम्यान सतत शाळेच्या सुट्यांचा विषय घेऊन आईबरोबर, मित्रानं बरोबर बोलत असतात, एकदा पेपर झाले की मस्त एन्जॉय करू असं म्हणत शाळेचे पेपर मुलं आनंदाने देतात, यादरम्यान बऱ्याच गोष्टी मुलं करतात, मी सुट्टीमध्ये मामाच्या गावाला जाणार, कोणी म्हणतो की मी माझ्या काकाच्या गावाला जाणार म्हणतात, तर काही मुलं मी माझ्या मावशीच्या गावाला जाणार, आणि असं म्हणत म्हणत ते स्वतःच्या आईलाही त्रासून सोडतात, की आपण गावाला जाऊ सुट्ट्या लागल्यावर, आपण सर्व लवकरात लवकर मामाच्या गावाला जाऊ, त्यांच्या मनात सुट्टीचा काही वेगळाच आनंद संचारलेला असतो, मग जेव्हा शाळेला सुट्ट्या लागतात तेव्हा मुलं आईलाच खूप त्रासून सोडतात, आईला बॅग भरायला म्हणून स्वतः आईची बॅग भरायला मदत करतात, स्वतःचेही कपडे भराभर भराभर बॅग मध्ये भरतात,आणि आपल्याला लवकर मामाच्या गावाला जायचं आहे असं आईला म्हणत, आईची इच्छा असो किंवा नसो, तरीसुद्धा आईला ते मामाच्या गावाला घेऊन जातात, मामा बद्दल मुलांच्या मनात असलेलं प्रेम, जिव्हाळा याच तर वर्णन करणे अशक्य आहे.

मामा हा जणू आईसारखाच जीव लावत असतो, माहेरी गेल्यानंतर मात्र आई ही मुलांना बघून ती सुद्धा तिचं बालपण आठवत असते, तिला तिच्या मुलांमध्ये तिच बालपण दिसते,ती तिचं बालपण त्या मुलांमध्ये बघत असते, मुलं मामा बरोबर, मावशी बरोबर, आजी आजोबांन बरोबर खेळतात, मस्ती करतात, मामांच्या मुलांना तर खूपच त्रासून सोडतात, मामी सुद्धा मुलांच्या आवडीचे पदार्थ प्रेमाने बनवून देते, मामाकडे बऱ्याच वस्तूसाठी हट्टही केल्या जातो, मामा श्रीमंत असो किंवा नसो पण मामा हा मामाच, मुलांना हव्या वाटणाऱ्या वस्तू, खेळणी महाग जरी असली, तरी सुद्धा मामा हा मुलांना खेळणी घेऊन देतो, बहिणीच्या मुलांची प्रत्येक इच्छा पूर्ण करतो, मुलांना हवं असलेली खेळणी आनंदाने घेऊन देतो, मुलंही मामाच्या मांडीवर तर कधी मामाच्या खांद्यावर बसून सुट्ट्यांचा आनंद घेत असतात, उन्हाळ्याच्या सुट्ट्यात मुलांना आंबे खाण्याची इच्छा झाली तर मामा आंबे घेऊन येतात.

कधी खरबूज तर कधी टरबूज, मामा वेगवेगळे उन्हाळ्याचे फळ मुलांसाठी घेऊन येतात, मुलं ही आनंदाने ते फळ खातात, मामा हा मुलांना शेतात घेऊन जातो, शेतामध्ये मोठ झाड असते, झोके घ्यायला मामा त्या झाडाला दोर बांधून देतो आणि त्यावर मुलांना झोके घ्यायला सांगतो, प्रत्येक दिवशी वेगवेगळे खेळ ठरलेले असतात, मामा मुलांबरोबर वेगवेगळे खेळ खेळतो, मुलांना मामाच्या गावाला गेल्यानंतर जसा आनंद वाटतो, तसाच मुलांच्या आईला सुद्धा वाटत असतो, माहेरी आल्यानंतर आईलाही थोडं कामापासून आराम मिळतो, काही दिवस का होईना पण मुलांबरोबर तिलाही आईच्या कडे म्हणजे माहेरी करमते. शाळेच्या सुट्यांचे एक एक दिवस खूप आनंदाने एन्जॉय करत धमाल करत निघून जातात, आणि पुन्हा मग मुलांना वेध लागते सुटीचे...

**शाळेच्या सुट्ट्यांचा वेध**
**मुलांना लागतो जेव्हा**
**मुलांना सतत वाटते**
**सुट्ट्या लागतात केव्हा**

## लोकजागर

# गरिबांना मोफत अन्नदान करणारे 'अक्षय चैतन्य'चे महास्वयंपाकघर!



**लोक सेवार्थ**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत सर्वाधिक श्रीमंत लोक राहत असले तरी याच शहरात हजारो लोकांना भुकेलं झोपावं लागतं. नेमकी हीच गंभीर बाब ध्यानात घेऊन 'अक्षय चैतन्य' या सेवाभावी संस्थेनं भायखळ्यात महास्वयंपाकघर उभारले आहे. या महास्वयंपाक घरात दररोज तब्बल २५ हजार गरजू लोकांसाठी मोफत जेवण बनवले जाणार आहे. त्यामुळे या मायानगरीत आता कुणीही उपाशी झोपणार नाही. कोणत्याही दिवशी तब्बल २५ हजार लोकांना जेवण देऊ शकेल अशा क्षमतेच्या या संस्थेच्या केंद्रीय स्वयंपाकघराचे (सेंट्रलाइज्ड किचन) उद्घाटन राज्याचे माजी पर्यटन व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते झाले होते . सरकारी रुग्णालयांमध्ये उपचारार्थ दाखल रुग्णांच्या नातेवाईकांना उपाशी रहावं लागू नये, यासाठी मुंबईतील 'अक्षय चैतन्य' ही सेवाभावी संस्था कौतुकास्पद कार्य करत आहे. संस्थेच्या केंद्रापासून १० मैल त्रिज्येच्या परिसरात कुणीही उपाशी राहणार नाही, ही या संस्थेची शपथ प्रत्यक्षात उतरत आहे. हरे कृष्ण मूव्हमेंट चॅरिटेबल फाऊंडेशन'चा उपक्रम असलेल्या 'अक्षय चैतन्य'ने मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय (डीएमईआर) यांच्यासोबत समन्वय साधून भूकमुक्तीसाठीच्या अन्नदानाचा हा उपक्रम राबवला जाणार आहे.समाजातील गोरगरीब लोक आणि दररोज अन्ना अभावी उपाशीपोटी झोपणारी लहान बालक यांच्यासाठी हा अन्नदानाचा उपक्रम अक्षय चैतन्य संस्था राबवीत आहे. गरिबांना किमान डाळ,भात,भाजी आणि पोळी असा मुलभूत आहार देऊन त्यांना जगविण्याचा संस्थेचा उदात्त असा उद्देश आहे. ''रुग्णालयांतील केवळ रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठीच नव्हे, तर स्थलांतरीत मजूर, झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे गोरगरीब आणि बालके यांचीही भूक मिटवण्यासाठी अक्षय चैतन्य त्यांना जेवण देणार आहे. अत्यंत गरीब घरच्या बालकांसाठी आम्ही शाळांमध्येही जेवण उपलब्ध (मील प्रोग्राम) करुन देणार आहोत''झोपद्पात्तांमध्ये महापालिकांच्या शाळेमध्ये शिकणारी अनेक मुल हि पौष्टिक खान्याभावी कुपोषित असतात अशा बालकांना पौष्टिक अन्न पुरविणे आणि देशाची भावी सुधृढ पिढी घडविणे हा हेतू देखील आहे, अशी माहिती 'अक्षय चैतन्य'चे सीईओ विकास परछंदा यांनी दिली.हैदराबादमध्ये अशाच प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबवून संस्थेने हैदराबादला भूकमुक्त केले आहे. संस्थेच्या हैदराबादमधील केंद्रीय कम्युनिटी किचनची क्षमता दररोज ५० हजार लोकांना जेवण पुरवण्याइतकी आहे. संस्थेमार्फत 'स्वस्थ आहार' हा कार्यक्रमही राबवण्यात येतो, ज्या अंतर्गत हैदराबादमधील ४०० सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना दररोज बाजरी आदी भरड धान्याचा नाश्ता पुरवला जातो. याच धर्तीवर आता मुंबईतील गोरगरीब- गरजू कुटुंबांतील व्यक्तींना, रुग्णांच्या नातेवाईकांना तसंच बालकांना पोषक जेवण मोफत उपलब्ध करुन देण्याचा 'अक्षय चैतन्य'चा निर्धार आहे.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 28




### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
ऊर
कर्म
काग
कैरी
गर
गात्र
जर
दिर
धन
धाम
नीर
पंख
पग
बक
भार
मल
रग
वादा
वेळ
सत्र
सर
हत
हरा

**तीन अक्षरी**
ओनामा
कातर
घागर
चबर
चेतक
तगर
धोतरा
नौकरी
प्रकार
पारद
पंगत
पिनाक
भारत
मलम
मसाला
रजक
लालसा
वरात
वत्सल
विवर
विमाता
वेतन
शरद
सगर
सरण
सवड
सांप्रत

**चार अक्षरी**
असंमत
अपमान
उपवन
कतवार
रखरख
रवरव
वखवख
शवासन
सरदार
चारुगात्री
ललकार
हरसाल
हलधर

**पाच अक्षरी**
नगरपाल
पहिलवान
रामनवमी
सततधार
सरनौबत
सरमिसळ
साखरभात

**सहा अक्षरी**
ओबडधोबड
कानउघाडणी
चरकसंहिता

**आठ अक्षरी**
चार दिवस
सासूचे

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | न | वा | | सिं | ह | | ला | | ज | वा | न | | उ |
| ज | ग | त | | हा | ल | | व | र | मा | य | | रा | धा |
| पू | र | | पा | व | | पु | ण्य | वा | न | | पों | | र |
| त | | अ | व | लो | क | न | | ना | त | ल | ग | | |
| | | ज | न | क | | विं | | | | क | ल | दा | र |
| न | व | रा | | न | रो | वा | कुं | ज | रो | वा | | नी | |
| व | | म | स | | म | ह | ती | | म | | सा | | म |
| नी | | र | म | ण | | | | अ | ह | म | ह | मि | का |
| त | न | | ज | | | प | | ह | र्ष | | स | र | |
| | र | | दा | | र | थ | | वा | क | डा | | गी | त |
| | क | स | र | त | | क | मा | ल | | ल | क | | मा |
| आ | पा | दा | | व | ज | | | | ख | डा | ष्ट | क | |
| क | ल | र | व | | प | रि | च | र | | | सा | ल | स |
| र्ण | | त | ग | र | | | र्म | | अ | सा | ध्य | | म |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 408



**आडवे संकेत :—**
2) छायाचित्र काढणे
5) पायाच्या नखापासून डोक्याच्या शेंडी पर्यंत
9) स्वर्गलोकीत कळ लावणारा देवर्षी
12) दर, मूल्य 14) मोठी मशाल
16) पैसा दिला की सर्व अडलेली कामे सहज होतात या अर्थाची एक म्हण
18) शरीराचा नाजूक व सुंदर बांधा
20) सायंकाळी देवघरात दिवा लावण्याचे दीपपात्र
22) पोळीचा एक प्रकार
23) धाव (इं.)
24) अभिप्राय, विचार
26) योग्य सत्कार किंवा व्यवस्था
28) उपकरण
30) प्रयत्न, कष्ट
31) बारीक झणझण
33) सारखे, तुल्य
35) लाकूड
36) त्याचा, तिचा (सं.)
38) नटून थटून गावभर भटकणारी स्त्री
39) शिवधनुष्य
40) रामायणातील खलनायक
41) इंग्रजीत बदक
43) विजयी झालेला, जिंकलेला
44) सौख्य, मनास वाटणारी स्वस्थता
45) आंब्याचा रस
46) सांखळी
47) मनाला रम्य वाटणारे
49) आपल्याच मनाप्रमाणे वागणारा
51) जनावरांचा समूह, झुंड
52) विनाकारण, उगाचच
53) पुरूष
55) साल, संवत्सर
56) लयास जाणे, मावळणे
57) द्रव, रूची
59) दुर्मीळता, अभाव
60) टीका, समीक्षण
62) निरोप, बातमी
64) चुरशीचा खेळ, झुंज
67) भान सुटलेला 68) स्पष्टीकरण
69) नाही म्हणणे, नापसंती
71) पायी जाता येईल अशी वाट
73) मोराचे ओरडणे
75) देवाच्या नावे भजन कीर्तन करीत रात्रभर जागणे
76) विपत्ती, कठीण परिस्थिती
77) थंड, गार
78) मध्यप्रदेशातून वाहणारी एक प्रमुख नदी
79) वड
80) नवीन, नऊ
81) बाळंतिणीची सकुशल सुटका करणारी
82) स्मृतिचिन्ह
83) वाळवंट

**उभे संकेत :—**
1) सूर्य, प्रभा प्रसारित करणारा
3) बशीचा जोडीदार
4) कमळांचा समूह
6) खजिन्यावरचा मुख्य अधिकारी
7) स्कंध 8) अंधार
9) स्त्री, महिला 10) स्तंभ
11) दाबून टाकणे, शांत करणे
13) उलटी, ओकारी
15) धांदल, त्रेधातिरपिट
17) मस्तक विहीन शरीर
19) नरकलोकी पापीजनांना भोगाव्या लागणाऱ्या यातना
21) उचलण्यास भारी, वजनी
25) मनाचे समाधान करून घेणे (उर्दू)
27) प्रार्थना, स्तुति
28) स्वतंत्रतापूर्व काळात 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संस्थेची स्थापना करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांचे आडनाव
29) तपकीर
32) आडदांडपणाने केलेले कार्य
34) अहंकारी, घमेंडी
35) काळ्या पाठीचा हरीण
37) ईश्वर, प्रभू
39) महाभारतात भीष्मांची उपाधि
40) चितेवरील भस्म
42) हाताची नाडी बघून केलेले आजाराचे निदान
44) फूल, पुष्प
45) मन वेधून घेणे, ओढणे
46) चावी, किल्ली
48) सेवक, चाकर
50) आवरण, चिलखत
52) श्रीविठ्ठलाचे एक परमभक्त संत
54) रचना करणारा
56) पैसा, आशय
58) एक भित्रा पण चपळ प्राणी
60) विचारविनिमयासाठी जमलेली मंडळी
61) मदन
62) कायदा 63) लाजिरवाणा, ओशाळलेला
65) तळहाताची मागची बाजू
66) देण्यालायक, देणारा
67) चहूबाजूंनी पाण्याने वेढलेली जमीन
70) राजकारण, डावपेंच
71) पारड्यातील विषमपणा काढून टाकण्यासाठी त्यात टाकलेला जिन्नस
72) पांथस्थ, प्रवास करणारा
74) दूधात एखादे फळ टाकून केलेले पक्वान्न
75) मुलीचा नवरा ●
(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ध | र | प | क | ड | | शु | क | | पा | | रा | | नी | र | स |
| न | ग | द | | ळ | | क्र | | ऋ | ण | | धे | | र | ज | क |
| ग | ड | | म | म | ता | | मा | | उ | भ | य | प | क्षी | | र्म |
| र | | पा | क | ळी | | कु | त्रा | | ता | ड | | ठा | र | | क |
| | ख | ल | ब | त | | रू | | नि | रा | क | र | ण | | सु | |
| वि | ड्य | | रा | | | क्षे | त्र | | | | क्ष | | सं | धा | न |
| के | ष्ट | क | | द | त्ता | त्र | य | | दि | न | क | र | | र | व |
| प | क | ड | णे | | | | स्थ | | वा | | | क्र | ट | | रा |
| | | क | | उ | त्त | रा | | गं | भी | र | | ना | व | | त्र |
| ज | न | ल | ज्जा | | | णी | | | त | ट | स्थ | | क्र | ष्ठ | |
| ड | | क्ष्मी | | ज | मा | ल | गो | टा | | णे | | बी | | | त |
| भ | स्म | | गृ | ह | ल | क्ष्मी | | ळ | | | न | भ | | द | मा |
| र | | क | ह | र | | बा | | कु | टूं | ब | व | त्स | ल | | स |
| त | मा | | प्र | | आ | ई | | ट्या | | हू | | | स | ल | गी |
| | प | र्य | वे | क्ष | क | | पा | | त्रि | मू | र्ती | | | गा | र |
| क्र | न | | श | | स | | र्थ | | | ल्य | | क्षा | ल | न | |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी प्रयत्नांचा फायदा मिळेल. स्वतःवर विश्वास ठेवा. कामाच्या ठिकाणी तुमचं काम नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडणे शुभ राहील.

**वृषभ:** आज तुम्हाला आर्थिक बाबींमध्ये पूर्ण यश मिळेल. लपलेल्या शत्रूंमुळे व्यवसायात नुकसान होऊ शकते. नवीन मालमत्तेच्या खरेदी-विक्रीबाबत योजना बनवता येईल.

**मिथून :**आज घरातील समस्या सुटतील. प्रेमसंबंध असतील. तुम्हाला खास कामासाठी कुठेतरी जावे लागेल. तुमच्या अचूकतेबाबत काही समस्या उद्भवू शकतात.

**कर्क :** आज तुम्हाला कामावर किंवा घरी तुमच्या कुटुंबासह खूप अनावश्यक धावपळ करावी लागेल. ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक त्रास होऊ शकतो.

**सिंह :** आज कामाच्या ठिकाणी प्रचंड धाव-पळ होईल. प्रवास करताना तुमच्या मौल्यवान वस्तूंची विशेष काळजी घ्या. अन्यथा, तुमचे सामान हरवू शकते किंवा चोरीला जाऊ शकते.

**कन्या:** आज व्यवसायात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असेल. कोणतीही महागडी वस्तू खरेदी करण्यासाठी, तुम्हाला तुमची बचत काढून ती खर्च करावी लागू शकते.

**तुळ :** आज प्रेमसंबंधांमध्ये अनावश्यक मतभेद होऊ शकतात. तुमच्या बोलण्यावर आणि रागावर नियंत्रण ठेवा. आणि वेळेची नाजूकता समजून घ्या.

**वृश्चिक :** आज तुमचे आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले असेल. पोटाशी संबंधित आज-ारांना हलके घेऊ नका. अन्यथा तुम्हाला रुग्णालयात दाखल करावे लागू शकते.

**धनु :**आज तुम्हाला कामात रस कमी वाटेल. शरीरात आळसाची भावना निर्माण होईल. राजकारणात रस वाढेल. काही काम पूर्ण करण्यात अडथळा येऊ शकतो.

**मकर :** आज व्यवसायात चांगली विक्री झाल्यामुळे उत्पन्न चांगले राहील. तुम्हाला अडकलेले पैसे किंवा काम मिळू शकते. पोलिसांच्या मदतीने संपत्ती आणि मालमत्ता मिळविण्यातील अडथळा दूर होईल.

**कुंभ :** आज प्रेमसंबंध अधिक दृढ होतील. विवाहयोग्य लोकांना लग्नाशी संबंधित चांगली बातमी मिळेल. तुमच्या प्रिय व्यक्तीला भेटून तुम्हाला आनंद होईल.

**मीन :** आज तुमचे आरोग्य चांग-ले राहील. बाहेरचे अन्न खाऊ नका, अन्यथा उलट्या, जुलाब, पोटदुखी होऊ शकते.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### अयोध्येच्या बाबरी मशिदीची पहिली वीट पाक सेना ठेवणार: पलवाशा मोहम्मद जई खान



**इस्लामाबाद :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आक्रमक पावित्र्यात आहे. तर पाकिस्तानला भारतामुळे धडकी भरली आहे. भारत काहीही करु शकतो, याचा अंदाज पाकिस्तानला असल्याने त्यांच्या नेत्यांचे निरनिराळे विधाने येत आहेत. त्यातच आता अयोध्येतील बाबरी मशिदीवरुन पाकिस्तानमध्ये एक वादग्रस्त विधान करण्यात आलेलं आहे.बिलावल भुट्टे यांच्या पक्षाच्या महिला खासदाराने संसदेत विष ओकलं आहे. पाकिस्तानमधील विरोधी पक्षाच्या खासदार पलवाशा मोहम्मद जई खान यांनी संसदेमध्ये बाबरी मशिदीवरुन वादग्रस्त विधान केलं. बाबरी मशिदीची पहिली विट पाकिस्तानी सेना रचेल, असं त्या म्हणाल्या आहेत.पलवाशा जई खान यांनी भारताविरुद्ध विष पसरवण्याची भाषा करत म्हटलं की, तो दिवस दूर नाही जेव्हा एक पाकिस्तानी सैनिक बाबरी मशिदीच्या पायाची पहिली विट ठेवेल. पाकिस्तानचे सेनाप्रमुख जनरल असीम मुनीर पहिली अजान देतील.. आम्ही बांगड्या भरलेल्या नाहीत.पलवाशा एवढ्यावर थांबत नाहीत. त्या भारताला धमकी देतात. त्या म्हणतात, पाकिस्तानसोबत युद्ध सुरु झाल्यानंतर भारतीय शिख सैनिक पाकिस्तानसोबत लढणार नाही. जर भारताने पाकिस्तानवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर दिल्लीतल्या लाल किल्ल्याचं मैदान रक्ताने लाल होईल. पाकिस्तावर वाईट नजर टाकली तर त्यांचे डोळे काढले जातील.

### पहलगाम हल्ल्यानंतर बिश्नोई गँगची पाकिस्तानला थेट धमकी



**नवी दिल्ली :** गुंड लॉरेन्स बिश्नोई गँगने पाकिस्तानला धमकी दिली आहे. बिश्नोई गँगच्या वतीने पाकिस्तानला सांगण्यात आले आहे की, ते एका व्यक्तीला मारणार आहेत ज्याची बरोबरी लाखों लोकांसोबत होते. या धमकीसोबत दहशतवाद्याचा फोटोही जोडण्यात आला आहे.पहलगाम हल्ल्यानंतर देशभरातील लोक पाकिस्तान आणि तेथील दहशतवाद्यांवर प्रचंड संतापले आहेत. संपूर्ण देश सध्या सरकारकडून येणाऱ्या प्रतिसादाची वाट पाहत आहे, सोशल मीडियावर लोक पाकिस्तानवर हल्ला करण्याची मागणी करत आहेत. त्याच वेळी, काही लोक असे आहेत जे दहशतवाद मुळापासून नष्ट करू इच्छितात. दरम्यान, भारतातील धोकादायक गुंड लॉरेन्स बिश्नोई गँगने पाकिस्तानला धमकी दिली आहे.बिश्नोई टोळीच्या वतीने पाकिस्तानला सांगण्यात आले आहे की ते एका व्यक्तीला मारणार आहेत ज्याची बरोबरी लाखों लोकांसोबत होते.

### भारत-पाकिस्तान संघर्षात अमेरिकेची एण्ट्री

**नवी दिल्ली :** पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाची परिस्थिती कायम आहे. या हल्ल्यानंतर पाकिस्तान घाबरला आहे. त्याला भारताच्या पुढील हालचालीची भीती वाटावं असल्याचे समोर येत आहे. आता या सगळ्या परिस्थितीमध्ये अमेरिकेची एन्ट्री झाली आहे. अमेरिकेने भारत आणि पाकिस्तान दोघांशीही चर्चा केली आहे आणि हा मुद्दा चर्चेद्वारे सोडवला पाहिजे असे म्हटले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्या टॅमी ब्रूस यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे.अमेरिका पाकिस्तान आणि भारत दोघांच्याही संपर्कात आहे. याबाबत अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्या टॅमी ब्रूस म्हणाल्या की, ''अमेरिका दोन्ही देशांच्या संपर्कात आहे. अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्र्यांनी मला याबद्दल एक नोंदही दिली आहे. म्हणूनच आम्ही काश्मीरमधील परिस्थितीबाबत भारत आणि पाकिस्तानशी संपर्क साधत आहोत.''अमेरिकेने भारत आणि पाकिस्तानला परिस्थिती नियंत्रित करण्यास सांगितले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्र्यांना लवकरच भारत आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांशी बोलण्याची आशा आहे. ते इतर राष्ट्रीय नेत्यांना आणि परराष्ट्र मंत्र्यांना या मुद्द्यावर देशांशी संपर्क साधण्यास प्रोत्साहित करत आहेत. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्या टॅमी ब्रूस पुढे म्हणाल्या, ''अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा करतील. आम्ही त्या प्रदेशातील घडामोडींवरही लक्ष ठेवून आहोत आणि तुम्हाला माहिती आहेच की, आम्ही अनेक पातळ्यांवर भारत आणि पाकिस्तानच्या सरकारांशी संपर्कात आहोत.

# पाकिस्तान भारताच्या चक्रव्यूहात अडकणार

## परराष्ट्रमंत्र्यांनी मांडला मोदींचा दमदार संदेश

नवी दिल्ली, दि.३० वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्यासात अस्थायी सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी संवाद साधला. तसेच काल परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी स्लोव्हेनिया, पनामा, अल्जेरिया आणि गयानाच्या त्यांच्या समकक्षांशी स्वतंत्र फोनवरून संवाद साधला. यावेळी त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याबद्दल चर्चा केली. इतर अस्थायी सदस्य देशांमध्ये डेन्मार्क, पाकिस्तान आणि कोरिया प्रजासत्ताक यांचा समावेश आहे. परराष्ट्रमंत्र्यांनी संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्याशीदेखील फोनवरून संवाद साधला.यावेळी त्यांनी हल्ल्यातील ''गुन्हेगार, योजनाकार आणि समर्थकांना'' न्यायासमोर आणण्याचे आवाहन केले. जयशंकर यांनी गुटेरेस यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर सोशल मीडियावर पोस्ट



केली आहे. यामध्ये त्यांनी, 'पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा त्यांनी निषेध केला याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो.' असे म्हणत त्यांनी गुटेरेस यांच्याविषयी कौतुक केले. तसेच पुढे ते म्हणाले, 'या हल्ल्यातील गुन्हेगार, योजनाकार आणि समर्थकांना न्याय मिळवून देण्यासाठी भारत कटिबद्ध आहे.' अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने २५ एप्रिल रोजी या हल्ल्याचा निषेध करणारे निवेदन जारी केले.

परंतु पाकिस्तान आणि चीनच्या हस्तक्षेपामुळे ते कमी लेखण्याचा प्रयत्न करण्यात आला. भारत ते 'अपुरे' मानतो. जयशंकर यांनी परराष्ट्र मंत्र्यांना दहशतवादाबाबत भारताच्या 'शून्य सहनशीलता' धोरणाची माहिती दिल्याचे समजते.जयशंकर यांनीसोशल मीडियावर, 'आज मी गयानाचे परराष्ट्र मंत्री ह्यू हिल्टन टॉड यांच्याशी उबदार संवाद साधला. पहलगाम दहशतवादी हल्ला आणि सर्व प्रकारच्या दहशतवादाचा मुकाबला करण्याची गरज यावर चर्चा झाली. '' असे सांगितले.स्लोव्हेनियाच्या परराष्ट्र मंत्री तंजा फाजोन यांच्याशी झालेल्या चर्चेबद्दल जयशंकर म्हणाले की, पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा स्लोव्हेनियाने निषेध केल्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले.पनामाच्या जेवियर मार्टिनेझ यांच्याशी फोनवर झालेल्या संभाषणादरम्यान, परराष्ट्रमंत्र्यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताला ''एकता आणि पाठिंबा व्यक्त केल्याबद्दल'' पनामाचे आभार मानले.

**जगातील किती शक्तिशाली देश भारतासोबत**

तत्पूर्वी, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, इस्त्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू, इजिप्त, जॉर्डन, इटली, जपान, इराण, श्रीलंका, नेदरलँड्स, ऑस्ट्रेलिया, युएई आणि नेपाळ या देशांच्या प्रमुखांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींशी बोलून हल्ल्याचा निषेध केला आणि एकता व्यक्त केली.

## 'अल्लाहच्या कृपेने, आमच्याकडे अणुबॉम्ब आहे'; नवाज शरीफ यांच्या मुलीची भारताला धमकी

नवी दिल्ली, दि.३० वृत्तसंस्था

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये अजूनही तणाव आहे. भारताने पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर पावले उचलली आहेत. याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने अनेक वेळा अणुबॉम्बची धमकी दिली आहे. आता पाकिस्तानच्या पंजाब प्रांताच्या मुख्यमंत्री मरियम नवाज यांनीही अणुबॉम्बबाबत विधान केले आहे. मरियम यांनी,'' पाकिस्तानवर कोणीही हल्ला करू शकत नाही'' असा दावा केला आहे.

एका वृत्तसंस्थेनुसार, मरियम नवाज यांनी, ''आज भारत-पाकिस्तान सीमेवर तणाव आहे. धोका निर्माण झाला आहे, पण काळजी करण्याची गरज नाही. अल्लाहने



पाकिस्तानी सैन्याला इतकी शक्ती दिली आहे की ती शत्रूच्या प्रत्येक हल्ल्याचा प्रतिकार करू शकते. मी तुम्हाला सांगते आज पाकिस्तानचा कोणताही शत्रू हल्ला करण्यापूर्वी दहा वेळा विचार करेल. याचे कारण असे आहे की, अल्लाहच्या कृपेने, पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहे.''मरियम नवाज यांनी त्यांचे वडील आणि पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांचे कौतुक केले. त्यासाठी त्यांनी,''पाकिस्तानला अणुशक्ती बनवण्यात नवाज शरीफ यांनी ऐतिहासिक भूमिका बजावली आहे.

## पाकिस्तानी ओसामाने भारतात केले मतदान



नवी दिल्ली, दि.३० वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाल्यानंतर केंद्र सकारने पाकिस्तानविरोधात कडक पाऊले उचलली असून देशातील पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्याचे आदेश दिले. ओसामा नावाच्या तरूणाने भारतातून पाकिस्तानमध्ये जाण्यापूर्वी एएनआय वृत्तसंस्थेशी संवाद साधत असताना अनेक धक्कादायक दावे केले आहेत. त्याच्याकडे भारतीय आधार कार्ड, रेशन कार्ड आणि मतदान ओळखपत्र असल्याचा दावा त्याने केला आहे.

## येत्या २४-३६ तासांत भारत लष्करी कारवाई करू शकतो

### पाकिस्तानच्या मंत्र्याचा दावा

इस्लामाबाद, दि.३० वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानची राजनैतिक कोंडी केली होती. तसेच मंगळवारी (२९ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत सशस्त्र दलाची उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याला पूर्ण स्वातंत्र्य दिले असल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीनंतर पाकिस्तानचे माहिती आणि प्रसारण मंत्री अत्तातुल्लाह तरार यांनी भारताकडून लष्करी कारवाई होण्याची भीती व्यक्त केली आहे. या कारवाईबाबतची विश्वसनीय माहिती आमच्याकडे असल्याचेही त्यांनी



म्हटले आहे.

पाकिस्तानचे माहिती आणि प्रसारण मंत्री अत्तातुल्लाह तरार यांनी एक्स माध्यमावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले, ''पुढच्या २४ ते ३६ तासांत भारताकडून पाकिस्तानविरोधात लष्करी कारवाई करणार असल्याची आमच्याकडे विश्वसनीय माहिती आहे. पहलगाममधील घटनेत पाकिस्तानचा निराधार संबंध जोडून हा हल्ला करण्याचा विचार भारताकडून केला जात आहे.''पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय स्तरावर कोंडी करत असताना भारताने नवी दिल्लीतील १०० हून अधिक विदेशी राजनैतिक अधिकाऱ्यांना हल्ल्याची माहिती दिली. तसेच जागतिक नेत्यांशीही चर्चा करून याबाबत कळवले.पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी घेतलेल्या बैठकीत दहशतवादी हल्ल्याला लष्करी कारवाईद्वारे चोख प्रत्युत्तर देण्यासाठी हिरवा कंदिल दाखविला. दहशतवाद चिरडून टाकण्यासाठी कधी, कुठे आणि केव्हा लष्करी कारवाई करायची, याचे संपूर्ण स्वातंत्र्य संरक्षण दलांना असेल, असा स्पष्ट आणि थेट संदेश पंतप्रधान मोदींनी दिल्याचे समजते. या बैठकीनंतर काही तासातच पाकिस्तानचे मंत्री तरार यांनी आपली भीती व्यक्त केली. अत्तातुल्लाह तरार पुढे म्हणाले की, पाकिस्तान स्वतः दहशतवादाचा बळी ठरलेला आहे. त्यामुळे दहशतवादी हल्ल्याचे दुःख त्यांना समजते.

## पाकिस्तानची आर्थिक कोंडी;भारतीय विमानांसाठी हवाई क्षेत्र बंद केल्याने करोडोंचे नुकसान

नवी दिल्ली, दि.३० वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर भारतकडून पाकिस्तानाविरोधात कठोर निर्णय घेण्यात आले. सिंधू जल करार रद्द करण्यासह अटारी बॉर्डर तत्काळ प्रभावाने बंद करण्यात आली, पाकिस्तानी नागरिकांना मिळणारा सार्क व्हिसा रद्द करण्यात आला आहे. असे एकुण पाच निर्णय घेत भारताने पाकिस्तानची कोंडी केली आहे.

दुसरीकडे पाकिस्तानकडून देखील भारताविरोधात काही निर्णय घेण्यात आले. त्यातील एक निर्णय म्हणजे भारतीय विमानांसाठी पाकिस्तानच्या हवाई हद्दीत प्रवेशास मनाई करण्यात आली आहे. मात्र पाकिस्तानच्या या निर्णयाने त्यांनाच मोठा फटका बसला आहे.

पाकिस्तानला नुकसान होण्याचे मुख्य कारण म्हणजे दिल्ली, अमृतसर, लखनऊ आणि जयपूर सारख्या उत्तर भारतातील शहरांमधून युरोप, मध्य



पूर्व, अमेरिका, कॅनडा यासारख्या देशांसाठी उड्डाणे पाकिस्तानच्या हवाई क्षेत्रातून जातात. भारतीय विमाने आता पाकिस्तानवरून जात नसल्याने त्या हवाई क्षेत्रातून जाणाऱ्या भारतीय विमानांकडून आकारण्यात येणारे ओव्हरफ्लाइट शुल्क आता पाकिस्तानला मिळणार नाही.

शिवाय, दक्षिणपूर्व आशियासाठी उड्डाण करणाऱ्या पाकिस्तानी विमान कंपन्यांना भारताला टाळून लांबचा मार्ग स्वीकारावा लागेल. असे केल्याने शेजारील देशाचा खर्चही वाढेल. या निर्णयामुळे पाकिस्तानला लाखो डॉलर्सचे नुकसान सहन करावे लागणार आहे. यापूर्वी २०१९ मध्ये भारताने कश्मीरमधील कलम ३७० रद्द केले होते. त्यावेळीही पाकिस्तानने हवाई मार्ग बंद केला होता.

**पाकिस्तानच्या निर्णयाचा भारतावरही परिणाम**

दिल्ली, अमृतसर, जयपूर, लखनऊ व वाराणसी यांसारख्या शहरांमधून येणाऱ्या विमानांना लांबच्या मार्गांनी प्रवास करावा लागत आहे. ही विमाने पाकिस्तानवरून उड्डाण करण्याऐवजी, आता अरबी समुद्रावरून म्हणजे लांबच्या मार्गाने प्रवास करत आहेत. भारतीय विमान कंपन्या देखील पर्यायी मार्ग निवडावा लागत असल्याने इंधन खर्च वाढण्याची आणि उड्डाणांच्या वेळेत वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, पाकिस्तानला थेट त्यांच्या विमान उत्पन्नाला फटका बसत आहे.

## माजी रॉ प्रमुख आलोक जोशी बोर्डाचे नवे अध्यक्ष

नवी दिल्ली, दि.३० वृत्तसंस्था

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये अजूनही तणावाची परिस्थिती आहे. दरम्यान, भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत. माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्यासोबत बोर्डात एकूण ७ सदस्य असतील. तिन्ही सैन्यातील निवृत्त अधिकाऱ्यांना बोर्डात समाविष्ट करण्यात आले आहे.

सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत आणि मंडळाची कमान माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांच्याकडे सोपवली आहे. माजी वेस्टर्न



एअर कमांडर एअर मार्शल पीएम सिन्हा, माजी दक्षिणी आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल ए.के. सिंग आणि रिअर ॲडमिरल मोंटी खन्ना हे लष्करी सेवेतील निवृत्त अधिकारी आहेत. हे देखील मंडळाचा भाग असतील. राजीव रंजन वर्मा आणि मनमोहन सिंग हे भारतीय पोलिस सेवेतून निवृत्त झाले आहेत. बी व्यंकटेश वर्मा हे सात सदस्यांच्या मंडळावर निवृत्त परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत.

बुधवारी पंतप्रधान मोदींनी चार प्रमुख बैठकांमध्ये भाग घेतला.

## पाकिस्तानसाठी वाईट दिवसांची सुरुवात

### पंतप्रधानांच्या उच्चस्तरीय बैठकीवर जेडीयू नेत्याचे वक्तव्य

नवी दिल्ली, दि.३० वृत्तसंस्था

पहलगाम हल्ल्यानंतर संपूर्ण देश संतप्त आहे. राजकीय पक्ष दहशतवादाविरुद्ध एकत्र उभे आहेत. पंतप्रधान मोदी सतत उच्चस्तरीय बैठका घेत आहेत. आज पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली पंतप्रधान निवासस्थानी चार बैठका होणार आहेत. या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेतले जाऊ शकतात. दरम्यान, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या पक्षाकडून एक मोठे विधान आले आहे.

पंतप्रधान मोदींनी संरक्षण मंत्री, एनएसए, सीडीएस आणि तिन्ही लष्कर प्रमुखांसोबत केलेल्या भेटीबद्दल जेडीयू नेते राजीव रंजन प्रसाद मोठे विधान केले आहे. प्रसाद यांनी, ''भारत निष्पाप लोकांचे हौतात्म्य विसरू शकत नाही ज्यांनी आपले प्राण गमावले आहेत. मोठ्या राजनैतिक निर्णयानंतर संपूर्ण जगाने एकता दाखवली. पुन्हा एकदा, पंतप्रधानांनी संरक्षण मंत्री, एनएसए, सीडीएस आणि तिन्ही लष्कर प्रमुखांसोबत केलेल्या बैठकीत असा निर्णय घेणे ही निःसंशयपणे पाकिस्तानसाठी वाईट दिवसांची सुरुवात आहे.''

दुसरीकडे, एका प्रश्नाच्या उत्तरात राजीव रंजन प्रसाद यांनी विरोधकांना थोडा धीर धरण्याचा सल्ला दिला. पहलगाम घटनेबाबत विरोधी पक्षनेतेही सतत विधाने करत आहेत.

## विधाने आणि पोस्टर्सद्वारे घाणेरडे राजकारण करू नका

### अखिलेश-राहुल गांधींच्या पक्षाला इशारा

नवी दिल्ली, दि.३० वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यावर बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांनी मोठे विधान केले आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून सर्व पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सर्व राजकीय पक्षांना पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर सरकारसोबत उभे राहण्याचे आवाहन केले. मायावतींनी विधाने आणि पोस्टर्सद्वारे घाणेरडे राजकारण करू नका असा इशारादेखील काँग्रेस आणि सपाला इशारा दिला आहे.

मायावती यांनी आपल्या पोस्टमध्ये, ''पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या मुद्द्यावर उचललेल्या प्रत्येक पावलात सर्व पक्षांनी सरकारसोबत



एकजुटीने उभे राहिले पाहिजे आणि पोस्टर्स आणि विधाने इत्यादींद्वारे त्याच्या आडून घाणेरडे राजकारण केले जाऊ नये, कारण यामुळे लोकांमध्ये गोंधळ निर्माण होत आहे, जे देशाच्या हितासाठी चांगले नाही.''असे सांगितले आहे.दुसऱ्या एका पोस्टमध्ये त्यांनी, ''या प्रकरणात, भारतीय संविधानाचे शिल्पकार, परमपूज्य बाबा साहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांचा अजिबात अपमान होऊ नये. विशेषतः सपा आणि काँग्रेसने याची विशेष काळजी घ्यावी, अन्यथा बसपा देखील त्यांच्या विरोधात रस्त्यावर उतरू शकते.'' असे लिहिले.या अगोदर, बसपा प्रमुखांनी, देशातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या काश्मीरमधील पहलगाममध्ये पाक-समर्थित दहशतवाद्यांनी पर्यटकांच्या हत्याकांडाच्या अत्यंत घातक घटनेने संपूर्ण देश हादरला आहे. पर्यटन हंगामातही, ज्यासाठी जबाबदारी आवश्यक आहे, अशा विशेष ठिकाणी सुरक्षेच्या अभावामुळे घडलेल्या या घटनेमुळे लोकांमध्ये प्रचंड संताप आहे.

## भारत अमेरिकेच्या 'टॅरिफ टेन्शन'पासून मुक्त होणार; ट्रम्प यांनी दिले दिलासा देणारे संकेत

नवी दिल्ली , दि.३० वृत्तसंस्था

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासोबत झालेली टॅरिफ चर्चा चांगल्या प्रकारे झाली असल्याचे सांगण्यात येत आहे. अमेरिका भारतासोबत व्यापार करार करेल असा ट्रम्प यांनी विश्वास व्यक्त केला आहे. ट्रम्प यांनी भारतासह जगभरातील देशांवर परस्पर कर लादण्याची घोषणा केली आहे. ट्रम्प यांनी भारतावर २६% कर लादण्याची घोषणा केली आहे, जी सध्या ९० दिवसांसाठी स्थगित आहे. जागतिक बाजारपेठेप्रमाणेच, भारतीय बाजारपेठही टॅरिफच्या घोषणेमुळे अशांत आहे आणि अशा परिस्थितीत, ट्रम्प यांनी भारताबद्दल केलेली टिप्पणी दिलासा देणारी असल्याचे म्हटले जात आहे.

व्हाईट हाऊसबाहेर माध्यमांशी बोलताना ट्रम्प यांनी, 'मला वाटते की आपण भारतासोबत एक करार करू. तुम्हाला माहिती आहेच की, पंतप्रधान (नरेंद्र मोदी) तीन आठवड्यांपूर्वी इथे आले होते आणि त्यांना एक करार करायचा आहे.

फेब्रुवारीच्या अखेरीस पंतप्रधान मोदी अमेरिकेला भेट देऊन व्यापार करारावर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांनी अमेरिका भारतासोबत ''व्यापार कराराच्या अगदी जवळ'' असल्याचे म्हटल्यानंतर अध्यक्ष ट्रम्प यांचे हे वक्तव्य आले.अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी



व्हान्स गेल्या आठवड्यात भारत दौऱ्यावर आले होते आणि त्यादरम्यान त्यांनी पंतप्रधान मोदींची भेट घेतली. या बैठकीबद्दल बेझंट म्हणाले की, दोन्ही नेत्यांमध्ये व्यापार कराराबाबत खूप चांगली चर्चा झाली, त्यानंतर भारताबाबत काही घोषणा ऐकू येतील. ते म्हणाले, 'भारतासारख्या देशांकडे आधीच टॅरिफ माहिती आहे, त्यामुळे त्यांच्याशी वाटाघाटी करणे खूप सोपे आहे.' जर भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार करार झाला तर भारताला शुल्कात सवलत मिळण्याची अपेक्षा आहे.

अमेरिकेतील एका या वृत्तवाहिनीशी बोलताना, शिकागो विद्यापीठाच्या बूथ स्कूल ऑफ बिझनेसमधील अर्थशास्त्रज्ञ आणि वित्त प्राध्यापक रघुराम राजन म्हणाले, ''जर भारताने शुल्क कमी करण्यासाठी वाटाघाटी केल्या तर त्याचा खूप फायदा होईल.'' यामुळे अनेक कंपन्या भारताकडे एका नवीन दृष्टिकोनातून पाहतील, विशेषतः भारताच्या मोठ्या देशांतर्गत बाजारपेठेचा विचार करता.

अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनीही अमेरिकेने भारतासोबत व्यापार करार केल्याचे संकेत दिले आहेत. त्यांनी सांगितले की, या कराराची घोषणा करण्यापूर्वी अमेरिका भारत सरकारकडून अंतिम मंजुरीची वाट पाहत आहे. वहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले, ''करार अंतिम झाला आहे परंतु तो मंजूर करण्यापूर्वी आम्ही त्यांच्या (भारतीय) पंतप्रधान आणि संसदेच्या मंजुरीची वाट पाहत आहोत.''वृत्तसंस्था रॉयटर्सच्या वृत्तानुसार, प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार कराराचा भाग म्हणून भारताने अमेरिकेला ''फॉरवर्ड मोस्ट फेवर्ड नेशन'' कलम देऊ केले आहे. या प्रकरणाशी परिचित असलेल्या दोन अधिकाऱ्यांचा हवाला देत, अहवालात म्हटले आहे की भारताने मागील व्यापार चर्चेत हे कलम दिले नव्हते.करारात या कलमाचा समावेश केल्याने, हा करार भविष्यासाठी सुरक्षित झाला आहे कारण त्यामुळे अमेरिकेचा दुसरा कोणताही व्यापारी भागीदार यापेक्षा चांगल्या अटी देऊ शकणार नाही याची खात्री होईल.याशिवाय, भारताने व्यापाराच्या बाबतीत अमेरिकेला अनेक ऑफर आणि सवलती दिल्या आहेत.

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बेंगळुरु | 10 | 7 | 3 | 0 | 0 | 14 | +0.521 |
| मुंबई | 10 | 6 | 4 | 0 | 0 | 12 | +0.889 |
| गुजरात | 9 | 6 | 3 | 0 | 0 | 12 | +0.748 |
| दिल्ली | 10 | 6 | 4 | 0 | 0 | 12 | +0.362 |
| पंजाब | 9 | 5 | 3 | 0 | 1 | 11 | +0.177 |
| लखनौ | 10 | 5 | 5 | 0 | 0 | 10 | -0.325 |
| कोलकाता | 10 | 4 | 5 | 0 | 1 | 9 | +0.271 |
| राजस्थान | 10 | 3 | 7 | 0 | 0 | 6 | -0.349 |
| हैदराबाद | 9 | 3 | 6 | 0 | 0 | 6 | -1.103 |
| चेन्नई | 9 | 2 | 7 | 0 | 0 | 4 | -1.302 |

# केकेआरचे स्पर्धेतील आव्हान कायम!

## दिल्लीला धूळ चारत मिळविला दमदार विजय

**नवी दिल्ली : दि. ३० प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ स्पर्धेतील ४८ वा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना कोलकाता नाईट रायडर्स संघासाठी अतिशय महत्वाचा होता. कारण प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी कोलकाता नाईट रायडर्सला हा सामना कुठल्याही परिस्थितीत जिंकायचा होता. या सामन्यात सुनील नरेन दिल्लीच्या खेळाडूंवर भारी पडला. हा सामना कोलकाताने १४ धावांनी आपल्या नावावर केला आहे.
कोलकाता नाईट रायडर्सने या सामन्यातील पहिल्या डावात २०४ धावा केल्या होत्या. दिल्ली कॅपिटल्सला हा सामना जिंकण्यासाठी




२०५ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना दिल्लीला पहिल्याच षटकात मोठा धक्का बसला. अभिषेक पॉरेल ४ धावांवर तंबूत परतला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला करूण नायरही फार काळ टिकू शकला नाही. तो अवघ्या १५ धावांवर तंबूत परतला. या डावात फाफ डू प्लेसिसची बॅट चांगलीच तळपली, त्याने या डावात ४५ चेंडूंचा सामना करत ७ चौकार आणि २ षटकारांच्या साहाय्याने ६२ धावांची खेळी केली. या डावात केएल राहुलकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र, संघाला गरज असताना, तो अवघ्या ७ धावांवर बाद होऊन माघारी परतला.कर्णधार अक्षर पटेलने दिल्लीला विजय मिळवून देण्यात पूर्ण जोर लावला. त्याने गोलंदाजी करताना २ गडी बाद केले. तर फलंदाजी करताना ४३ धावा चोपल्या. शेवटी आशुतोष शर्मा आणि विपराज निगमने जोर लावला. मात्र, ते संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरलेया सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कोलकाताकडून डावाची सुरूवात करताना रहमानुल्लाह गुरबाजने २६ धावांची खेळी केली.

# मुंबई लीगमध्ये तारांकितांचा सहभाग

**मुंबई : दि. ३० प्रतिनिधी**

ट्वेन्टी-२० मुंबई लीगच्या तिसऱ्या हंगामासाठी तारांकित खेळाडूंनी आपला सहभाग निश्चित केला असून भारताचा ट्वेन्टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव, माजी कसोटी कर्णधार अजिंक्य रहाणे आणि श्रेयस अय्यर यांच्यासह आठ जणांची 'आयकॉन खेळाडू' म्हणून निवड करण्यात आली आहे.
सहा वर्षांनंतर पुनरुज्जीवित करण्यात आलेल्या ट्वेन्टी-२० मुंबई लीगचा तिसरा हंगाम २६ मे ते ८ जून या कालावधीत खेळवला जाणार आहे. या स्पर्धेचे सर्व सामने ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर रंगणार आहेत. या स्पर्धेसाठी शिवम





दुबे, सर्फराज खान, शार्दूल ठाकूर, पृथ्वी शॉ आणि तुषार देशपांडे हे अन्य 'आयकॉन खेळाडू' असतील.'आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपल्या चमकदार कामगिरीने मुंबईचा लौकिक उंचावणाऱ्या आठ आयकॉन खेळाडूंची नावे जाहीर करताना आम्हाला आनंद होत आहे. हे खेळाडू मुंबई क्रिकेटचा वारसा, वृत्ती आणि गुणवत्तेचे प्रतीक आहेत,'' असे मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले.नॉर्थ मुंबई पँथर्स, एआरसीएस अंधेरी, ट्रायम्फ नाइट्स मुंबई नॉर्थ ईस्ट, नमो बांद्रा ब्लास्टर्स, इगल ठाणे स्ट्रायकर्स, आकाश टायगर्स मुंबई वेस्टर्न सबर्ब्ज, सोबो मुंबई फालकन्स आणि मुंबई साउथ सेंट्रल मराठा रॉयल्स या आठ संघांमध्ये ही स्पर्धा रंगणार आहे.ट्वेन्टी-२० मुंबई लीगमध्ये आठ संघ खेळणार असून प्रत्येक संघाला एक 'आयकॉन खेळाडू' निवडता येईल. सर्व संघ संतुलित राखण्याचा 'एमसीए'चा प्रयत्न आहे. या स्पर्धे साठी खेळाडू लिलाव होणार असून त्याची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल, असे 'एमसीए'च्या निवेदनात नमूद करण्यात आले.

# एशियन गेम्समध्ये पुन्हा एकदा क्रिकेटचा तडका!



**नवी दिल्ली : दि. ३० प्रतिनिधी**

आशियाई क्रीडा महासंघाने आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेत पुन्हा एकदा क्रिकेटचा समावेश करण्याचा निर्णय घेतला असून, या निर्णयामुळे क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या स्पर्धेत पुरुष आणि महिलांच्या टी-२० प्रकारातील सामने आयोजित करण्यात येणार आहेत.
२०२३ साली चीनमधील हांगझोऊ येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदाच टी-२० क्रिकेटचा समावेश करण्यात आला होता. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान यांसारख्या आशियाई क्रिकेट संघांनी त्यामध्ये सहभाग घेतला होता. भारताच्या महिला आणि पुरुष संघांनी या स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई करत मोठे यश मिळवले होते.२०२३ साली चीनमधील हांगझोऊ येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदाच टी-२० क्रिकेटचा समावेश करण्यात आला होता. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान यांसारख्या आशियाई क्रिकेट संघांनी त्यामध्ये सहभाग घेतला होता. भारताच्या महिला आणि पुरुष संघांनी या स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई करत मोठे यश मिळवले होते. क्रिकेट हा आशियाई देशांमध्ये अत्यंत लोकप्रिय खेळ मानला जातो. त्यामुळे या खेळाचा पुन्हा समावेश करण्यात आल्यामुळे आशियाई क्रीडा स्पर्धांची रंगत आणि लोकांची रुची आणखी वाढेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. यासोबतच उदयोन्मुख खेळाडूंनाही आंतरराष्ट्रीय मंचावर स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. या निर्णयामुळे भारतासारख्या देशांना त्यांच्या क्रिकेट वर्चस्वाचे पुन्हा एकदा प्रदर्शन करण्याची नामी संधी मिळणार आहे.
यासोबतच क्रिकेटच्या प्रसार व विकासालाही चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये पुन्हा एकदा क्रिकेटचा समावेश करण्याचा निर्णय केवळ क्रीडा क्षेत्रासाठीच नव्हे, तर आशियाई संस्कृतीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. क्रिकेट या खेळाने गेल्या काही दशकांत आशियात केवळ लोकप्रियता मिळवली नाही, तर तो अनेकांसाठी प्रेरणा, एकी आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक ठरला आहे. क्रिकेटच्या माध्यमातून आशियाई देशांमध्ये वाढत असलेले सहकार्य, प्रतिस्पर्धा आणि युवा पिढीला मिळणारे व्यासपीठ हे या निर्णयामागचे खरे यश आहे. क्रिकेट हा खेळ आता केवळ 'बॅट-बॉलचा सामना' राहिलेला नाही. तो आर्थिक गुंतवणूक, प्रेक्षकांची ओढ, प्रसारण हक्क, आणि देशाच्या सॉफ्ट पॉवरचा भाग झाला आहे. त्यामुळेच अशा स्तरावरील स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश म्हणजे देशाच्या क्रीडा क्षेत्रातील धोरणात्मक यश देखील म्हणता येईल.पण यात केवळ लोकप्रियता पाहून निर्णय घेणे पुरेसे नाही. क्रिकेटमध्ये अग्रेसर असणाऱ्या देशांची आता जबाबदारी वाढली आहे.
त्यांनी केवळ यशासाठीच नाही तर नवोदित राष्ट्रांना प्रशिक्षणे, मैत्रीपूर्ण सामने व संधी देऊन खेळाचा खरा प्रसार करण्यावरही भर देणे गरजेचे आहे. कारण जर क्रिकेटने आशियात नवे स्वप्न उभे केले.

# केकेआरच्या सुनील नारायणची मोठ्या विक्रमाला गवसणी

**नवी दिल्ली : दि. ३० प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ च्या ४८ व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने दिल्ली कॅपिटल्सचा १४ धावांनी पराभव केला. दिल्लीने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तर प्रथम फलंदाजी करत कोलकात्याने २०९ धावा केल्या. प्रतिउत्तरात दिल्लीच्या संघाला १९० धावापर्यंतच मजल मारता आली. या विजयासह, कोलकाता नाईट रायडर्सचा अनुभवी खेळाडू आणि फिरकी गोलंदाज सुनील नारायणने एक खास कामगिरी केली आहे. सुनील नरेनने टी-२० मध्ये संघासाठी सर्वाधिक विकेट्स घेण्याच्या विश्वविक्रमाची बरोबरी साधली असून इतिहास रचला.दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या




विजयात सुनील नारायणने महत्वाची भूमिका बजावली आहे. त्याने तीन विकेट्स घेतल्या आहेत. सुनील नरेनने कोलकाता नाईट रायडर्सकडून खेळताना २०८ विकेट्स घेतल्या आहेत. या सामन्यात सुनील नारायणने फाफ डु प्लेसिस, ट्रिस्टन स्टब्स आणि अक्षर पटेल यांची शिकार केली.सुनील नरेनने २०१२ मध्ये कोलकाता नाईट रायडर्स संघाकडून पदार्पण केले. तेव्हापासून, सुनील नरेन कोलकात्याचा एक महत्त्वाचा अंग म्हणून वावरत आहे. सुनील नरेनने १९५ सामन्यांमध्ये २०८ विकेट्स घेतल्या आहेत. या बाबतीत, त्याने समित पटेलची बरोबरी साधली आहे. ज्याने नॉटिंगहॅमशायरकडून टी-२० क्रिकेटमध्ये २०८ विकेट्स मिळवल्या आहेत.दिल्ली कॅपिटल्सकडून नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेण्यात आला. तर प्रथम फलंदाजी करताना कोलकाताने ९ विकेटच्या मोबदल्यात २०४ धावा उभ्या केल्या.

# पहलगाम हल्ल्यावर शिखर धवनने शाहिद आफ्रिदीला फटकारले

**नवी दिल्ली : दि. ३० प्रतिनिधी**

भारतामध्ये जेव्हा पहलगाम आतंकवादी हल्ला झाला त्यानंतर सोशल मीडियावर भारतीयांच्या त्याच बरोबर क्रिकेटपटू अभिनेते यांचा तीव्र प्रतिक्रिया समोर आल्या होत्या. काही पाकिस्तानी खेळाडूंनी देखील सोशल मीडियावर याबद्दल संताप व्यक्त केला होता. सध्या पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीने केलेल्या वक्तव्य सोशल मीडियावर प्रचंड चर्चेत आहे. यामध्ये त्याने भारतावर अनेक आरोप लावले आहेत त्याचबरोबर हे भारताने स्वतः केलेले कृत्य आहे असे तो म्हणाला होता या वक्तव्यामुळे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात त्याला ट्रोल केले जात आहे. पहलगाम दहशतवादी आल्यानंतर शाहिद आफ्रिदीच्या वक्तव्यावर आता भारताचे माजी क्रिकेट खेळाडू शिखर धवन यांनी सोशल मीडियावर पाकिस्तानी खेळाडूला पटकारले आहे. शिखर धवन म्हणाला आहे की तू आधीच खूप पडला आहेस, आणखी किती पडशील. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, सामा टीव्हीवर बोलताना शाहिद आफ्रिदीने भारतीय सैन्यावर प्रश्न उपस्थित केले होते. यानंतर, माजी पाकिस्तानी क्रिकेटपटूवर जोरदार टीका होत आहे. या भागात शिखर धवनने आफ्रिदीला चोख प्रत्युत्तर दिले आहे. शिखर धवनने २४ ऑगस्ट २०२४ रोजी सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली हे लक्षात घेण्यासारखे आहे. धवनने त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत २८८ डावांमध्ये १०,८६७ धावा केल्या आहेत. तो २०१३ च्या चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या भारताच्या संघाचा सदस्य होता. सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करून शिखर धवनने लिहिले आहे की डावखुऱ्या फलंदाजाने लिहिले आहे

## अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सोन्याचे भाव कोसळले



देशात आज अक्षय्य तृतीया उत्सव साजरा होत आहे. आजच्या दिवशी ग्राहक सोन्याची देखील खरेदी करतात. कारण ही खरेदी शुभ मानली जाते. सराफा बाजारात सोन्याचे भाव गेल्या काही दिवसांपासून गगनाला भिडले होते. सोन्यांच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने ऐन लग्नसराईत ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ लागत होती. अशातच आज बुधवारी सोन्याच्या दरात घसरण झाल्याचे पाहायला मिळाले आहे. तर चांदीच्या दरातही बदल झाला आहे. चला तर मग जाणून घेऊया काय आहे आजचा भावआजचे लेटेस्ट दर खाली दिले आहेत.बुलियन मार्केट या वेबसाइटनुसार, आज ३० एप्रिल २०२५ रोजी देशात १० ग्रॅम २५ कॅरेट सोन्याचा दर ९५,४६० रुपये आहे. तर २२ कॅरेटसाठी १० ग्रॅम सोन्याचा दर ८७,५०५ रुपये आहे. तर १ किलो चांदीचा दर ९७,२५० रुपये आहे. याशिवाय १० ग्रॅम चांदीचा दर ९७३ रुपये आहे. उत्पादन शुल्क, राज्य कर आणि मेकिंग शुल्कामुळे सोन्याच्या दागिन्यांच्या किमती भारतभर बदलतात.सोने खरेदी करताना सराफाकडून असे विचारले जाते की तुम्हाला २२ कॅरेटचे सोने खरेदी करायचे आहे की, २४ कॅरेटचे? त्यामुळे तुम्ही देखील हे जाणून घेणे आवश्यक आहे की तुम्ही खरेदी करताय ते सोनं काय शुद्धतेचं आहे. जर तुम्हाला कॅरेटबाबत माहित असेल तर ही बाब चांगली आहे आणि जर तुम्हाला माहित नसेल तर आम्ही तुम्हाला याबाबत माहिती देत आहोत.२४ कॅरेट सोने ९९.९% शुद्ध आहे आणि २२ कॅरेट अंदाजे ९१% शुद्ध असतं. २२ कॅरेट सोन्यात तांबे, चांदी, जस्त यांसारख्या ९% इतर धातूंचे मिश्रण करून दागिने तयार केले जातात. २४ कॅरेट सोने शुद्ध असले तरी त्याचे दागिने बनवता येत नाहीत. त्यामुळे बहुतेक दुकानदार २२ कॅरेटमध्ये सोने विकतात.हॉलमार्कचा उद्देश सोन्याची पारदर्शकता तपासणे होय.

# भारत-अमेरिका व्यापार करारावर लवकरच मोठी घोषणा!

**नवी दिल्ली : दि. ३० प्रतिनिधी**

## ट्रम्प-मोदींच्या 'मिशन ५००'ला गती

भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार करार () लवकरच अंतिम होण्याची शक्यता आहे. अमेरिकेचे अर्थसचिव स्कॉट बेसेन्ट यांनी २९ एप्रिल रोजी सांगितले की, उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांच्या अलीकडील भारत दौऱ्यात या करारावर ''खूप चांगली प्रगती'' झाली आहे. व्हान्स आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील चर्चेने कराराला गती मिळाली असून, लवकरच यासंदर्भात मोठ्या घोषणा होऊ शकतात. भारतासोबतचा हा करार अमेरिकेच्या पहिल्या व्यापार करारांपैकी एक असेल, असे बेसेन्ट यांनी स्पष्ट केले.पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत १९० अब्ज डॉलरवरून ५०० अब्ज




डॉलरपर्यंत वाढवण्याचे 'मिशन ५००' जाहीर केले होते. या उद्दिष्टाला गती देण्यासाठी दोन्ही देश नव्या, परस्पर फायदेशीर आणि बहु-क्षेत्रीय व्यापार करारासाठी कार्यरत आहेत. २३ ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान वॉशिंग्टन, डीसी येथे भारताच्या वाणिज्य विभाग आणि अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयाच्या प्रतिनिधींमध्ये झालेल्या बैठकीत टैरिफ आणि गैर-टैरिफ मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली.हा करार रोजगार निर्मिती, टिकाऊ पुरवठा साखळ्या आणि दोन्ही देशांतील कामगारांसाठी समृद्धी यावर केंद्रित आहे. भारताने कमी टैरिफ, गैर-टैरिफ अडथळ्यांचा अभाव, चलन हेराफेरीचा अभाव आणि कमी सरकारी अनुदानांमुळे कराराची प्रक्रिया सुलभ झाल्याचे बेसेन्ट यांनी नमूद केले. याशिवाय, भारताने अमेरिकेला ''फॉरवर्ड मोस्ट-फेवर्ड-नेशन'' दर्जा देण्याची तयारी दर्शवली आहे, ज्यामुळे अमेरिकेला भारताच्या इतर कोणत्याही व्यापारी भागीदारापेक्षा जास्त अनुकूल टैरिफ मिळतील.२१ ते २४ एप्रिल २०२५ दरम्यान व्हान्स यांनी भारताला भेट दिली आणि जयपूर येथील एका कार्यक्रमात कराराच्या संदर्भातील अटी ( ) औपचारिकपणे अंतिम झाल्याची घोषणा केली. ''हे पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या दृष्टिकोनाला प्रत्यक्षात आणण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे,'' असे व्हान्स म्हणाले. त्यांनी भारताला अमेरिकी ऊर्जा आणि संरक्षण उपकरणांच्या आयातीवरील अडथळे कमी करण्याचे आवाहन केले.भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने या बैठका ''फलदायी'' असल्याचे म्हटले असून, येत्या मे अखेरीपासून प्रत्यक्ष क्षेत्रीय चर्चा सुरू होणार आहेत. यापूर्वी मार्च २०२५ मध्ये नवी दिल्लीत झालेल्या चर्चांनंतर दोन्ही देशांनी कराराचा पहिला टप्पा २०२५ च्या शरद ऋतूपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. भारताचे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनीही अलीकडेच सॅन फ्रान्सिस्को येथे भारतीय समुदायाला सांगितले की, भारत ''सकारात्मक निष्कर्षांसह'' करार पूर्ण करण्यास उत्सुक आहे.

## पाकिस्तानचा शेअर बाजार गडगडला

**नवी दिल्ली : दि. ३० प्रतिनिधी**

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. यामुळे भारत-पाकिस्तानमधील संबंध ताणले गेले आहेत. याचा परिणाम पाकिस्तानच्या शेअर बाराजावर झाला आहे. पाकिस्तानात केएसई १ हजार ७१७ अंकांनी म्हणजेच १.५ टक्क्यांनी घसरले असून ११३,१५४.८३ वर पोहोचला आहे, असं वृत्त डॉनने दिलं आहे.
पाकिस्तानचे माहिती आणि प्रसारण मंत्री अत्तातुल्लाह तरार यांनी पुढच्या २४ ते ३६ तासांत भारताकडून पाकिस्तानविरोधात लष्करी कारवाई करणार असल्याची भीती व्यक्त केली आहे. यामुळे शेअर मार्केटमध्ये घसरण झाल्याचं म्हटलं जातंय.सोमवारी, केएसई-१०० निर्देशांक ११४,०६३.९० वर बंद झाला, जो १,४०५.४५ अंकांनी किंवा १.२२% ने घसरला. भारताने पाकिस्तानविरोधात ठाम निर्णय घेतले आहेत.




सार्क व्हिसा रद्द करणे, अटारी सीमा बंद करणे, पाकिस्तानात राहणाऱ्या भारतीय नागरिकांना परत बोलावणे, आदी निर्णयांमुळे पाकिस्तानी वित्तीय बाजारात मोठा परिणाम झला आहे. २२ एप्रिलच्या हल्ल्यानंतर दोन दिवसांनी, कराची स्टॉक एक्सचेंजचा केएसई-१०० निर्देशांक उघडल्यानंतर लगेचच २% पेक्षा जास्त घसरला होता.पाकिस्तानचे माहिती आणि प्रसारण मंत्री अत्तातुल्लाह तरार यांनी एक्स माध्यमावर एक व्हिडीओ शेअर केला आहे.

## शेअर बाजारातून निधी उभारणीत महाराष्ट्र अव्वल

**नवी दिल्ली : दि. ३० प्रतिनिधी**

राष्ट्रीय शेअर बाजाराने (एनएसई) प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, सरलेल्या २०२४-२५ आर्थिक वर्षात या शेअर बाजारावर कंपन्यांनी समभाग सूचिबद्ध करून उभारलेल्या भांडवलाच्या बाबतीत महाराष्ट्र देशातील अव्वल राज्य ठरले आहे. देशात सर्वाधिक विदेशी गुंतवणूक आकर्षित करणारे राज्याकडे हे देशांतर्गत गुंतवणूकदारांकडून सर्वाधिक निधी प्रवाह येत असल्याचे यातून अधोरेखित होते.
शेअर बाजाराच्या मुख्य मंचावरील निधी उभारणीची क्रिया ही मुख्यत्वे देशातील काही प्रमुख आर्थिक क्षेत्रांपुरतीच अद्याप मर्यादित आहे.



यात महाराष्ट्र, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांतील कंपन्यांनी एकत्रितपणे १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उभारला, ज्याचा सार्वजनिक समभाग विक्रीद्वारे (आयपीओ) उभारल्या गेलेल्या एकूण निधीत ६९ टक्के वाटा आहे. तर एकट्या महाराष्ट्राचा वाटा तब्बल ३२ टक्के राहिला आहे. इतकेच नाही तर सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग अर्थात एसएमई-केंद्रित 'एनएसई इमर्ज' या बाजारमंचावर महाराष्ट्रातील कंपन्यांचा एकूण निधी उभारणीच्या तुलनेत २७ टक्के वाटा २०२४-२५ मध्ये राहिला.महाराष्ट्रासह, गुजरात आणि दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्र या तीन प्रदेशांतील कंपन्यांनी 'एनएसई इमर्ज'वरून निधीचा एकूण उभारल्या गेलेल्या भांडवलाक एकत्रित ६२.१ टक्के वाटा होता. याचा अर्थ मोठ्या कंपन्यांसह आणि छोट्या कंपन्यांनाही वित्तीय स्रोत मिळवून देण्यात महाराष्ट्राची मजबूत कामगिरी राहिली आहे. शहरानिहाय तुलना करायची झाल्यास, बंगळुरूने निधी उभारणीत अव्वल स्थान राखले आहे. तेथील १० कंपन्यांनी मुख्य बाजारमंचावर एकत्रितपणे २८,०६२ कोटी रुपये असा सर्वाधिक निधी उभारला.यापैकी बहुतेक कंपन्या या तंत्रज्ञान आणि ग्राहक क्षेत्रांतील आहेत. दरम्यान, तामिळनाडूतील कांचीपुरमने एकमेव ऐतिहासिक 'आयपीओ'द्वारे २०२४-२५ सूचीत दुसरे स्थान राखले. भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा 'आयपीओ' ठरलेल्या ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेडने या माध्यमातून २७,८५९ कोटी रुपये उभारले आहे. ह्युंदाई मोटर चे नोंदणीकृत कार्यालय आणि उत्पादन सुविधा कांचीपूरममध्ये आहे. नवी दिल्लीनेही जोरदार कामगिरी केली आणि तेथील १२ कंपन्यांनी २३,६१५ कोटी रुपये उभारले आहेत.

अजिंक्य भारत
# आपलं नागपूर
गुरुवार, दि. १ मे २०२५


## थोडक्यात

### फलोत्पादन विकास अभियानांतर्गत अर्ज

**नागपूर :** एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत २०२५-२६ अंतर्गत फळे, फुले, मसाला लागवड, अळिंबी उत्पादन प्रकल्प व जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन हा घटक राबविण्यात येत आहे. विदेशी फळे, फुले, मसाला लागवड व आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबू, पेरु, आवळा या फळपिकांच्या जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन करणे, अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी करणे आदींचा समावेश आहे. राज्यामध्ये विदेशी फळे, फुले, मसाला पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढविणे तसेच जुन्या फळबागांची उत्पादकता वाढविण्यासाठी हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविंद्र मनोहरे यांनी केले आहे.

### शिवसेनेतर्फे जलतरण टाकीसंबंधी निवेदन

**नागपूर :** शिवसेना महिला आघाडीच्या वतीने कामगार कल्याण भवन राजे रघुजीनगर नागपूर येथील जलतरण तलाव सुरू करण्याबाबत राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यांना निवेदन देण्यात आले. सदर जलतरण टाकी दोन-तीन बंद स्थितीत होती महिला आघाडीच्या आंदोलनानंतर माजी कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी दोन कोटींचा निधी दिला होता आता बांधकामाचे काम पूर्ण झाले आहे मात्र, दुरुस्तीचे काम पूर्ण होऊन सुद्धा अजूनही जलतरण टाकी सुरू करण्यात आलेली नसल्याचे निवेदनात नमूद केले आहे. मनीषा पापडकर जिल्हाप्रमुख शिवसेना नागपूर, सामाजिक कार्यकर्ता कांचन मस्के, कामठी विधानसभा प्रमुख दीपा पचोरी उपस्थित होत्या.

### शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी

**नागपूर :** सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांच्या शाळांमध्ये 'पवित्र' या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरतीसाठी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात येत आहे. परीक्षेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर २५ एप्रिल रोजी प्रसिद्ध केली आहे.

'समृद्धी'चे पुढील महिन्यात होणार लोकार्पण | पहिल्या टप्प्याचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्‌घाटन | महाराष्ट्राच्या आर्थिक संपन्नतेत भर टाकणारा महामार्ग

# उपराजधानी ते राजधानी आठ तासांत प्रवास पूर्ण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ संजय मुंदलकर

**नागपूर, दि. ३० :** उपराजधानी ते राजधानी अर्थात नागपूर ते मुंबई या दोन शहरांना जोडणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे लोकार्पण येत्या मे महिन्यात होण्याची अपेक्षा आहे. महामार्गावरील ७६ किलोमीटरच्या शेवटच्या टप्प्याचे काम जवळपास पूर्ण झाले असून, पूर्णपणे वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर दोन्ही शहरादरम्यानचा प्रवास आठ तासांत करता येणार आहे. दरम्यान, डिसेंबर २०२२ मध्ये नागपूर-शिर्डी या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडले होते.

एमएसआरडीसी अर्थात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून 'समृद्धी महामार्गा'ची बांधणी २०१९ पासून सुरू आहे. तब्बल ७०१ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पातील नागपूर ते शिर्डी हा ५२० किमीचा पहिला टप्पा डिसेंबर २०२२ मध्ये वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपुरात त्याचे उद्घाटन केले होते. शिर्डी ते भरवीर हा ८० किमी अंतराचा दुसरा टप्पा मार्च २०२३ मध्ये सुरू करण्यात आला.

भरवीर ते इगतपुरी (नाशिक) हा तिसरा २५ किमीचा टप्पा मार्च २०२४ मध्ये खुला झाला. चौथा आणि शेवटचा तसेच अत्यंत महत्त्वाचा टप्पा असलेला इगतपुरी ते भिवंडीतील आमणे गाव परिसराचा टप्पा ७६ किमी इतका आहे. यातील बहुतांश भाग सह्याद्री पर्वतरांगातून गेलेला आहे अंतिम टप्प्यामध्ये एकूण ११ किमीचे पाच बोगदे असून, इगतपुरी येथील बोगदा आठ किमी लांबीचा आहे तो देशातील सर्वाधिक लांबी आणि रुंदीचा बोगदा असल्याचे सांगण्यात येत आहे. या बोगद्यामुळे आठ मिनिटांत इगतपुरी ते कसारा हे अंतर पार करता येणार आहे.



### महामार्गालगत विविध प्रकल्प

- डिसेंबर २०२२ पासून समृद्धी महामार्गामुळे नागपूरहून मुंबईच्या दिशेने होत असलेली वाहतूक जलदगतीने होऊ लागली आहे. नाशवंत शेतमालाची वाहतूक वेगाने करण्यासाठी महामार्गाचा वापर करण्यात येणार आहे. 'समृद्धी'लगत नागपूर विभागात नागपूर, मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, पुणे विभागात तळेगांव आणि कोकण विभागात भिवंडी येथे आशियाई विकास बँकेच्या अर्थसाहाय्याने 'ॲग्रो लॉजिस्टिक हब' उभारण्यात येणार आहे. यामाध्यमातून मुख्यत्वे शेती उत्पादनांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तविण्यात येत आहे.

### खास वैशिष्ट्ये

- समृद्धी महामार्ग नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नाशिक आणि ठाणे असे १० जिल्हे, २६ तालुके आणि ३९२ गावांतून जातो. या प्रकल्पाची लांबी ७०१ किमी आहे. सहापदरी मार्गिका असून, महामार्गावर ३२ मोठे पुल, ३१७ लहान आकाराचे पुल आहेत. वाहनांसाठी ६१ उन्नत मार्गिका, २२९ भुयारी मार्गिका, तर हलक्या वाहनांसाठी १२१ भुयारी मार्गिका तयार करण्यात आल्या आहेत. वन्यजीवांसाठी १८ भुयारी आणि आठ उन्नत मार्गिका तयार केल्या आहेत. एकूणच राज्याच्या आर्थिक विकासात 'समृद्धी'चा मोठा वाटा राहणार असल्याचेही मानले जात आहे.

# बांधकाम मलब्याची समस्या मोठी; व्यवस्थापनासाठी लवकरच धोरण!

## आयुक्त डॉ. अभिजित चौधरी : संबंधितांना दंड ठोठावण्याचा विचार पुढे



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३० :** शहरात होणारे बांधकाम व पाडकामानंतर निर्माण होणाऱ्या मलब्याची विल्हेवाट व त्यावर प्रक्रिया करून पुनर्वापर करण्याच्या संदर्भात लवकरच एक सर्वसमावेश धोरण आखावे, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाअंतर्गत (एनसीएपी) शाश्वत बांधकाम व पाडकाम (सी अँड डी) मलबा व्यवस्थापन - नागपूर शहर यावर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, एलआयटीचे अधिष्ठाता डॉ. अतुल वैद्य, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकारी हेमा देशपांडे, हैदराबाद सी अँड डी वेस्ट प्रायव्हेट लिमिटेडचे महाव्यवस्थापक मोहम्मद नसुरुल्लाह, नीरीच्या प्रधान शास्त्रज्ञ डॉ. संगीता गोयल, मनपा सल्लागार डॉ. गीतांजली कौशिक, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार उपस्थित होते. शहराचा व्याप व विकास होत असल्याने बांधकामाचे प्रमाण वाढत आहे. नागपूर महापालिकेने घरगुती घनकचरा व्यवस्थापन यावर नियंत्रण मिळविले आहे. मात्र, नवे बांधकाम तसेच जुन्या इमारतीच्या पाडकामानंतरचा मोठा मलबा, ही नवी समस्या निर्माण झाली आहे. मलब्याचा पुनर्वापर करण्यासाठी भांडीवाडी येथे प्रकल्प सुरू आहे. बांधकाम व पाडकाम क्षेत्रापासून मलबा प्रकल्पास्थळी नेणे व त्यावर प्रक्रिया झाल्यानंतर पुनर्वापरासाठी बांधकामाच्या ठिकाणी पोहोचविणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करून सर्वसमावेशक धोरण विहीत कालावधीत तयार करावे, असे निर्देश डॉ. चौधरी यांनी दिले. एलआयटीचे अधिष्ठाता डॉ. अतुल वैद्य म्हणाले, की मलबा रस्त्यावर टाकणाऱ्यांना मोठा दंड ठोठावावा. यासाठी नियमांमध्ये बदल करण्याची गरज आहे. मलब्यामुळे आरोग्यावर दुष्परिणाम तसेच वाहतुकीला अडथळे निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. हैदराबाद सी अँड डी वेस्ट प्रायव्हेट लिमिटेडचे मोहम्मद नसुरूल्लाह यांनी बांधकामातून निघणाऱ्या मलब्यावर होणाऱ्या प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. डॉ. संगीता गोयल यांनी सुद्धा बांधकाम व पाडकामामूळे वायू प्रदूषणाबाबत विस्तृत माहिती सादर केली. गौरव अग्रवाल यांनी मलब्याच्या वाहतुकीबाबत सविस्तर सांगितले.

### CAPTION | ॲक्सिडंट स्पॉट



**नागपूर : असे म्हणतात, की रस्त्यांवरील दुर्घटना घडवून आणण्यात मानवी चुका ९९ टक्के आणि रस्त्यांसंबंधी तसेच तांत्रिक चुका फक्त एक टक्का असतात हेच पाहा ना नागपुरातील क्रीडा चौक ते टीबी वार्ड चौकदरम्यानच्या दुभाजकावर असे तुटलेले लोखंडी अँगल ( जाहिरातसंबंधी) रोवलेले आहेत त्यावर कुणी पडल्यास कल्पना करवत नाही. पुन्हा असेही म्हणता येईल, की लक्षात घेतो कोण?**

# उष्माघात प्रतिबंध : शासकीय रुग्णालयांत 'कोल्ड वॉर्ड'

## आरोग्य यंत्रणा सज्ज, खासगी रुग्णालयांत सेवा बंधनकारक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३० :** भीषण उन्हामुळे उष्माघाताचा धोका वाढत असून, आरोग्य यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवण्यात आलेली आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशावरून नागपूर शहरातील १० शासकीय रुग्णालयांत 'कोल्ड वॉर्ड'ची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, खासगी रुग्णालयांना देखील उष्माघातासाठी 'अलर्ट' राहण्याचे निर्देश मनपा प्रशासनाने दिले आहे.



उष्माघात प्रतिबंधासाठी नागपूर शहरात विविध प्रकारच्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल), इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो), शासकीय आयुर्वेदिक रुग्णालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय रुग्णालय कामठी रोड, सेंट्रल रेल्वे रुग्णालय, ईएसआयएस रुग्णालय सोमवारी पेठ, डागा रुग्णालय गांधीबाग, तसेच मनपाचे इंदिरा गांधी रुग्णालय गांधीनगर, पाचपावली स्त्री रुग्णालय, आयसोलेशन हॉस्पिटल इमामवाडा या १० रुग्णालयांमध्ये विशेष 'कोल्ड वार्ड' तयार केले आहेत. १०८ च्या रुग्णवाहिका तसेच मनपाच्या रुग्णवाहिका सज्ज आहेत. उष्माघाताच्या रुग्णांवर तत्काळ उपचार व्हावेत यासाठी सर्व खासगी रुग्णालयांना देखील पत्र देण्यात आले आहे. खासगी रुग्णालयांत उष्माघाताच्या रुग्णांची नोंद झाल्यास त्याचा अहवाल मनपा आरोग्य विभागाला पाठविण्याचे देखील आदेश देण्यात आले आहे.

विशेष म्हणजे खासगी रुग्णालयांमध्ये 'कोल्ड वार्ड' उपलब्ध नसल्यास संपर्क करण्याचे देखील आवाहन करण्यात आले आहे. मनपाद्वारे विविध आजारांच्या संदर्भात तसेच उन्हाळ्यात उष्माघाताच्या संदर्भात रुग्णांचा नोंदणी अहवाल नियमितरित्या खासगी रुग्णालयांकडून मागविण्यात येत असतो, अशी माहिती मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी दिली.

# अपघात दाव्यातील नुकसान भरपाईसाठी संपर्क साधावा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३० :** वाहन अपघात दावा न्यायाधिकरणाने मे २०२३ आधी पारित केलेल्या अवॉर्ड्समधील नुकसान भरपाईची रक्कम प्राप्त न झालेल्या पक्षकारांनी नुकसान भरपाईसाठी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ज्या पक्षकारांनी/लाभार्थ्यांनी वाहन वाहन अपघात न्यायाधिकरणात नुकसान भरपाईची रक्कम मिळणेबाबत अर्ज कलेले आहेत व ते प्रलंबित आहेत, तसेच त्यातील नुकसान भरपाईची रक्कम ज्यांना अवार्ड प्रमाणे प्राप्त झालेली नाही किंवा ज्यांना मंजूर नुकसान भरपाईची रक्कम अंशत: किंवा काही प्रमाणात प्राप्त झाली आहे; परंतु संपूर्ण रक्कम प्राप्त झालेली नाही, तसेच ज्या पक्षकारांना/लाभार्थ्यांना मुदत ठेव रक्कम किंवा मुदत ठेव प्रमाणपत्र अद्याप पावेतो प्राप्त झाले नाहीत, त्या सर्व पक्षकारांनी त्वरित मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, जिल्हा व सत्र न्यायालय, नविन विस्तारित ईमारत, चौथा माळा, खोली कमांक ४१६ व ४२० नागपूर येथे आस्थापना विभाग व नाझर विभागाशी किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय नागपूर यांच्याशी संपर्क साधावा नुकसान भरपाईची रक्कम प्राप्तीसाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी. दरम्यान, उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यासाठी अनुदान उपलब्ध करून असून, अनुदानाचे वाटप प्रक्रिया विनाविलंब पार पडणार असल्याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

### ही कागदपत्रे आणावीत

- लाभार्थ्यांनी आवश्यक दस्तावेज म्हणजेच आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक, बँकेचे जोडपत्र मूळ प्रत, अपघात दावा न्यायाधिकरणाने पारित केलेला न्यायानिर्णय/न्यायनिवाडा, विमा कंपनीने दाखल केलेले युटीआर इन्व्हाईस प्रत, ओळख दर्शविणारे प्रमाणपत्र आणि दोन पासपोर्ट फोटो अपघात दावा प्राधिकरण, नागपूर येथे जमा करावे, जेणेकरून लाभार्थ्यांना त्यांचे अनुदानाचे वाटप त्वरित व योग्यरित्या करणे सोयीचे होईल.

# बोगस डॉक्टरांना हुडकून शिक्षा ठोठावणार

## जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांची माहिती, ग्रामीण भागात अधिक लक्ष केंद्रित

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३० : नागपूर जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन दोषींविरुद्ध कारवाई करण्यात यावी जिल्हास्तरीय समितीच्या धर्तीवर तालुका पातळीवर समित्या अधिक प्रभावी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले.**



बोगस डॉक्टरांविरुद्ध कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियमासह (१९६१) शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. ग्रामीण भागामध्ये वैद्यकीय उपचारात कोणाची फसवणूक होऊ नये,यासाठी ग्रामीण भागातील प्रशासकीय प्रमुख म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर जबाबदारी टाकण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण भागात अधिक लक्ष केंद्रित केले जाईल. एखाद्या गावात बोगस डॉक्टर प्रॅक्टिस करत असल्यास तेथील कोणत्याही नागरिकाला तत्काळ तक्रार करण्यासाठी मोबाईल अपसह संवाद सेतू क्रमांकावर हा विषय जोडला जाईल. यात आलेली तक्रार कोणाला नष्ट करता येणार नाही, असे जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांनी स्पष्ट केले. या कारवाईसाठी धाड टाकण्याकरीता स्वतंत्र पथक तयार केले असून, यात वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विस्तार अधिकारी, औषध निर्माण अधिकारी, सहाय्यक, बीट अंमलदार / पोलिस पथक, तालुकास्तरीय अन्न व औषध विभागाचा प्रतिनिधी राहील. या प्रत्येकांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. सोबतच महानगर पालिकास्तरावरही समितीची स्थापना करण्यात येत आहे.

# वाहतूक पोलिसांना शोल्डर रिफ्लेक्टर, सनकेअर औषधे

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ३० :** शहर पोलिस डॉ. रविंद्र कुमार सिंगल यांच्या हस्ते सुमारे ५५० वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांना उष्माघातापासून संरक्षण मिळण्यासाठी होमिओपॅथीचे 'सनकेअर'औषध तसेच रात्री अंधारात कर्तव्य बजावताना दृश्यता वाढविण्यासाठी 'शोल्डर रिफ्लेक्टर' उपकरणाचे वितरण करण्यात आले



संबंधित अभिनव संकल्पना डॉ. अनिल सुदामे यांच्या पुढाकाराने आकाराला आली आहे सदर उपक्रमात मैत्री परिवार संस्थेचे सचिव प्रमोद पेंडके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. यासंदर्भातील कार्यक्रमाला सहपोलिस आयुक्त निसार तांबोळी, अतिरिक्त आयुक्त (गुन्हे) संजय पाटील, वाहतूक पोलिस उप आयुक्त अर्चित चांडक यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी आयुक्त डॉ. सिंगल म्हणाले, उन्हाच्या तीव्रतेमुळे पोलिस अंमलदारांना अनेक आरोग्यविषयक समस्या भेडसावत असतात. त्यामुळे 'सनकेअर' औषधाचे वितरण हा एक वेळेवर आणि काळाची गरज ओळखून राबवलेला उपक्रम आहे. उप आयुक्त अर्चित चांडक यांनी सांगितले, की वाहतूक पोलिस बांधवांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज आहे आणि भविष्यातही अधिक अशा उपक्रमांचे आयोजन केले जाईल.





अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, गुरुवार, दि. १ मे २०२५





# बेकायदेशीर होर्डिंग्जला महापालिकेचा पाठिंबा!

## एजन्सीधारकांच्या मनमानीला चाप बसणार का?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० : शहरात महापालिकेचे ९५ होर्डिंग्ज असून, दहा एजन्सीला काम देण्यात आले आहे. या एजन्सीधारकांकडून रक्कम घेऊन त्यांना मोकळे रान करून देण्यात आले आहे. त्यामुळे एजन्सीधारक सर्व नियम धाब्यावर बसवून महापालिकेला वेठीस धरत आहेत. वाढीव दराला विरोध करणाऱ्या एजन्सीधारकांनी अद्यापपर्यंत होर्डिंग्ज लिलाव निविदेला प्रतिसाद दिला नाही? कारण याच्यातून त्यांचे भले होत असल्याने ते निविदेकडे पाठ फिरवित आहेत.**



अकोला शहरात मुख्य रस्त्यांवर तसेच मोक्याच्या ठिकाणी महापालिकेने होर्डिंग्ज लावण्यासाठी जागा निश्चित केल्या आहेत. काही होर्डिंग्ज महापालिकेच्या तर काही होर्डिंग्ज महसूल विभागाच्या जागेवर आहेत. हे सर्व होर्डिंग्ज महापालिका क्षेत्रात येत असून या होर्डिंग्जमधून महापालिकेला महसूल मिळतो. सदर होर्डिंग्ज दहा एजन्सीला देण्यात आले असून, यामधून महापालिकेला अल्प महसूल मिळत आहे; मात्र एजन्सीधारकांची मनमानी पाहता आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी होर्डिंग्जचा लिलाव करण्यासाठी निविदा काढली होती; मात्र प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा फेरनिविदा काढण्यात आली. त्यालाही प्रतिसाद मिळाला नाही. या दरम्यान तत्कालीन आयुक्त कविता द्विवेदी यांनी एजन्सीधारकांची मुदत संपल्यानंतर दरवाढ केली होती; परंतु या दरवाढीला एजन्सीधारकांनी विरोध केला. त्यामुळे नाइलाजाने सदर एजन्सीधारकांना मुदतवाढ देण्यात आली. आपल्याशिवाय कुणालाही होर्डिंग्ज मिळू नये, याची तजवीज लावण्याचे काम सुरुवातीपासून या एजन्सीधारकांकडून होत आहे.

त्यामुळे प्रशासनाला खिंडीत पकडण्याची एकही संधी एजन्सीधारक सोडत नाहीत; पण सर्व नियम धाब्यावर बसवत कमाई कशी होईल, याकडे मात्र त्यांचे लक्ष्य असते. वर्षातून एकदा बड्या होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे क्रमप्राप्त असतानाही याकडे दुर्लक्ष केले जाते. शहरात मोक्याच्या ठिकाणी बडे होर्डिंग्ज लावण्यात आले असून, या होर्डिंग्जची अवस्था दयनीय झाली आहे. मुंबईत होर्डिंग्ज कोसळण्याची घटना घडल्यानंतर महापालिकेला जाग येऊन त्यांनी केवळ कागदोपत्री स्ट्रक्चरल ऑडिट केल्याचे सादर केले आहे.

### क्यूआर कोडचा विसर

प्रत्येक होर्डिंग्जवर क्यूआर कोड लावणे बंधनकारक असतानाही केवळ दाखवण्यासाठी काही दिवस याचा अवलंब करण्यात आला; मात्र त्यानंतर हा नियम धाब्यावर बसविण्यात आला असून, शहरात लावण्यात आलेल्या एकाही होर्डिंग्जवर क्यूआर कोडचा पत्ता नाही.

### अवैध होर्डिंग्जला चाप नाही

शहरात अवैध होर्डिंग्जचा मोठा खेळ सुरू असून महापालिकेला लाखो रुपयांचा चुना लावला जात आहे. अवैध होर्डिंग्जवर महापालिकेकडून कारवाई होत नसल्याने कायदेशीर होर्डिंग्जपेक्षा बेकायदेशीर होर्डिंग्जची संख्या वाढली आहे. शहराचे विद्रूपीकरण करणाऱ्या अवैध होर्डिंग्जला महापालिकेचा छुपा पाठिंबा असल्याने महापालिकेची नुकसान होत आहे.

### तीनचाकी सायकल रिक्षावर कारवाई नाही

तीन व चारचाकी रिक्षातून जाहिरात संदर्भात महापालिकेने धोरण निश्चित करून शुल्क निश्चित केले आहे. तीन व चार चाकी रिक्षावर जाहिरात फलक लावून केलेल्या प्रसिद्धीसाठी शुल्क आकारण्यात आले आहे. दररोज किमान ५० रुपये शुल्क आकारण्याचे धोरणात नमूद आहे; मात्र महापालिकेचे नियंत्रण नसल्यामुळे शुल्क न भरता सायकल रिक्षा व अन्य वाहनांच्या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणावर जाहिरात सुरू आहे.

### यांच्यावर कारवाई का नाही?

बेकायदेशीर होर्डिंग्ज लावण्यात खासगी शाळा व शिकवणी वर्ग मोठ्या प्रमाणात पुढे आहे. विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये उकळणाऱ्या या शाळा व कोचिंग क्लासधारकांवर महापालिकेकडून कुठलीही दंडात्मक कारवाई होत नसल्याने बेकायदेशीर होर्डिंग्जमध्ये वाढ झाली आहे.

# उद्यापासून तीन दिवस पाणी पुरवठा बंद

## जलशुद्धीकरण कामामुळे पाणी टंचाईचे संकट

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. ३० :** अकोला पाणी पुरवठा योजनेच्या महान येथील जलशुद्धीकरण केंद्रात दुरुस्तीसाठी जलशुद्धीकरण केंद्रातून ६५ एमएलडी प्लॉन्टवरून शहरातील २५ जलकुंभाचा पाणी पुरवठा २, ३, ४ मे रोजी बंद राहणार आहे. त्यामुळे साडेचार लाख नागरिकांना आठ दिवस भरउन्हात पाण्यासाठी भटकंती करावी लागणार आहे.

महान येथील जलशुद्धीकरण ६५ एमएलडी क्षमतेच्या केंद्रात क्लारिफायर तसेच इतर अत्यावश्यक दुरुस्तीचे काम करणे अत्यावश्यक होते. हे काम करण्यासाठी ६५ एमएलडी केंद्रातील पाणी पुरवठा बंद करावा लागणार आहे. हे दुरुस्तीचे काम करण्याचा निर्णय महापालिका पाणी पुरवठा विभागाने घेतला असून, यासाठी तीन दिवसांचा कालावधी लागणार आहे. परिणामी २, ३ व ४ मे रोजी काम केले जाणार आहे. त्यामुळे सलग तीन दिवस पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तूर्तास शहराला पाच दिवसांआड पाणी पुरवठा सुरू आहे. ज्या जलकुंभाचा पाणी पुरवठा ठप्प राहणार आहे, त्या भागातील नागरिकांनी पिण्याच्या पाण्याची पुरेशी साठवणूक करावी तसेच पाण्याचा अपव्यय टाळावा व अकोला महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन मनपा पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल डोईफोडे यांनी केले आहे.

### या जलकुंभावरील पाणी पुरवठा होणार बाधित

श्रद्धा नगर, केशव नगर, आदर्श कॉलनी, नेहरू पार्क, तोष्णीवाल लेआउट, हरिहरपेठ, लोकमान्य नगर, जोगळेकर प्लॉट, गंगा नगर, मराठी स्कूल, महाजनी प्लॉट, हिंदी स्कूल, रेल्वे स्टेशन, अकोट फाइल, उमरी, गुडधी, मलकापूर, खडकी या २५ जलकुंभांचा पाणी पुरवठा ठप्प राहणार आहे.

### या जलकुंभाचा पाणी पुरवठा सुरळीत

दरम्यान, २५ एम.एल.डी. प्लांटवरून शिव नगर, आश्रय नगर, बस स्टॅण्ड, शिवनी, शिवर तसेच शिवापूर येथील जलकुंभावरून होणारा पाणीपुरवठा सुरळीत राहणार आहे.

## महाराष्ट्र दिनाचा मुख्य सोहळा शास्त्री क्रीडांगणावर

**अकोला :** महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिवसानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य सोहळा गुरूवार, दि. ०१ मे रोजी लालबहादूर शास्त्री क्रीडांगण येथे सकाळी ८ वाजता होईल. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अ‍ॅड. आकाश सुनीता पांडुरंग फुंडकर यांच्या हस्ते मुख्य सोहळ्यात ध्वजारोहण होईल.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ७.१५ वाजता जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. मुख्य सोहळ्यात ध्वजारोहण, राष्ट्रगीत, राज्यगीत, पथसंचलन आदी कार्यक्रम होतील.

# अण्णाभाऊ साठे योजनेतील निधी वाटपावरून शिंदे सेनेत भाजपाविरुद्ध नाराजी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतून अकोल्याला २०२४-२५ या आर्थिक वर्षात १५ कोटींचा निधी मंजूर झाला. मात्र या निधीच्या वाटपावरून शिंदे गटात भाजपाविरुद्ध नाराजी निर्माण झाली आहे. निधीच्या वापरासाठी प्रशासनाकडून नागरिकांच्या गरजांऐवजी माजी नगरसेवकांच्या सूचनांवर कामे मंजूर करण्यात आल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, सध्या महापालिकेत निवडून आलेले कोणतेही नगरसेवक नसतानाही, प्रशासनाने माजी नगरसेवकांच्या प्रस्तावांनुसार कामांना मंजुरी दिली असल्याची चर्चा सुरू आहे, यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भाजपने लोकसभा व विधानसभा निवडणुकीत शिंदे सेनेचा पाठिंबा घेतला; मात्र आता विकास निधीच्या वाटपात शिंदे सेनेच्या प्रभागांना डावलले जात असल्याची चर्चा आहे. ''भाजपने निवडणुकीसाठी आमचा वापर करून घेतला आणि आता आम्हालाच डावलत आहेत, असा सूर शिंदे सेनेतील कार्यकर्त्यांमध्ये आहे. खरी गरज असलेल्या वस्तींकडे दुर्लक्ष करून भाजपशी संबंधित भागातच कामे मंजूर करण्यात आल्याने पक्षांतर्गत विसंवाद पुन्हा उफाळून आला आहे. या घडामोडींमुळे आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकारण तापणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### महायुतीत वाढली धुसफूस

निधीच्या वाटपामागे पक्षीय हितसंबंध असल्याची चर्चा जनतेमध्ये सुरू असून, भाजपकडून सत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप शिंदे सेनेकडून करण्यात येत असून, या निधी वाटपावरून महायुतीत धुसफूस वाढली आहे.

# हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

## सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ३० :** हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, विवाहितेचा पती व सासरच्या मंडळींनी संगनमत करून अनेक वर्षे शारीरिक व मानसिक त्रास दिला. या प्रकरणी सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात एएसआय राम गावंडे यांच्या तपासांतर्गत अप.क्र. १५०/२५ प्रमाणे भारतीय दंड विधान कलम ४९८ (अ), ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दीप्ती नितेश शिरोडे (२६), रा. शांतिनिकेतन बंगलोज, गोल्डन स्क्वेअर, अंजनी हाइट, बिल्डिंग नं. ३०२, मोठी उमरी, अकोला, ह्या खासगी नोकरी करणाऱ्या महिलेने पोलिसांत तक्रार दिली. घटनाकाळ ३० जून २०२१ ते ३ एप्रिल २०२४ दरम्यान असून, फिर्यादीवरून गुन्हा २९ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५:३८ वाजता दाखल करण्यात आला.

आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत नितेश गणेश शिरोळे पती,(३४), गणेश वकिराजी शिरोळे सासरे(५६), सविता गणेश शिरोळे सासू (४७), आरती मंगेश गवई वहिनी, (२८), पूजा नागसेन तायडे नंदाई, (३०),नागसेन तायडे नंदोई(४०), सर्व आरोपी रा. कळोदरा, सुरत, गुजरात येथील रहिवासी आहेत.

फिर्यादीने आरोप केला की, लग्नात समाधानकारक सोय केली नाही म्हणून पती व सासरच्या लोकांनी तिला सतत त्रास दिला. ''माझ्या आई-वडिलांकडून कॅनडासाठी लाईक लावून घेऊन ये, अन्यथा सोबत राहू नको'' अशी धमकी देत पती तिला सतत मानसिक तणावात ठेवत असे. तिच्यावर चरित्रावरून संशय घेऊन, वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण केली जात होती. एवढेच नाही तर लहानसहान गोष्टीवरून वाद घालून, तिला व मुलीसह घराबाहेर काढले गेले.

# पोलीस आणि बालकल्याण समितीच्या सतर्कतेमुळे बालविवाह टळला

## बार्शीटाकळी पोलिसांची तत्पर कारवाई

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** बार्शीटाकळी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील ग्राम परांडा येथे एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह थांबवण्यात पोलिसांनी आणि बालकल्याण समिती अकोलाने महत्त्वाची भूमिका बजावली. ठाणेदार दीपक वारे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, एका अल्पवयीन मुलीचे तिच्या मामाच्या घरी लग्न लावण्यात येणार होते.



ही माहिती मिळताच ठाणेदार दीपक वारे यांच्या नेतृत्वाखाली नाफडे, हेड कॉन्स्टेबल नागसेन वानखडे, पोलीस अंमलदार अजय अंभोरे आणि चालक नागे यांनी तत्काळ मध्यरात्री ग्राम परांडा गाठले. त्यांनी संबंधित मुलीच्या पालकांशी समजूतदारपणे संवाद साधून, हा विवाह कायद्यानुसार बेकायदेशीर असल्याचे समजावून सांगितले. त्यांच्या समजुतीमुळे होणारा बालविवाह थांबवण्यात यश आले. यानंतर बालकल्याण समिती अकोलाचे अध्यक्ष प्रांजली जयस्वाल, समन्वयक हर्षाली गजभिये, सदस्य विशाल गजभिये, तसेच एन्करेज फाउंडेशन अकोलाचे अध्यक्ष महेंद्र गनोदे, समुपदेशक कपिल बहाल आणि दिवेश खंडारे यांनी घटनास्थळी हजर राहून संबंधित अल्पवयीन मुलीचा जबाब नोंदवला आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. ही कारवाई केवळ पोलिसांची तत्परता नव्हे तर सामाजिक जबाबदारीचे भान ठेवणाऱ्या संस्थांची एक उत्कृष्ट समन्वयी कामगिरी ठरली. प्रशासनाच्या या जागरूकतेमुळे एका निष्पाप मुलीचे बालपण वाचवण्यात मोठे यश मिळाले आहे.

# नीट क्लासच्या १८ वर्षीय तरुणीचा विनयभंग!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### गुन्हा दाखल

**अकोला, दि. ३० :** सिव्हिल लाइन पोलीस स्टेशन अंतर्गत एका १८ वर्षीय युवतीने दाखल केलेल्या तक्रारीवरून १८ वर्षीय तरुणावर लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नीटची तयारी करण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यातून आलेल्या एका अठरा वर्षीय तरुणीचा तिच्या वर्गातील युवकांनी तिच्यासोबत बळजबरी करण्याचा प्रयत्न करून विनयभंग केला. तिने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी नोहेद अली नवाब अली (रा. धोत्रा शिंदे, ता. मूर्तिजापूर) याच्याशी मे २०२४ पासून नीट क्लासच्या निमित्ताने ओळख होती. २९ एप्रिल २०२५ रोजी आरोपीने फिर्यादीला महालक्ष्मी अपार्टमेंट, जठारपेठ येथील मित्राच्या फ्लॅटवर बोलावून घेतले. तेथे आरोपीने जबरदस्तीने शारीरिक संबंधासाठी दबाव आणला. फिर्यादीने विरोध केला असता, आरोपीने तिला जवळ ओढण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी काही लोक घटनास्थळी पोहोचले व फिर्यादीला पोलीस स्टेशनला घेऊन आले.

याप्रकरणी प्रो. पीएसआय शामली निकम यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ७५(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# अकोल्यात अक्षय्य तृतीया थाटात साजरी; कोट्यवधींची उलाढाल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीया या शुभ दिनानिमित्त अकोला शहरात भक्तिभाव आणि खरेदीचा उत्साह शिखरावर पोहोचला. ३० एप्रिल रोजी सकाळपासूनच शहरातील लक्ष्मी, विष्णू व गणेश मंदिरांत भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पूजाअर्चा, हवन, अन्नदान, वस्त्रदान आदी धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांनी शहरातील वातावरण पावन झाले होते.

'अक्षय्य' म्हणजे नाश न होणारे, असा अर्थ असल्याने या दिवशी संपत्ती, सौख्य आणि समृद्धी लाभावी या हेतूने नागरिकांनी पारंपरिक पद्धतीने पूजाविधी केला. यंदा या दिवशी गृहप्रवेश, नामकरण, नवीन व्यवसायाचा शुभारंभ यांसारखी अनेक शुभकार्येही करण्यात आली.

दुसरीकडे बाजारपेठांमध्येही अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने खरेदीचा जोरदार उत्साह दिसून आला.

विशेषतः सोन्याच्या खरेदीला नागरिकांनी प्राधान्य दिले. शहरातील प्रमुख सराफ व्यावसायिकांनी सांगितले की, सोन्याच्या दरात वाढ असूनही ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात दागिन्यांची खरेदी केली. याशिवाय पूजेचे साहित्य, फळे, फुलं, सुवासिक वस्तू, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, तसेच दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या खरेदीलाही विशेष मागणी होती. वाहन विक्री केंद्रांवर वाहनांची बुकिंग व डिलिव्हरी अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर करण्यात आली. अनेकांनी आपल्या नवीन वाहनांचे पूजन करून घराकडे प्रस्थान केले.

या दिवशी हजारो नागरिकांनी बाजारपेठेत खरेदी केली असून कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. त्यामुळे अकोल्यात यंदाची अक्षय तृतीया केवळ धार्मिकच नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही गतिमान ठरली.



**साडेतीन मुहूर्तापैकी असलेले मुहूर्त अक्षय्य तृतीयाच्या पावन पर्वावर बुधवारी सकाळपासून सोने-चांदी खरेदी करण्यासाठी खंडेलवाल अलंकार केंद्र येथे ग्राहकांनी एकच गर्दी केली होती. ( छाया. संजय ताथुरकर )**




## थोडक्यात

### कराटे लीग राज्यस्तरीय स्पर्धेत हिंदवी आंबेकरला सुवर्णपदक

**वाशिम :** बारामती पुणे येथे दि. २६ व २७ एप्रिल २०२५ रोजी शरयु प्रतिष्ठान द्वारा आयोजित ५ व्या महाराष्ट्र चॅम्पियन कराटे लीग राज्यस्तरीय स्पर्धेत वाशिम येथील कानडे इंटरनॅशनल स्कुल मध्ये इयत्ता ५ वी मध्ये शिकणारी हिंदवी शंकर आंबेकर हिने राज्यस्तरीय प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक पटकावले. या स्पर्धेत तिने सलग चार राऊंड जिंकत फायटिंगमध्ये अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या प्रतिस्पर्ध्यावर ४ - ० अशी बाजी मारली. या संपूर्ण स्पर्धेमध्ये हिंदवीच्या उत्कृष्ट सादरीकरणामुळे तिला बेस्ट फायटरची ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. यापूर्वीसुद्धा हिंदवीने जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय स्पर्धेत अनेक बक्षिसं पटकावली आहेत. तिच्या या यशाचे श्रेय तिने तिचे गुरु व कोच सेन्साई निखिल देशमुख यांना दिले आहे. तिच्या या यशाबद्दल समाजाच्या सर्वच स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### गोलवाडी येथील जलवाहिनी फोडली; बीडीओंकडे तक्रार

**मंगरूळपीर :** गोलवाडी येथील पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फोडल्याची तक्रार येथील ग्रामस्थांनी २८ एप्रिल रोजी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. ग्रामपंचायतीमार्फत गावात पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य नळाच्या पाइपलाइनवर गावकऱ्यांनी जागोजागी छेद घेऊन, त्यातून निघालेल्या पाण्याचा वापर स्वतः करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केला. नळ स्वतः चालू करणे, मोटार पंप सुरू करणे यासारखे प्रकार वाढीस लागले. यामुळे पाणी मिळत नाही, तरीही पाणीपट्टी सक्तीने वसूल केली जात आहे. पाणीटंचाईमुळे विशेषतः उन्हाळ्यात गावात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. यावर लवकरच उपाययोजना केली नाही तर जिल्हा परिषद वाशिम येथे उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला.

### सोलर हायमॅक्स दिवे बंद : नगर पंचायतचे दुर्लक्ष

**मानोरा :** येथील नगर पंचायतचे सर्वच प्रभागात सार्वजनिक ठिकाणी गेल्या काही दिवसांपूर्वी सुमारे २० सोलर हायमॅक्स दिवे लावण्यात आले आहे; मात्र यापैकी अनेक पोलवरील दिवे बंद पडले आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

याबाबत स्थानिकांनी अनेकदा नगर पंचायत प्रशासनाला सांगितले; मात्र ज्यांच्याकडे दुरुस्त करण्याची जबाबदारी आहे ते संबंधित कंत्राटदार याबाबत दखल घेत नाही. काही लोकांनी संबंधित कंत्राटदार यांना फोन केले असता ते फोन सुद्धा घेत नाही. याबाबत मुख्याधिकारी यांनी जातीने लक्ष घालून ज्या पोलवरील दिवे बंद पडले आहेत ते सुरू करावे आणि संबधित कंत्राटदार यांचे देयक अदा करू नये.अशी मागणी केली आहे.

# अतिक्रमण मोहीम की निव्वळ दिखावा?

। उमेश बोराटे ।

**शिरपूर जैन, दि. ३० : शिरपूर ग्रामपंचायतीने २९ एप्रिल रोजी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्याची घोषणा केली होती; मात्र प्रत्यक्षात ही मोहीम केवळ कागदोपत्रीच राहिली. गरीब लघुव्यवसायिकांनी स्वतःहून आपली दुकाने, टपऱ्या हटवून घेतल्या, तर धनदांडग्यांचे पक्के अतिक्रमण मात्र जसेच्या तसे उभे राहिल्याने ग्रामपंचायतीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**






## धनदांडग्यांचे अतिक्रमण कायम!

मोहम्मद इमदाद यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर १४ फेब्रुवारी २०२४ रोजी नागपूर खंडपीठाने आदेश दिला होता की, जिल्हाधिकारी वाशिम यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करून शिरपूरमधील सर्व अतिक्रमण काढण्यात यावे. त्यानुसार २९ एप्रिल रोजी अतिक्रमण हटविण्याची अंतिम तारीख निश्चित करण्यात आली होती. ग्रामपंचायतीने राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते जगदंबा देवी मंदिर पर्यंत अतिक्रमण हटविण्याचे जाहीर केले होते. परंतु मोहीमेच्या एक दिवस आधी म्हणजे २८ एप्रिल रोजी अनेक लघु व्यवसायिकांनी स्वयंस्फूर्तीने आपली टपरी, वेल्डिंग वर्कशॉप, हेअर सलून, चहा-पान टपऱ्या हटवून घेतल्या. दुसरीकडे, काही मोठ्या अतिक्रमणधारकांनी मात्र वेळेअंतीही अतिक्रमण काढले नाही. तरीही ग्रामपंचायतीने त्यांच्या अतिक्रमणावर कोणतीही कारवाई केली नाही. विशेष म्हणजे, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूवरील अतिक्रमणाकडेही ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केले. ही मोहीम निव्वळ फार्स ठरल्याची भावना लघु व्यवसायिकांमध्ये आहे. ''आम्ही गरीबांनी अतिक्रमण काढून घेतलं, पण धनदांडग्यांचं पक्कं बांधकाम तसंच राहिलं. हा अन्याय आहे,'' अशा प्रतिक्रिया संबंधित व्यवसायिकांनी व्यक्त केल्या. विशेष बाब म्हणजे, ही मोहीम राबवताना कोणते अतिक्रमण किती आहे, हे ग्रामपंचायतीने आधी निश्चितच केले नव्हते. परिणामी ज्यांचे पक्के अतिक्रमण होते त्यांच्यावर कारवाईच झाली नाही. या मोहिमेसाठी तब्बल ९३ हजार रुपयांचा खर्च करून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. दोन जेसीबी मशीन उपलब्ध होत्या, पण एकाही टपरीला हात लावण्याची वेळच आली नाही.

> ''जे अतिक्रमण सध्या राहिले आहे, त्याची मोजणी करून निश्चित करण्यात येईल. कोणालाही सूट दिली जाणार नाही. पुढील टप्प्यात ती अतिक्रमणे काढली जातील.
>
> **- संजय बेद्रे,** ग्रामपंचायत अधिकारी

### अधिकाऱ्यांची उपस्थिती असूनही निष्क्रियता

या मोहिमेसाठी सहाय्यक गटविकास अधिकारी आर.एस. कंकाळ, विस्तार अधिकारी वाय. पळसकर, ग्रामपंचायत अधिकारी संजय घुगे, सरपंच सिंधुबाई कांबळे, तहसीलदार सुनील देशमुख, मंडळ अधिकारी आदी उपस्थित होते. मात्र त्यांच्या उपस्थितीमध्येही अंमलबजावणीचा अभाव दिसून आला. एकंदरीत पाहता, उच्च न्यायालयाच्या आदेशाचा योग्य पद्धतीने व पारदर्शकतेने अंमल न झाल्याने, शिरपूरमधील अतिक्रमण विरोधी मोहीम ही निव्वळ दिखावा ठरली आहे.

## जिल्हा कचेरीसमोरील सुरू असलेले उपोषण बेकायदेशीर

### प.दि. जैन विद्यालयाच्या मुख्याध्यापकांचे उपोषणकर्त्यांना पत्र

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**वाशिम, दि. ३० :** श्री प. दि. जैन विद्यालय, कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विरुध्द जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेकायदेशीररित्या उपोषणास बसलेले संजय धरमचंद वाळली यांना संस्थेच्यावतीने दि. २९ एप्रिल रोजी पत्र देवून उपोषणापासून परावृत्त होण्याची विनंती करण्यात आली आहे. याबाबत त्यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, आपण एक अनसिंगचे दुकाणदार असतांना स्यादवाद एज्युकेशन सोसायटी, अनसिंग ता. जि. वाशिम यासंस्थेचे अध्यक्ष म्हणुन खोट्या सहया करुन संस्था व संस्थेअंतर्गत असलेल्या श्री प. दि. जैन विद्यालय अनसिंग ता जि वाशिम या शाळेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम, 'शिक्षण उपसंचालक कार्यालय अमरावती, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ अमरावती व शिक्षण विभाग माध्यमिक/ प्राथमिक जि प वाशिम या कार्यालयात वारंवार केलेल्या खोटया व निरर्थक तक्रारी करुन बेकायदेशिर उपोषणे करीत आहात. तसेच श्री प दी जैन विद्यालय अनसिंग ता जि वाशिम ही शाळा माध्यमिक व उच्च माध्यमिक असुन शाळेत १००० पेक्षा जास्त विद्यार्थी व विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. तथापी मी महीला मुख्याध्यापिका आहे म्हणुन आपण वारंवार शाळेत येवुन विद्यार्थीनी समोर अर्वाच्य भाषेत बोलुन विनाकारण शाळेतील शैक्षणिक वातावरण खराब करीत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी पत्रात पुढे म्हटले आहे की, संस्था परिशिष्ट- १ पीटीआरवरील संस्था सचिव, अदित्यकुमार हुकुमचंद वाळली व इतर तीन सदस्य आजरोजी हयात आहेत त्यांच्या ठरावानुसारच मला शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद वाशिम यांनी माझ्या मुख्याध्यापक पदास मान्यता दिली आहे. तसेच शिक्षण उपसंचालक कार्यालय अमरावती यांनी सुध्दा परिशिष्ट-१ पीटीआर नुसारच सादर केलेल्या प्रस्तावास शाळेतील उच्च माध्यमिक शिक्षीका कु. निकिता गोटे यांची वैयक्तीक मान्यता दिली आहे. त्यानुसार अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ अमरावती यांनी शालार्थ आयडी सुध्दा प्रदान केला आहे. तसेच शिक्षणाधिकारी जि. प. वाशिम हे सुध्दा आमच्या शाळेतील मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक व इतर वैयक्तीक मान्यता वेतन व भत्ते अथवा इतर काम असतील त्यास नियमानुसार मान्यता दिल्या असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शासन नियमानुसार संस्थेअंतर्गत असलेल्या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तीक मान्यता अथवा इतर प्रस्तावास शासनाची मान्यता देतांना वरीष्ठ कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे आजरोजी मान्यता असलेला संस्था परिशिष्ट-१ पीटीआर नुसारच प्रस्तावाची पडताळणी करुन मान्यता देत असतात याची आपणास अजिबात माहीती नाही असे दिसुन येत आहे. तसेच आपल्या नावाची संस्था परिशिष्ट १ पीटीआर वर कुठेही नोंद नाही किंवा तसा मान्यता असलेला कोणता पुरावाही नाही तरी आपण स्वतः संस्था अध्यक्ष म्हणुन वारंवार सहया करुन वरीष्ठ कार्यालयात शाळेबाबत तक्रारी देत आहात.

## वीज पुरवठा खंडित केल्याने नुकसान भरपाईची मागणी

**रिसोड :** कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता दूध डेअरीचा वीज पुरवठा खंडीत केल्या मुळे झालेल्या नुकसानाची आर्थिक भरपाई देण्याची मागणी जीवन मिल्क अँड फूड प्रॉडक्ट प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक गोविंद तोषणीवल यांनी २४ एप्रिल रोजी वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की रिसोड शहरा लगत करडा रोड वर जीवन मिल्क ॲण्ड फुड प्रोडक्टस प्रा.ली. रिसोड या नावाने दुध डेअरीचा उद्योग असून त्या जागी ११ के.व्ही.टाऊन एक फिडर वरून दोनशे के.व्ही चे ट्रान्सफार्मर असून २३ एप्रिल रोजी दुपारी साडेचार वाजता फॅक्ट्री समोरच ११ के.व्हीचे कंडेक्टर तुटले असता महावितरणचा कर्मचाऱ्यांनी तातडीने जोडले नाही.या उलट त्यांनी फक्ट्री मध्ये येणारा विद्युत पुरवठा खंडीत केला व ११ के. व्ही टाऊन एक वरून फिडर सुरु केले. या विषयाची त्यांनी मला कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना सुध्दा दिली नाही. याच कारणामुळे तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्याच्या हलगर्जी पणामुळे माझे ७८ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तद्वतच दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता माझ्या फॅक्ट्रीचा विद्युत पुरवठा सुरु करण्यात आल. माझा दुध डेअरीचा व्यवसाय असून सध्या उष्णता खुप मोठ्या प्रमाणात आहे.फॅक्टरी मधील अचानक विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे फॅक्टरी मधील दुध व दुग्ध जन्य पदार्थ खराब झाले.यात आमचे फार मोठे आर्थीक नुकसान झाले असुन याचा आम्हास मानसिक त्रास सुद्धा झाला आहे. आमची फॅक्टरी आपल्या कंपनीची रिसोड शहरातील दोन नंबरचा मोठा ग्राहक असुन आता पर्यंत लाखों रुपयांचें वीज देयक आम्ही भरले आहे. झालेल्या नुकसानला वीज वितरण कंपनी व कंपनीचे संबंधीत अधिकारी कर्मचारी दोषी आहेत. झालेल्या नुकसानाची भरपाई वीज वितरण कंपनीने त्वरीत द्यावी. अन्यथा कायदेशीर पाऊल उचलावे लागेल.असा इशारा गोविंद तोषनीवाल यांनी दिला आहे.

## तहानेने व्याकुळ झालेला रोही गाळात अडकला!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३० :** एप्रिल महिन्याच्या अखेरीस उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे, त्यासोबतच जिल्ह्यात पाण्याची टंचाईही भयावह रूप धारण करत आहे. मालेगाव तालुक्यातील पांगरी नवघरे येथील कोल्ही तलावात नुकतीच घडलेली हृदयद्रावक घटना जिल्ह्यातील पाणीटंचाईची गंभीरता अधोरेखित करते. या तलावात पाण्याअभावी मोठ्या प्रमाणात मासे मृत्युमुखी पडले आहेत. तसेच, खिर्डा परिसरातील काटेपूर्णा नदीच्या गाळात तब्बल तीन दिवस एक रोही अडकून पडलेला होता. सध्या जिल्ह्यातील बहुतांश नद्या, सिंचन तलाव आणि लघुप्रकल्प कोरडे पडले आहेत. ही स्थिती इतकी गंभीर झाली आहे की, वन्यप्राणीही पाण्याच्या खिर्डा परिसरातील काटेपूर्णा नदीपात्रात पाण्याच्या शोधात आलेला रोही तीन दिवस गाळात अडकलेला आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच, स्थानिक नागरिक आणि वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्न करून दि. २९ एप्रिल रोजी रोहीला सुरक्षितपणे बाहेर काढले. रोहीचा थकलेला श्वास, डोळ्यांतील भीती आणि सुरू असलेली संघर्षमय झुंज पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू आले. दुसरी दुर्दैवी घटना पांगरी नवघरे शिवारातील कोल्ही तलावातील आहे. या तलावातील साठवलेले पाणी पूर्णतः आटल्यामुळे तेथील मासे मृत्युमुखी पडले. या जिवांना शेवटचा श्वास घेण्यासाठीदेखील पाण्याचा थेंब मिळाला नाही.

# महात्मा बसवेश्वर चौकाच्या सौंदर्यीकरणासाठी

# लिंगायत समाज आक्रमक

## अतिक्रमण हटविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. ३० :** नगर परिषदेच्या दस्ताऐवजामध्ये नामकरण झालेल्या स्थानिक हिंगोली नाका येथील महात्मा बसवेश्वर चौकाला वाढत्या अतिक्रमणामुळे अवकळा आली आहे. याठिकाणी समाजबांधवांनी लावलेला महात्मा बसवेश्वर चौकाचा फलकही अतिक्रमणामुळे झाकोळला आहे. त्यामुळे समाजबांधवांच्या भावना दुखावल्या जात असून याठिकाणचे अतिक्रमण हटवून चौकाचे सौदर्यीकरण करण्याच्या मागणीसाठी महात्मा बसवेश्वर जयंती महोत्सव समितीच्या पुढाकारातुन मंगळवार, २९ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी व न.प. मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद आहे की, हिंगोली नाका चौकाचे नामकरण महात्मा बसवेश्वर चौक असे करण्याबाबतचा ठराव नगर परिषदेमध्ये भुतपुर्व नगराध्यक्षांच्या कार्यकाळात करण्यात आलेला आहे.

या चौकामध्ये समाजबांधवांच्या वतीने महात्मा बसवेश्वर चौक असे नामकरण करुन फलक लावण्यात आलेला होता. मात्र काही दिवसानंतर हा फलक तेथून नाहीसा झाला होता. सद्यस्थितीत या फलकाच्या चारही बाजुला अतिक्रमणाने वेढले आहे. महान थोर समाजसुधारक महात्मा बसवेश्वर यांनी १२०० वर्षापुर्वी समता, समानतेचा संदेश देवून समाजात मोठी जनजागृती केली आहे. महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याची दखल घेवून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लंडन येथे त्यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. अशा या जगप्रसिध्द महात्म्याच्या नावाने शहरातील हिंगोली नाका चौकाचे नामकरण महात्मा बसवेश्वर चौक असे करण्यात आले आहे. मात्र सद्यस्थितीत या चौकाची दुरावस्था झाली आहे. या चौकातील अतिक्रमण हटवून चौकातील सौदर्यीकरण करणे गरजेचे आहे. तरी नगर परिषदेने याकडे तातडीने लक्ष देवून महात्मा बसवेश्वर चौकातील अतिक्रमण तातडीने काढून सौदर्यीकरण करुन लिंगायत विरशैव समाज बांधवांच्या भावनांचा सन्मान करावा. अन्यथा आंदोलनाचा पवित्रा घेण्यात येईल असा इशारा निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. निवेदन देतांना उत्सव समितीच्या अध्यक्षा डॉ.सौ. अर्चना मेहकरकर, कार्यकारी अध्यक्ष पवन इसापुरे, उपाध्यक्ष सचिन फुटाणे, सचिव स्वप्नील जिरवणकर, गोपाल जिरवणकर, बाळासाहेब मेहकरकर, चंद्रकांत खेलुरकर, नंदकिशोर देशमुख, सुरेश घळे, किशोर पेंढारकर, दत्ता चवरे, संजय काष्टे, विजय महाजन, अशोक वणगे, सागर रावले, सौ. रेखा रावले आदींची उपस्थिती होती.

## वाशिम येथे कुराश खेळाडू प्रशिक्षण शिबिर

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. ३० :** कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्र संलग्न वाशीम जिल्हा कुराश असोसिएशनचा वतीने शुक्रवार २ ते ४ मे दरम्यान तीन दिवसीय कुराश खेळाडू प्रशिक्षण शिबीर वाशिम येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजीत करण्यात आले आहे.या शिबिरामध्ये कुराश खेळाडू प्रशिक्षण,पंच प्रशिक्षण ,कोच प्रशिक्षण आयोजित केले आहे. या शिबिरात वाशीम जिल्ह्यातील कारंजा, मंगरुळपीर, मानोरा, मालेगाव, रिसोड तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील खेळाडू, पंच व कोच सहभागी होऊ शकतात.या प्रशिक्षणा मध्ये ९ वर्ष ते ४५ वर्ष वयोगटातील खेळाडू सहभागी होऊ शकतात. वाशीम जिल्ह्यातील सर्व क्रीडा शिक्षक,पंच प्रशिक्षण घेऊ शकतात.

जेणे करून ते शालेय खेळा मध्ये आपल्या शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करू शकतील. कुराश खेळ हा उझबेकस्तान मधील एक पारंपारिक मार्शल आर्ट आहे. जो कुस्तीचा एक प्रकार आहे. या खेळात खेळाडूंना एकमेकांना खाली फेकण्याचा प्रयत्न करायचा असतो.पण शरीर आणि पायांचा उपयोग करता येत नाही. कुराश हा कुस्तीचा एक प्रकार आहे.ज्यात शरीराचा खालचा भाग (पाय) वापरता येत नाही. या मध्ये खेळाडू एकमेकांना जमिनीवर फेकण्याचा प्रयत्न करीत असतात. या खेळा मध्ये शरीराचा खालचा भाग (पाय) पकडणे किंवा मारणे यासाठी वापरता येत नाही. खांद्या, कंबर, किंवा मानेवर पकडणे किंवा मारणे यासाठी वापरले जाऊ शकते.पाठीवर फेकून विजय मिळवता येतो.तर बाजूला फेकल्यास गुण मिळतात. पोटावर किंवा कमजोर बाजूला फेकल्यास कमी गुण मिळतात. सर्वाधिक गुण मिळवणारा खेळाडू जिंकतो.

१९२८ मध्ये कझान येथे पहिली अधिकृत कुराश चॅम्पियनशिप झाली सन २००७ मध्ये आशियाई इनडोअर गेम्समध्ये कुराशचा समावेश करण्यात आला. ऑल्यांपिक काऊन्सिल ऑफ नुसार कुराश या खेळाची फार मोठी लोकप्रियता आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने कुराशमध्ये अनेक पदके जिंकली आहेत. कुराश खेळाचे खुप फायदे आहेत. शारीरिक क्षमता वाढवने, शरीराचे आत्मनियंत्रण आणि ताण व्यवस्थापनाला मदत करते.आत्मविश्वास वाढवते. कुराश हा एक मनोरंजक आणि शारीरिकदृष्ट्या फायदेशीर खेळ आहे. त्याच कारणाने मध्य आशियामध्ये लोकप्रिय आहे.

राज्य शासनाचा सरळ सेवा भरती मध्ये या खेळाला आरक्षण असल्याने खेळाडूला सरकारी नोकरी मध्ये त्याचा लाभ मिळतो. या शिबिराचा जास्तीत जास्त खेळाडूंनी लाभ घ्यावा असे आवाहन संघटनेचा वतीने करण्यात आले आहे. अधिक महिती व नाव नोंदणीसाठी संघटनेचे अध्यक्ष प्रा. अनिल बोंडे सचिव राजेंद्र सौदागर यांच्याशी या नंबरवर ९६२३७३७०७३ संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### कुरणखेड येथे आजपासून भारतीय संस्कृती बाल संस्कार शिबिर

**कुरणखेड :** भारतीय संस्कृती, वारकरी परंपरा या सर्वांचा संगम येत असलेल्या भारतीय संस्कृती शिबिर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कुरणखेड येथेल श्री चंडिका देवी संस्थान येथे सुरू होत आहे.
हजारो भागवतकार, कीर्तनकार घडवणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या शिबिराचा प्रारंभ कुरणखेड श्री चंडिका देवी संस्थान येथे संपन्न होत आहे. शिबिराचा प्रारंभ वैशाख शु. पंचमी ०२/०५/२०२५ वेळ: सायं. ५.०० पर्यंत होत असून, शिबिर समारोप वैशाख कृ. दशमी २२/०५/२०२५ वेळ : सकाळी ८.०० वाजता होणार आहे. यामध्ये प. पु. गुरुवर्य नारायण महाराज तन्हाळे, बाळा, प.पु. गुरुवर्य भक्तराज महाराज वाघमारे, प.पु. गुरुवर्य आनंदजी महाराज . प.पु. गुरुवर्य संजय महाराज पाचपोर यांच्या माध्यमातून जगन्माता आई चंडीकादेवी, परमपवित्र काटेपूर्णा नदी तिरावर, निसर्गरम्य वातावरणात गुरुकुल पदतीने बालमनावर सनातम संस्कृती संस्कार रूजविण्याचे कार्य गेली ३५ वर्ष झाल्यापासून सुरू आहे. तरी परिसरातील गावातील नागरिकांनी आपल्या मुला-मुलींना या वारकरी संप्रदायाच्या शिबिरामध्ये पाठवण्यात यावे, असे आवाहन आयोजक ह.भ.प. गोपाल महाराज देवर, डोगरगाव यांनी केले आहे.

### देवेंद्र फडणवीसच्या नागपूर निवासस्थानात आंदोलन करणारे शेतकऱ्यांना अटक

**मूर्तिजापूर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच्या नागपूर शासकीय निवासस्थानक आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना मूर्तिजापूर शहर पोलिसांनी आंदोलन सुरू करण्यापूर्वीच छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून अटक केली आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्यावतीने रविकांत तुपकर यांच्या मार्गदर्शनात शेतकऱ्यांच्या हक्क व न्यायासाठी पुढाकार घेणारे क्रांतिकारी संघटनेच्यावतीने मूर्तिजापूर तालुक्यातील चार तरुण शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. त्या शेतकऱ्यांच्या शेतातील माती मुख्यमंत्री यांना भेट देणार होते; परंतु त्यांना आधीच शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव, ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुट्टे व उपनिरीक्षक गणेश सूर्यवंशी, उपनिरीक्षक आशिष शिंदे व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी सर्व कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन नियमाप्रमाणे कारवाई केली. छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घालून आंदोलन करता नागपूर येथे रामगिरी शासकीय निवासस्थानात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जात होते; परंतु त्या आधीच कारवाईसमोर जावे लागेल.

## निधन वार्ता

### पुरुषोत्तम डोहळे



**अकोला:** पुरुषोत्तम महादेव सा डोहळे यांना ३० एप्रिल २०२५ ला देवाज्ञा झाली अंत्यविधी १ मे अकरा वाजता त्यांच्या राहत्या घरून होणार आहे अकोलखेड समशानभूमी मध्ये त्यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली नातु नातवंडअसा बराचसा आप्तपरिवार आहे.

### संपतराव खडसान



**अकोला:** स्व. संपतराव रामराव खडसान रा कौलखेड यांचे वयाच्या ८० व्या वर्षी वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुली, १ मुलगा व नातवंडे असा आप्त परिवार आहे.

# कर्जमाफीसाठी निघणाऱ्या ट्रॅक्टर मोर्चा मध्ये हजारो शेतकऱ्यांनी सहभागी व्हा

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे यांचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट: दि. ३० :** उन्हाची पर्वा न करता हजारो शेतकऱ्यांनी मोर्चामध्ये सहभागी व्हा शेतकरी कर्जमाफीसाठी येत्या २ मे रोजी अकोला येथे शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या वतीने भव्य असा ट्रॅक्टर मोर्चा निघणार आहे.
या मोर्चाचे नेतृत्व शिवसेना उपनेते आमदार नितीनबाप्पू देशमुख करणार असून स्वतः एक शेतकरी पुत्र म्हणून गावागावांत मोर्चाबद्दल शेतकऱ्यांना माहिती देत आहेत स्वतः ते ट्रॅक्टर चालवत शेतकरी मोर्चाचे नेतृत्व करणार आहेत,शेतकरी बंधुनो शेतकऱ्यांनवर बोलणारे अनेक नेते फक्त निवडणुका समोर ठेऊन आंदोलन करतात एकवेळ निवडणूक झाले की आपल्याकडे फिरकुन ही बघत नाहीत अपवाद आ.नितीन देशमुख सोडले तर कारण आता कुठल्या निवडणूका नाहीत तरीही एवढ्या रगरगत्या उन्हांत जिल्ह्यातील गावागावात जाऊन शेतकरी मोर्चाविषयी माहिती देत आहेत सोबतच मा.आ.गजाननराव दाळू गुरुजी,मा.आ.संजयजी गावंडे,मा.आ.हरिदासजी भदे,जिल्हाप्रमुख मंगेशभाऊ काळे,जिल्हाप्रमुख गोपालभाऊ दातकर यांच्यासह सर्व उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, जि.प.सर्कल प्रमुख, प.स.सर्कल प्रमुख, शाखा प्रमुख, युवासेनेचे,महिला आघाडीचे,शेतकरी सेनेचे,सहकार सेनेचे सर्व जिल्ह्यातील आजी माजी पदाधिकाऱ्यांनसह गावागावात मोर्चाचे नियोजन करत आहेत,तरी आपण सर्वांनी उन्हाची पर्वा न करता आपल्या स्वतःच्या हक्कासाठी सरकारला जाब विचारण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहा कारण आंदोलन जर मोठया प्रमाणात उभे झाले तर या निगरगट्ट सरकारला पाझर फुटेल नाहीतर पुढे ह्या मागणीसाठी इतर कुठलेही नेते शेतकऱ्यांनसाठी रस्त्यावर उतरणार नाहीत त्यामुळे आपणही मोर्चात ट्रॅक्टर घेऊन या व इतरांनाही याबद्दल माहिती द्या ही विनंती.

## शाहबाबु उर्दू विद्यालयाच्या २६ विद्यार्थिनींना सायकलचे वितरण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**आलेगाव दि. ३० :** दिनांक २८ प्रतिनिधी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुनील फाटकर यांच्या हस्ते आले गाव येथील शाहबाबू उर्दू विद्यालयाच्या २६ विद्यार्थिनींना सायकलचे वितरण करण्यात आले. तसेच विद्यालयाचे अध्यक्ष सैय्यद बुऱ्हान सैय्यद नबी यांचा सत्कार करण्यात आला.
पातूर तालुक्यातील आलेगाव येथील साहबाबु उर्दू विद्यालय परिसरामध्ये विद्यार्थिनींना सायकल वितरण आणि सत्कार कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २८ रोजी करण्यात आले.त्या नुसार जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुनील फाटकर यांच्या हस्ते २६ विद्यार्थिनींना सायकलचे वितरण करण्यात आले.तसेच आलेगाव शहाबाबु उर्दू विद्यालयचे अध्यक्ष तसेच पातूर नगर परिषदेचे माजी अध्यक्ष यांनी उर्दू भाषेला न्याय मिळावा या अनुषंगाने प्रयत्न केला त्या नुसार त्यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असून उर्दू भाषे बद्दल न्यायालयाने दिलेला निकाल उर्दू भाषेला न्याय देणारा ठरल्यामुळे, शाहबाबू विद्यालय तर्फे सुनील फाटकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तसेच विद्यालयाचे सचिव तथा कार्यकारी अधिकारी ईसाक राही यांनी शासना कडून मिळत असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन सदर योजना विद्यार्थ्यांना देण्यासाठी संस्था सतत प्रयत्न करीत असल्याचे सांगितले.

## बडनेरा ते नाशिक रोड आणि खंडवा ते सनावद विशेष गाड्यांचा सेवा कालावधी वाढविला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला: दि. ३० :** गाडी क्रमांक ०१२११ बडनेरा जंक्शन ते नाशिक रोड अनारक्षित दैनिक विशेष, जी पूर्वी ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती आज १ मे २०२५ पासून ३० जून २०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे.
तर गाडी क्रमांक ०१२१२ नाशिक रोड ते बडनेरा जंक्शन अनारक्षित दैनिक विशेष, जी पूर्वी ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना होती, ती आज १मे २०२५ पासून ३०.जून २०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे. गाडी क्रमांक ०१०९१ खंडवा जंक्शन ते सनावद अनारक्षित विशेष गाडी, जी आधी २९ एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती. ती ०२.०५.२०२५ पासून ३०.०६.२०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे. (४४ सेवा)गाडी क्रमांक ०१०९२ सनावद ते खंडवा जंक्शन अनारक्षित गाडी, जी आधी २९ एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती, ती दि. ०२.०५.२०२५ पासून २४.०६.२०२५ पर्यंत वाढवण्यात येत आहे.

## धावत्या रेल्वेतून पडून तरुणाचा मृत्यू

### लोहमार्गावरील घटना, ओळख पटविण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बोरगाव मंजू : दि. ३० :** पोलीस स्टेशन हद्दीतील यावलखेडनजीक लोहमार्गावर धावत्या रेल्वेतून पडून एका अनोळखी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना २९ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. पोलिसांनी ओळख पटविण्याचे आवाहन केले आहे.
सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या हद्दीत यावलखेडनजीक लोहमार्गावर धावत्या रेल्वेतून पडून तरुणाचा मृत्यू झाल्याची सोमवार, २९ एप्रिल रोजी घटना घडली. सदर घटनेची माहिती रेल्वे कर्मचारी यांनी बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात दिली. घटनास्थळी हेडकॉन्स्टेबल प्रमोद डोईफोडे, सुशील इंगोले यांनी धाव घेत घटनेचा व मृतदेहाचा पंचनामा केला असता, अनोळखी युवक वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष अंगावर पांढरे शर्ट, काळ्या रंगाचा पँट, याशिवाय मृताची ओळख पटेल असे घटनास्थळी काही आढळून आले नाही. सदर तरुण धावत्या रेल्वेतून पडून मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. सदर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला आहे. मृत अनोळखी सदर युवक कुणाच्या ओळखीचा किंवा नातेवाईक असेल तर बोरगाव मंजू पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. पुढील तपास हेडकॉन्स्टेबल प्रमोद डोईफोडे, सुशील इंगोलेसह पोलीस करीत आहेत.

## अकोट कृउबासमध्ये २ मे पासून भुईमूग खरेदी

### शुक्रवार व रविवार दोन दिवस राहणार खरेदी




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट: : दि. ३०** अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये येत्या २ मेपासून भुईमूग खरेदीस प्रारंभ होत आहे. आठवडयातून दोन दिवस म्हणजे शुक्रवार व रविवार या दिवशी भुईमूग खरेदी करण्यात येणार आहे.भुईमुगाचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना आता अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये खुल्या लिलावाच्या माध्यमातून आपला शेतमाल भुईमूग विक्री करता येणार आहे.त्यासाठी बाजार समितीच्या २६ एप्रिलच्या मासिक सभेत सभापती प्रशांत पाचडे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत भुईमूग खरेदीचा निर्णय घेण्यात आला.बाजार समितीमध्ये सर्व व्यापारी आणि संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत खुल्या पद्धतीने आठवड्यातून शुक्रवार आणि रविवार या दोन दिवशी भुईमूग आहे.त्यासाठी येणाऱ्या २ मे पासून भुईमूग या शेतमालाची खुल्या पध्दतीने लिलावास सुरुवात होणार आहे.त्यासाठी तालुक्यातील आणि परिसरातील शेतकऱ्यांनी आपला भुईमूग शेतमाल विक्रीस बाजार समितीच्या आवारात आणण्याचे आवाहन बाजार समितीचे सभापती प्रशांत पाचडे यांनी केले आहे.

## तारुण्य हे त्यागाने शोभते,हभप संजय महाराज पाचपोर

### पाचवे दिवशी अयोध्या कांडातील तारुण्याची कथा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट: : दि. ३०** तालुक्यातील पुंडा येथे श्री नंदी महादेव संस्थांनच्यावतीने श्रीराम कथेच्या पाचव्या दिवशी अयोध्या कांडातील तारुण्याच्या कथेचे निरुपण करीत असताना गोभक्त ह.भ.प.संजय महाराज पाचपोर आपल्या अमृतवाणीमधून बालपण हे संस्काराने शोभते म्हणून बालपणात जास्तीत-जास्त संस्कारमय बनवा.म्हातारपण हे प्रालब्दाने मिळत असते. याबाबत विस्तृत अनेक धार्मिक आणि मार्मिक असे पौराणिक दाखले देऊन श्रीराम कथेचे निरूपण केले.श्रीराम कथा महोत्सवाच्या पाचव्या दिवशी यजमान म्हणून निशिकांत कुलट व ज्ञानेश्वर कडु आणि कथा श्रवण करण्यासाठी आलेले श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे कार्यकारी सदस्य सुरेशराव खोटरे, श्रद्धासागरचे अध्यक्ष वासुदेवराव महल्ले, विश्वस्त इंजि. रवींद्र वानखडे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते ह.भ.प.संजय महाराज पाचपोर यांना पुष्पहार घालून स्वागतरुपी आशीर्वाद घेण्यात आले.तसेच जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील अनेक भक्तगण श्रीराम कथा श्रवण करण्यास उपस्थित होते. गोभक्त ह.भ.प.संजय महाराज पाचपोर यांच्या मार्गदर्शनाखाली ७० पेक्षा अधिकगोशाळेत महाराष्ट्रात व कर्नाटक मध्ये १७००० गायीची सेवा होते.अशा गोसेवेत समर्पित असणाऱ्या पाचपोर महाराज यांच्या अयोध्या कांडातील तारुण्याची कथेच्या निरूपण करतांना सांगतात.आपल्या मुलांचे बालपण सुसंस्कारमय बनवा.कारण प्रत्येकाचे म्हातारपण हे दुखमय राहत असते. तेव्हा शक्य असल्यास म्हातारपणात जास्तीत-जास्त नापजप करा.कारण म्हातारपण हे प्रत्येकास प्रालबद्धाने मिळत असते.तर तारुण्य हे त्यागाने शोभते. यासाठी पाचपोर महाराजांनी स्वातंत्र्य काळातील भगतसिंग यांच्या पराक्रमाची गाथा व्यक्त करतांना उपस्थितितांच्या अंगात पराक्रमाची उन्मती जागरूक केली.यासह सुभाषचंद्र बोस,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तारुण्यातील स्वतःचा त्याग करत समाजासाठी जगत पराक्रमी होऊन आजही भारताच्या बाहेर हे महावीर त्यांच्या त्यागामुळे जिवंत आहेत.

> लहानमुलांचे बालपण सुसंस्कारी बनवा लहान मुलांचे बालपण सुसंस्कारी बनविण्यासाठी त्यांच्या आई-वडिलांना संस्कारी रहा.त्यासाठी संत वासुदेव महाराजांनी सुरुवात केलेली बालसंस्कार शिबिरे आता भारतात सहा राज्यात घेतली जातात.आपल्या मुलांना सुसंस्कारी बनविण्यासाठी अशा शिबिरांमध्ये पाठवा. त्यांच्या बालपणीच्या पिशव्या ह्या संस्कारमय भरा.त्या त्यांच्या ज्यावेळेस त्यांना आवश्यक असेल तसे बाहेर निघतील.त्यामुळेच बालपण फक्त संस्काराने शोभतात.

## दहशतवादी हल्ल्याचा व्यापारी महासंघ मूर्तिजापूरकडून तीव्र निषेध

### शहिदांना श्रद्धांजली, रॅलीद्वारे प्रशासनाला निवेदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मूर्तिजापूर : दि. ३० :** काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकावर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध मूर्तिजापूर येथील व्यापारी महासंघाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आला. या वेळी हल्ल्यातील शहिदांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आणि संपूर्ण शहरातून निषेध रॅली काढण्यात आली.
ही रॅली उपविभागीय अधिकारी कार्यालयावर नेण्यात आली आणि तेथे प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. व्यापारी महासंघाचे अध्यक्ष इब्राहिम घाणीवाला यांनी दहशतवाद्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यात यावा, त्यांना कठोर शिक्षा देण्यात यावी आणि अशा दहशतवाद्यांना भारताच्या जमिनीत दफनाही करू देऊ नये, अशी ठाम मागणी केली, तसेच दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांना अधिकृत शहिदाचा दर्जा देण्याची मागणीही त्यांनी केली.
या कार्यक्रमाला माजी नगरसेवक विनायक गुल्हाने, सुभाष दूध डेरीचे संचालक प्रशांत हजारी, ॲड. अविन अग्रवाल, अशोक भावनांनी, विष्णू लोडम, शेख इमरान, शेख खलील, आनंद बांगाड, पुरुषोत्तम डागा, संजय गुप्ता, सतीश लालवानी यांसह अनेक व्यापाऱ्यांची उपस्थिती होती मूर्तिजापूर मतदारसंघाचे आमदार हरिष पिंपळे यांनीदेखील निषेध सभेला भेट देत आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी कमलाकर गावंडे, भारत जेठवाणी, रामा हजारे, मोहम्मद तनवीर, आरिफ ठेकेदार, आरिफ खटीक, छबिले पाटील, बबलू भिलोंडे, दिनेश श्रीवास, भावेश झाला, अनुप अग्रवाल, मेजर घुगे आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. अविन अग्रवाल यांनी केले.
यावेळी कमलाकर गावंडे, भारत जेठवाणी, रामा हजारे, मोहम्मद तनवीर, आरिफ ठेकेदार, आरिफ खटीक, छबिले पाटील, बबलू भिलोंडे, दिनेश श्रीवास, भावेश झाला, अनुप अग्रवाल, रशिद चाऊस मेजर घुगे आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## अकोट तालुक्यात वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष ?

### कार्यकर्त्यांचा उत्साह गेला तरी कुठे?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट: : दि. ३०** अकोला लोकसभा निवडणूक तसेच विधानसभेच्या निवडणुका आटोपल्यानंतर वंचित बहुजन आघाडीला पराभवाचा सामना करावा लागला. पराभव झालेल्या निवडणुकांमध्ये वंचितचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पुरोगामी पक्षांसोबत युती करावी, अशी अपेक्षा महाराष्ट्रातील वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांना होती.
मात्र युती न झाल्याने महाराष्ट्रभर कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला. पक्ष सत्तेमध्ये जावा अशी कार्यकर्त्यांची दाट इच्छा होती. लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीला झालेल्या पराभवामुळे सध्या तरी असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.
संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अकोला जिल्हा पॅटर्न वंचित बहुजन आघाडी या नावाने ओळखले जाते. गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून अकोला जिल्हा परिषदेवर वंचित बहुजन आघाडीचे सत्ता कायम आहेत. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीमध्ये जो पराभव वंचित बहुजन आघाडीला पत्करावा लागला. या सर्व पराभवाला जिल्हा कार्यकारिणी तालुका कार्यकारणी जबाबदार आहे, असे कार्यकर्त्यांमध्ये बोलल्या जात आहे. ज्याप्रमाणे राष्ट्रीय कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सहित संपूर्ण जिल्ह्याची तालुक्यासहित कार्यकारिणी व्हावी, अशी कार्यकर्त्यांची दाट इच्छा व अपेक्षा आहे.
अकोला जिल्ह्यामध्ये जुनी जिल्हा कार्यकारणी तत्काळ बरखास्त व्हावी आणि नव्याने जिल्हा कार्यकारिणी सर्व तालुकासहित कार्यकारिणी व्हावी, जेणेकरून नवीन चेहऱ्यांना संधी मिळेल आणि पक्षांमध्ये काम करण्याची इच्छा निर्माण होईल.
लवकरच अवघ्या दोन ते चार महिन्यांवर जिल्हा परिषदेच्या निवडणुका, महानगरपालिका, पंचायत समिती निवडणुका लागेल अशी शासनाची तयारी आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ज्याप्रमाणे लोकसभा आणि विधानसभेचा दारुण पराभव वंचितला सहन करावा लागला, असा पराभव जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये होऊ नये म्हणून तत्काळ नव्याने जिल्हा कार्यकारिणी संपूर्ण तालुक्यासहित व्हावी, अशी दाट इच्छा कार्यकर्त्यांमध्ये आज दिसून आली आहे.
अकोट तालुक्यातील नागरिकांचा आढावा घेतला असता, वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये पूर्वीप्रमाणे उत्साह दिसून आला नाही. संपूर्ण तालुक्यात कार्यकर्त्यांमध्ये नाराजी दिसून आली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लवकरात लवकर जिल्हा कार्यकारिणी तालुक्यासहित बरखास्त करून नव्याने जिल्हा कार्यकारिणी, सर्व तालुक्यासहित व्हावी, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमध्ये दिसून आली आहे.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा



बुलडाणा, गुरूवार दि.१ मे २०२५ www.ajinkyabharat.com

# शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी भव्य ट्रॅक्टर मोर्चा

## हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा- ॲड.जयश्री शेळके

अजिंक्य भारत / प्रतिनिधी
बुलडाणा दि.३०

राज्यातील शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी बुलडाणा जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने दि. २ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चातत जिल्हाभरातील शेतकऱ्यांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पक्षाच्या प्रवक्त्या ॲड.जयश्री शेळके यांनी केले आहे. राज्यकर्त्यांच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे आज जगाचा पोशिंद्यावरच उपाशी राहण्याची वेळ आली आहे. २०२३ आणि २०२४ या सलग दोन वर्षांत नैसर्गिक आपत्ती आणि बाजारभावातील घसरण यामुळे राज्यातील सुमारे ६८% शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने जाहीर केलेल्या पीक विमा योजनांचे हजारो कोटींच्या थकबाकीचे वाटप अद्याप रखडले आहे. राज्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला असला तरीही सरकार मात्र अद्यापही निद्रावस्थेतच आहे. निर्दयी व खोटारड्या सरकारला भानावर आणण्यासाठी या ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा लढा केवळ शेतकऱ्यांचा नाही, तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या भविष्यासाठी आहे. त्यामुळे सर्व पक्ष, गट-तट, मतभेद बाजूला सारुन केवळ शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी या मोर्चात सहभागी व्हावे. **शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे:** १)सर्व शेतकऱ्यांची १००% कर्जमाफी करून सातबारा कोरा करण्यात यावा. २ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा.



३)सोयाबीन, कापूस, मका, तूर व इतर पिकांना उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव मिळाला पाहिजे. ४)सन २०२३ व २०२४ च्या शेतकरी पीक विम्याचे थकीत पैसे तात्काळ देण्यात यावे यासह मागण्यांकरिता लढा देण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याने या ऐतिहासिक मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन ॲड.जयश्री शेळके यांनी केले आहे.




# चिखलीचे ठाणेदार संग्राम पाटील यांना पोलीस महासंचालक पदक जाहीर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
चिखली दि.३०

महाराष्ट्र पोलीस दलात विविध प्रकारच्या प्रवर्गामध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरी करिता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे पदक प्रदान करण्यात येते. १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने बुलढाणा जिल्हा मुख्यालय जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते पोलीस महासंचालक पदकाचे वितरण होणार आहे.



यामध्ये चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार संग्राम पाटील यांनी १५ वर्षांहून अधिक काळ पुणे ग्रामीण, बुलढाणा, अकोला, मुंबई या ठिकाणी उत्कृष्ट सेवा बजावून केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत ही निवड करण्यात आली आहे. १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनी बुलढाणा जिल्हा मुख्यालयी जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते ठाणेदार संग्राम पाटील यांना पोलीस महासंचालक पदक प्रदान करण्यात येणार आहे.

पोलीस निरीक्षक संग्राम पाटील यांनी बुलढाणा जिल्ह्यात धाड, धामणगाव बढे, साखरखेर्डा, चिखली या ठिकाणी उत्कृष्ठ ठाणेदार म्हणून कर्तव्य बजावले आहे. स्थानिक समुदायाशी उत्तम समन्वय साधला असून त्यांच्या या गौरवासाठी सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या सन्मानामुळे बुलढाणा जिल्हा पोलीस दलाचे नाव उंचावले असून, जिल्हा पोलीस दलाच्या शिरपेच्यात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# खामगाव जिल्ह्यासह, शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आज धरणे आंदोलन

## धरणे आंदोलनामध्ये हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे - सानंदा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.३०

बुलढाणा जिल्हयाचे विभाजन करुन खाम गाव जिल्हयासह स्वतंत्र लाखनवाडा तालुक्याची निर्मिती करण्यात यावी तसेच अस्मानी व सुल्तानी संकटात सापडलेल्या बळीराजाला मदतीचा हात देण्यासाठी महायुती सरकारने निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे संपुर्ण कर्जमाफी देवुन बळीराजाला दिलासा देण्यात यावा या प्रमुख मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुरुवार दि. १ मे महाराष्ट्र दिन, जागतिक कामगार दिनी मा.उपविभागीय अधिकारी खामगाव यांचे कार्यालयासमोर टॉवर चौक येथे माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या नेतृत्वाखाली सर्व पक्षीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

बुलडाणा जिल्हा भौगोलिक दृष्टया खुप मोठा असल्यामुळे घाटाखालील लोकांना सोयीचे होण्यासाठी बुलडाणा जिल्हयाचे विभाजन करुन खामगाव जिल्हयासह स्वतंत्र लाखनवाडा तालुक्याची निर्मिती करण्यात यावी ही जनतेची अनेक वर्षापासुनची जिव्हाळयाची मागणी आहे. मागील २५ वर्षापासुन खामगाव जिल्हा निर्मितीचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित आहे. जर खामगाव जिल्हा झाला तर यामुळे जनतेचा फायदा होईल. म्हणून छोटे कुटुंब-सुखी कुटुंब या उक्तीप्रमाणे बुलडाणा जिल्हयाचे विभाजन करुन खामगाव जिल्हयासह स्वतंत्र लाखनवाडा तालुक्याची निर्मिती करण्यात यावी तसेच विधानसभा निवडणुकी दरम्यान राज्यातील महायुती सरकारने शेतकरी बांधवांना संपुर्ण कर्जमाफी देवु असे आपल्या वचननाम्यामध्ये आश्वासन दिले होते. तसेच राज्य सरकारने शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफी देवुन दिलासा द्यावा या प्रमुख मागण्यांसह शेतकऱ्यांच्या इतर रास्त मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुरुवार दि.१ मे २०२५ रोजी सकाळी ९ वाजता खामगाव कृषी उत्पन्न बाजार समिती येथुन शेतकरी बांधव व नागरीकांसह मोर्चा काढुन टिळक पुतळामार्गे, भारत कटपीस स्टोअर्स समोरुन, भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळुन,राष्ट्रपिता महात्मा गांधी उद्यानासमोरुन, टॉवर चौक येथे पोहचुन मा.उपविभागीय अधिकारी खामगाव यांचे कार्यालयासमोर सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत हे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या धरणे आंदोलनामध्ये शेतकरी बांधवांसह खामगाव शहर व परिसरातील नागरीकांनी पक्षभेद विसरुन मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले आहे.








अजिंक्य भारत

आपलं अमरावती

गुरुवार, दि. ०१ मे २०२५


# दोन लाख शेतकरी कर्जासाठी सावकारांच्या दारात

## अनधिकृत सावकारांचे कर्ज शेकडो कोटीच्या घरात, २५५ कोटींचे कर्जवाटप पूर्ण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** दिवसेंदिवस शेती बेभरोशाची झाल्याने वर्षभरात ९६ हजार शेतकऱ्यांना सावकाराचे उंबरठे झिझवावे लागत आहे. मार्च अखेर ६३५ सावकारांनी १ लाख ९१ हजार २७१ शेतकऱ्यांसह आर्थिक अडचणीतील नागरिकांना २ लाख ५४ हजार ०८.५३ कोटीचे कर्जवाटप केले आहे. शिवाय अवैध सावकारांनी मनमानी व्याजाने वाटलेले कर्ज शेकडो कोट्यीच्या घरात असल्याचे माहिती पुढे आली आहे.

जिल्ह्यात बँकांद्वारे सीबीस्कोआर पाहिला जातो. शिवाय जास्तीचे कागदपत्रे मागितली जाते. अनेकदा शेतकऱ्यांजवळ पुरेसी कागद नसते त्यामुळे कर्जवाटपात दिरंगाईचे प्रकार होतात. त्यामुळे आर्थिक अडचणीतील शेतकऱ्यांना सावकाराच्या दारी जावे लागते. सहकार विभागाद्वारे ५०० रुपयात सावकारीचा परवाना मिळत असल्याने जिल्ह्यात सावकाराची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. सध्या स्थितीत जिल्ह्ययात ६३५ सावकार परवाना धारक आहेत. परवाना धारक सावकारांना कृषी कर्जवाटपात मनायी असली तरी बिगर कर्ज, बिगर तारण कर्ज या प्रकारामध्ये जिल्ह्यात रेकॉर्डवर २५४ कोटीचे कर्ज वाटप केले आहे. अवैध सावकारीत गुंतल्याने त्यांचेवर इतर विना परवाना सावकाराचे कर्जवाटप याची माहिती उपलब्ध होत नाही. परवानाधारक सावकाराचे कर्जवाटप उशिरा होणार आहे.



शेतकऱ्यांच्या कर्जवाटपाचे दर तारण कर्जासाठी ९ टक्क्यासाठी बिना तारण १२ टक्के शेतकऱ्याशिवाय इतरांना तारण कर्ज १५ टक्के विनातारण कर्ज १८ टक्के असे दर आकारण्यात आल्याचे उघड झाले आहे. बँकेत सोने चांदी, प्रॉमेसरी नोटवर कर्ज देण्यात येते. जिल्ह्या बँक व राष्ट्रीकृत बँक शेती तारणावर कर्ज देतात, या व्यक्तिकित बिगर तारणी कर्ज हे सोने चांदी व प्रॉमेसरी नोटवर दिले जाते. असे सहकार विभागाने सांगितले आहे. परवानाधारक सावकारांनी २५ मार्च अखेर मोठ्यया प्रमाणात कर्ज वाटप केले आहे. बिगर कृषी कर्जदार ९५ हजार ६३५ असून वाटलेले कर्ज यामध्ये १२ लाख ७०४.३४ लाख तारण कर्जदार ९४ हजार ८८२, वाटप केलेले कर्ज १२४८६.९९ लाख विनावितरण कर्जदार ७५३, वाटप केलेले कर्ज २१७.१७ लाख असे एकूण १९१२७१ एकूण कर्जदार असून सावकाराचे कर्जवाटप २५४०८.५३ असे नोंदविण्यात आले आहे.

### सावकारीचे सर्वाधिक पेव अमरावतीत

पेसा क्षेत्रातील चिखलदरा तालुका वगळता जिल्ह्यात ६३५ परवानाधारक सावकार आहेत. यामध्ये सर्वाधिक २३७ सावकार अमरावती तालुक्यात आहे. तर अचलपूर १४९, मोर्शी ३३, अंजनगाव २३, धामणगाव रेल्वे २८, वरुड ४०, धारणी २०, नांदगावखंडेश्वर १४, चांदूर रेल्वे ९, चांदूर बाजार ४२, तिवसा १८, दर्यापूर तालुक्यात १४ सावकार आहेत. या सर्व सावकारांना दरवर्षी परवाना नुतनिकरण करने बंधनकारक आहे.

❝ परवानाधारक सावकाराने महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४ मधील तरतूक व शासन निर्णय वेळोवेळी शासनाकडून निर्गमित होणाऱ्या परिपत्रकानुसार करावे.

**शंकर कुंभार,** जिल्हा उपनिबंधक.

# अमरावतीत निवडल्या जाणार विश्वकप कबड्डी स्पर्धेचा भारतीय संघ

## निवड समितीचा तीन दिवस शहरात मुक्काम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** मध्ये होणाऱ्या ऑल इंडिया फेडरेशन कप स्पर्धेतून विश्वकप स्पर्धेसाठी भारतीय कबड्डीचा संघ निवडला असल्याने निवड समितीचा अमरावती मध्ये तीन दिवस मुक्काम राहणार आहे. पुरुष संघाच्या निवड समितीमध्ये अनुप कुमार, राकेश कुमार, दीपक हुडा, तर महिला संघ निवडण्यासाठी ममथा पुजारी, तेजस्विनी बी.व्ही/ पूजा शर्मा यांचा समावेश आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत आ. संजय खोडके व आ. सुलभा खोडके यांनी दिली. पत्रकार परिषदेला भारतीय कबड्डी संघाचे माजी खेळाडू राजाभाऊ देशमुख, भारतीय कबड्डडी फेडरेशनचे महासचिव जितेंद्रसिंह ठाकूर, माजी नगरसेवक प्रशांत डवरे, प्रा. डॉ. नितीन चव्हाळे, प्रा.डॉ. अतुल पाटील, प्रा. डॉ. सुभाष गावंडे आदी उपस्थित होते.

सदर स्पर्धा ही २ मे पासून प्रारंभ होणार असून ४ मे संत गाडगेबाबा समाधी मंदिर प्रांगणात गाडगेनगर येथे होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार, २ मे रोजी सायंकाळी होणार असून त्यानंतर सामन्याला सुरुवात होईल. निमंत्रित मान्यवरांमध्ये स्पर्धेकरिता तेजस्विनी गहलोद (डायरेक्टर इंटरनॅशनल कबड्डी फेडरेशन), विभोर विनीत जैन (डायरेक्टर ॲम्यच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया), परम पूज्य अनंत विभुषीत महामंडलेश्वर श्री. श्री. १००८ ईश्वरानंद ब्रह्मचारी श्री. उत्तमस्वामीजी महाराज. क्रिशनलाल पनवार (हरियाणा कॅबिनेट मिनिस्टर) यांची उपस्थिती राहणार आहे. शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके यांच्या संकल्पनेतून व भारतीय कबड्डी फेडरेशनचे महासचिव जितेंद्रसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनात हे तीन दिवसीय भव्य आयोजन होत असून त्यासाठी विविध समिती स्थापन करून सहकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच स्पर्धा स्थळी फिरते स्वच्छतागृह, पाण्याचे टँकर, अँब्युलंस व वैद्यकीय पथक, ड्रिङ्गशमक अग्निशामक वाहन व सुरक्षा रक्षक आदी आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त सुद्धा मागविण्यात आला आहे. पार्किंग ची व्यवस्था सुद्धा मैदान स्थळी राहील, तर रविवार ४ एप्रिल रोजी ऑल इंडिया फेडरेशन कप चा शानदार समारोप करण्यात येणार असून अनेक आकर्षक पुरस्कारांची लयलूट देखील कबड्डीच्या संघावर करण्यात येणार आहे.

# उर्वी खोकले आयसीएससी परीक्षेत विदर्भातून प्रथम

## पायलट बनण्याची व्यक्त केली ईच्छा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** नुकत्याच घेण्यात आलेल्या २०२५ मधील आयसीएससी १० वींचा परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला आहे. त्यामध्ये कु. उर्वी खोकले हिने ९८.१७ टक्के गुण घेऊन विदर्भातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. कु. उर्वी ही तोमये प्राथमरी इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी असून तिला इंग्रजी विषयात १०० पैकी ९८ गुण, मराठीमध्ये १०० पैकी १००, इतिहास व नागरिकशास्त्र (एचसीजी) १०० पैकी ९९, गणित विषयात १०० पैकी ९७, विज्ञान आणि ईकॉनॉमिसमध्ये १०० पैकी ९६, तर शारीरिक शिक्षण व रोबोटिक्स या विषयात १०० पैकी ९९ गुण तीने प्राप्त केले आहेत. तिला एकूण ६०० गुणांपैकी ५८९ गुण प्राप्त झाले असून तिच्या गुणाची टक्केवारी ९८.१७ टक्के ऐवढी आहे. ती विदर्भातून प्रथम आली असून ती डॉक्टर कपील शंकरराव खोकले व डॉ. स्मीता खोकले यांची कन्या आहे. तिच्या शाळेचा १०० टक्के निकाल लागला आहे. उर्वीने अजिंक्य भारतशी बोलताना मला पायलट बनण्याची ईच्छा असल्याचे सांगितले असून तिला पीसीएम ग्रुपमध्ये चांगले गुण प्राप्त झाले आहे. तिच्या दिनचर्येविषयी विचारले असता तिने स्कूल ट्युशन आणि होमवर्क याला वेळ जास्त दिला असल्याचे सांगितले. तर दिवसांतून किती तास अभ्यास करायची असा प्रश्न केला असता स्कूल आणि ट्युशन सोडून केवळ दोन ते तीन तास अभ्यास करीत असल्याचे सांगितले. तिला नृत्य व बॅडमिंटन खेळण्याचा छंद असून तिचे आई-वडिल होमीओपॅथी डॉक्टर आहेत.



# धारणीत पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** उपविभागीय कार्यालय धारणी येथे आज धारणी तालुक्यातील विविध प्रशासकीय विभागांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने उन्हाळ्याच्या तोंडावर संभाव्य पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यावर जोर देण्यात आला. बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागाच्या तयारीची माहिती दिली आणि पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना दिलासा देण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीनंतर तातडीने तारूबांदा, तालुका चिखलदरा येथील सार्वजनिक विहिरीची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी त्यांनी विहिरीतील पाण्याची पातळी आणि परिसरातील परिस्थितीचा आढावा घेतला. नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या या तत्पर भूमिकेमुळे प्रशासकीय यंत्रणेला अधिक सक्रियपणे काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

# मुलगा निघाला चोर, जुगार खेळण्यासाठी केली चोरी

## ४५ ग्रॅम सोन्याचा मुद्देमाल जप्त, नागपुरी गेट पोलिसांची कारवाई

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** गवळीपुरा येथील रहिवासी एका नागरिकाच्या घरातून सोन्याचे दागिने व रोख असा एकूण दोन लाख ९८ हजार रुपये लंपास करण्यात आला होता. ही घटना शुक्रवारी २५ एप्रिल रोजी उघडकीस आली होती. याप्रकरणी नागपूर गेट पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला तपासात मुलाने जुगार खेळण्यासाठी आपल्या घरी चोरी केल्याच्या समोर आले. त्यानुसार पोलिसांनी त्याला अटक केली त्याच्याकडून चोरलेले ४५ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

अब्दुल मोहीम अब्दुल मतीन २१ राहणार गवळीपुरा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी गवळीपुरा येथील रहिवासी अब्दुल मतीन अब्दुल हमीद ४८ यांनी शुक्रवारी २५ एप्रिल रोजी नागपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी अज्ञात चोरट्याने आपल्या घरात ठेवलेल्या पेटीतून आपले व आपल्या मुलीचे पंचायत ग्राम सोन्याचे दागिने व एक लाख पन्नास हजार रुपये रोख असा एकूण दोन लाख ९८ हजार रुपयांचा योगा सोडल्याचे तक्रारीत नमूद केले होते. तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

तपासात अब्दुल मतीन यांचा मुलगा अब्दुल मोहीम याने आपल्याच घरी चोरी केल्याची बाब समोर आली. त्यानुसार पोलिसांनी अब्दुल मोहीम ला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली त्यावेळी त्यांनी जुगार खेळण्यासाठी व अन्य मोज मजा करण्यासाठी आपल्या घरी चोरी केल्याची कबुली दिली. त्यानुसार त्याच्याकडून चोरलेले २५ ग्रॅमचे दागिने जप्त करण्यात आले मात्र रोकड त्याने खर्च केल्याने ती हस्तगत झाली नाही. ही कारवाई नागपूर येथे ठाणेदार पोलीस निरीक्षक जनार्दन साळुंखे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक गजानन विधाते फुलचंद्र संजय मोहन तायडे यांनी केली आहे.

# शैक्षणिक उपक्रमात सर्व शिक्षकांनी सहभागी व्हावे-कोकतरे

## व्हिडीओ निर्मिती व मुख्यमंत्री माझी सूंदर शाळा सन्मान सोहळा उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** मंगळवारला दुपारी ठीक ३ ते ५ या कालावधी मध्ये पं. स.भातकुली शिक्षण विभागाच्या वतीने दर्जेदार व्हिडीओ निर्मिती स्पर्धा व मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन पं. स.भातकुली सभागृहात करण्यात आले होते. आद्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व प्रतिमेला हारार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.




कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून दिपकजी कोकतरे (गटशिक्षणाधिकारी, पं. स.भातकुली) उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून तुषारजी दांडगे (गटविकास अधिकारी),प्रविनजी वानखेडे (सहा.गटविकास अधिकारी),नरेंद्रजी गायकवाड (अधिक्षक, शालेय पोषण आहार) पंजाबराव पवार (शिक्षण विस्तार अधिकारी),वसंतजी लोहेकर (केंद्रप्रमुख)उपस्थित होते.

या कार्यक्रमा अंतर्गत मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा या उपक्रमाअंतर्गत जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा आसरा,जि.प.पूर्व माध्य मराठी शाळा वायगाव, जि.प.पूर्व माध्य उर्दू शाळा टाकरखेडा, आदर्श इंग्लिश प्रायमरी स्कूल भातकुली,राष्ट्रीय शेतकी विद्यालय खोलापूर, विनायक इंग्लिश प्रायमरी स्कूल पूर्णानगर या शाळांचे मुख्याध्यापक व सर्व सहकारी शिक्षक शिक्षिका यांचा शाल,मोमेंटो,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान व सत्कार करण्यात आला. दर्जेदार व्हिडीओ निर्मिती स्पर्धा या उपक्रमाअंतर्गत लखनसिंग जाधव, शैलेंद्र स.दहातोंडे, सोनाली येवले,दिपाली बाभुळकर,मो. शफीक मो.मुश्ताक अहमद,स्वाती यावले, श्याम चौकडे, सुवर्णा घाटेकर, समीना परवीन मोहम्मद अलीम, उषा धुर्वे, शैलेश मांदळे, प्रतीक्षा मोहोड, दिलीप कुमरे, संगीता लोहेकर, पंकज दहिकर, दिनेश लांडगे या विजेत्या स्पर्धकांना मोमेंटो, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून सर्वांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. अशा प्रकारच्या उपक्रमामध्ये सर्वच शिक्षकांनी सहभागी होण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी दिपकजी कोकतरे साहेबांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिनाक्षी खरटमोल मॅडम (विषय तज्ञ पं. स.भातकुली) यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन शैलेंद्र स.दहातोंडे यांनी तर आभार प्रदर्शन सुजाता सोनवणे मॅडम (विषय तज्ञ,पं. स.भातकुली यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सर्व केंद्र प्रमुख,शिक्षक, विषय साधन व्यक्ती व विषय तज्ञ पं. स.भातकुली यांनी मोलाचे सहकार्य केले.असे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# थोडक्यात

## विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी व बसवेश्वर महाराज जयंती



**अमरावती :** राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज व महात्मा बसवेर यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महात्मा बसवेर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ.महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, कार्यकारी अभियंता शशीकांत रोडे तसेच विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी मोठा संख्येने उपस्थित होते. यावेळी राजेश पिदडी यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे भजन गायिले. संचालन तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महात्मा बसवेर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास नांदुरकर यांनी दिली.

## तिघांची ऑनलाइन फसवणूक

**अमरावती :** शहरातील तिघांची क्रेडिट कार्ड व एका आऊटलेटच्या माध्यमातून एक लाख ६६ हजार ७३६ रुपयांनी ऑनलाईन फसवणूक करण्यात आली होती. त्या तिघाकडून जुबाडलेली रक्कम त्यांना परत मिळून देण्यात फजरफुला पोलिसांना यश आले आहे. ऑनलाइन फाटच्या माध्यमातून गेलेली ही रक्कम तिघांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. फजर पुरा ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र सहारे व त्यांच्या टीमच्या प्रयत्नामुळे तक्रार करताना आपली रक्कम फलक मिळाली आहे. शेळके रहिवासी दीपक नथानी यांची यंदा क्रेडिट कार्डचा गैरवापर करून ७१९२३ रुपयांनी फसवणूक करण्यात आली होती. त्या व्यवहाराचे विश्लेषण करून पोलिसांनी बँकेची पत्रव्यव्हार केला. त्या माध्यमातून दीपक नथानी यांची लुबाडलेली संपूर्ण रक्कम त्यांना परत मिळवून देण्यात आली. तर गत वर्षी येथील निकिता धनराज खडसे यांच्या क्रेडिट कार्डचा गैरवापर करून त्यातून परस्पर ५९८१४ रुपये परत काढून घेण्यात आले होते. याप्रकरणी पोलिसांनी व्यवहाराचे विश्लेषण व बँकेची पत्रव्यवहार केल्यानंतर निकिता खडसे यांच्या खात्यात ५९ ८१४ जमा झाले आहे. त्याचप्रमाणे येथील विकास कालीचरण चौधरी यांची ३५ हजार रुपयांनी ऑनलाईन पासून करण्यात आली होती.ती रक्कम एका विशिष्ट साईडवर साहित्य खरेदी करण्याकरिता वापरण्यात आल्याचे निष्पन्न केल्यावर संबंधित कंपनीची पत्रव्यवहार करून त्या व्यवहारातील संपूर्ण ३५ हजार रुपये परत मिळवण्यात फजर फुला पोलिसांना यश आले आहे. मी कामगिरी भरपूर येथे ठाणेदार निलेश करे पोलीस निरीक्षक निलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र सहारे रुपेश माहुरे यांनी केली आहे.

## शिरखेड येथील शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**शिरखेड :** येथील शेतकरी हरीश मुकुंद शहाणे (३८) हे त्यांच्या पत्नी व मुलीसह शिरखेड येथे वास्तव्यास होते. आपल्या पाच एकर शेतीत राबून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करीत होते. दोन दिवसांपूर्वी त्यांची गरोदर पत्नी मुलीसह माहेरी गेली असता या संधीचा फायदा घेत हरीश यांनी सोमवार दिनांक २८ एप्रिल रोजी रात्री १० वाजता आपल्या राहत्या घरी घराच्या पोर्च मध्ये असलेल्या स्ल्याबच्या कडीला नॉयलाण दोरीने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. शेतीतून होणाऱ्या उत्पन्नातूनच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता.



सलग काही वर्ष अस्मानी संकट कोसळल्याने शेतीचे उत्पादन घटले होते. शेतीमालाला भाव नाही या विवंचनेतूनत्यांनी रात्री १० वाजता आपल्या राहत्या घरी जीवनयात्रा संपवली. हरीश यांच्या चुलत वहिनीला गळफास घेतलेल्या सर्वप्रथम आढळले आणि त्यांनी हरीश यांचे लहान भाऊ राजेश मुकुंद शहाणे यांना त्याची माहिती दिली. राजेश यांनी याची माहिती शिरखेड पोलीस स्टेशनला दिली असता ठाणेदार सचिन लुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार संतोष लहाने, पोलीस कॉ.रोषण कथे यानी लगेच घटनास्थळी जाऊन घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरणीय तपासानिकरिता मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात आला. पुढील तपास शिरखेड पोलीस करीत आहे.

## श्री संत बगाजी महाराज समाधी सोहळा

**धामणगांव रेल्वे :** श्री संत बगाजी महाराज समाधी सोहळा श्री क्षेत्र वरुड (बगाजी) ता. धामणगांव (रेल्वे) येथे बुधवार ३० एप्रिल ते मंगळवार दि. ६ मे २०२५ पर्यंत संगीतमय भागवत कथा व अखंड हरीनाम सप्ताह आयोजित करण्यात आलेले असून श्रीमद भागवत कथा प्रवक्त्या म्हणून हभप वैष्णवी खडतकर (आळंदीकर) आपल्या सुमधुरवाणीतून भागवत कथेचे श्रवण करणार आहेत.



दरवर्षी प्रमाणे या वर्षी श्री संत बगाजी महाराज समाधी सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. या निमित्य तीर्थ स्थापना व किर्तन सेवा बुधवारी झालेली असून आज दिनांक एक मे पासून तर सहा मे पर्यंत दररोज किर्तन सेवा होणार आहेत या कीर्तन सेवा करिता ह.भ.प. श्री राहुल महाराज हजारे (वाढोणा) ता. आर्वी जि.वर्धा ह.भ.प. गौरव महाराज ठाकरे, वर्धा ह.भ.प. आदित्य महाराज चौधरी (आळंदीकर), मंगरुळपीर, जि. वाशिम अनंत महाराज पुयड (नाखेगाव) ता. दारव्हा जि. यवतमाळ हभप.धिरज महाराज तिजारे, वरुड बगाजीकर कु. शिवानीताई घोंगले (पिंपळखुटा) जि. यवतमाळ मंगळवार दि. ०६/०५/२०२५ सकाळी ११ ते १ काल्याचे किर्तन भास्कर महाराज पिंपळे (तात्या महाराज) कुऱ्हा यांच्या मधुर वाणीतून होणार आहे भागवत कथेला साथसंगत ह.भ.प. समीर महाराज कुबडे (ऑर्गन व गायन) संकेत महाराज बागमारे (तबला) ह.भ.प. रोशन महाराज चांदुरकर (पॅड) मृदंगाचार् वेदांत महाराज येंडे (आळंदीकर) टाळकरी संच प्रामुख्याने सेवा देणार आहेत दुपारी २ ते ५ पर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे सायंकाळी ६ वाजता श्रींची भव्य नगर प्रदक्षिणा होईल रात्री ८ वाजता बाल समाज प्रबोधनकार सप्त खंजेरी वादन आराध्य महाराज कोरडे (यवतमाळ) यांचे होणार आहे लाभ घेण्याची विनंती राजु दगडकर, विपिन दगडकर व समस्त गावकरी मंडळी व धिरज महाराज तिजारे, वरुड (बगाजी) गणेश महाराज नघाट वरुड (बगाजी) व समस्त गावकरी मंडळी, वरुड (बगाजी)यांनी केले.

## थोडक्यात

### विद्यार्थ्यांची पंचायत समितीला भेट



**मोर्शी :** भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी पंचायत समितीचा कारभार कसा चालतो याचा अभ्यास करण्यासाठी भारतीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष.व्ही. आगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर.जी. बांबोळे,प्रा.सुरेंद्र पांडे, प्रा.शुद्धोधन पाटील यांनी विद्यार्थी समवेत पंचायत समिती मोर्शी येथे भेट दिली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी(बी.डी.ओ) सौ.उज्वला ढोले यांनी भूषविले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जयंत गारळे(आरोग्य विस्तार अधिकारी)रोहिणी पोहकार(कृषी विस्तार अधिकारी)उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी आरोग्य विस्तार अधिकारी यांना पंचायत समितीच्या कारभाराविषयी तसेच लोकांच्या आरोग्यासंबंधी अनेक प्रश्न विचारून माहिती जाणून घेतली.मोर्शी पंचायत समिती अंतर्गत एकूण ५ आरोग्य केंद्र तर २१ उपकेंद्र असल्याचे गारळे सरांनी सांगितले.प्रत्येक गावात लहान मुलांपासून तर वृद्ध व्यक्तीपर्यंत आरोग्याची योग्य काळजी घेतली जात असून प्रत्येक उपकेंद्रात पुरेसा औषधोपचार रुग्णांना दिला जात असल्याचे नमूद केले. कृषी विषय माहिती देतांना शेतकऱ्यांचे विविध लाभकारी योजनांची विद्यार्थ्यांना माहिती देऊन शेतकऱ्यांना याचा थेट फायदा होत असल्याचे सांगितले.हा कार्यक्रम संत गाडगेबाबा विद्यापीठ अंतर्गत राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमाशी निगडित असून विद्यार्थ्यांनी या भेटीदरम्यान संपूर्ण माहिती गोळा केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सुरेंद्र पांडे, सूत्रसंचालन दिव्या कुंबरे यांनी तर आभार प्रदर्शन पूजा उईके हिने केले. या कार्यक्रमाला पंचायत समितीचे सर्व अधिकारी कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### मदन लाठी यांचा सत्कार



**जळगाव :** जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशन चे सहकारी, जिल्हा ऑयकॉन, आणि आमचे जळगाव येथील प्रतिनिधी मदन रामनाथ लाठी यांनी आजपर्यंत ९१ वेळेस रक्तदान केले असुन त्यांचे शेवटचे म्हणजे ९१ वे रक्तदान ७ एप्रिल २०२५ जागतिक आरोग्य दिन या दिवशी केले. पहिल्या करोना काळात नोव्हेंबर आणि १२ डिसेंबर २०२० रोजी दोनदा प्लाझमा देऊन चार पेशंटला जीवनदान मिळालेला आहे. त्यानंतरही त्यांनी या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्याचा विविध सेवाभावी संस्था तर्फे सत्कार करण्यात आले होते. काल दि २७ एप्रिल रोजी मुंबई येथील सिनेअभिनेते आणि निवेदक श्री अभिजित खांडेकर जळगावात आले असताना त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी एरंडोल येथील आमदार श्री अमोल पाटील, ॲडव्होकेट श्री संजय राणे, विविध सन्माननीय पाहुणे मंचवर होते. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे आयकॉन होते, जैन इरिगेशन सिस्टीम लि व्हाईस प्रेसिडेंट मिडिया श्री अनिल जोशी, पुणे येथील उद्योजक श्री अशोक पाटील, येथील श्री संजय दुसाने, पंकज कासार आदी उपस्थित होते.

### भारतीय जनता पार्टीचे संपर्क अभियान

**नांदगाव पेठ :** भारतीय जनता पार्टीच्या वतीने वलगाव येथे गाव-वस्ती संपर्क अभियान उत्साहात राबविण्यात आले. या अभियानासाठी भाजपा जिल्हा सरचिटणीस विवेक गुल्हाने तसेच पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर गावातील मंदिर व परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. विविध सरकारी योजनांमधील किमान १० लाभार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. अभियानादरम्यान अंगणवाडी, शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देण्यात आल्या. स्थानिक समस्या व गरजांबाबत माहिती घेण्यात आली. यावेळी माजी सैनिक गडलिंग यांचा तसेच अंगणवाडी सेविका मायाताई पिसाळकर यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. गावातील गरिब कुटुंबातील सुरुबाई यांच्या घरी जाऊन बेसन पोळी जेवणाचा आस्वाद पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी घेतला.यावेळी भाजपचे पदाधिकारी मनोज खवड, मामासाहेब निर्मल, अनिल सिकची, विजय जोशी, पंकज बारब्दे, संतोष खोहरे, संदीप कळस्कर, संजय शर्मा, सागर काळे, धीरज डेहणकर, मोहन मस्के, मारोतराव इसळ, सुधीर रवाळे, गिरीश टेलकर यांचा समावेश होता. या अभियानामुळे गावातील जनतेशी थेट संपर्क साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्याची संधी मिळाली असून यामुळे विकासाचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविता येणार आहेत, असे मत भाजपचे जिल्हा सरचिटणीस विवेक गुल्हाने यांनी व्यक्त केले.

## निधन वार्ता

### दिवाकर कळंबे



**वरूड :** लिंगा ग्रामपंचायतचे माजी सरपंच तथा तंटामुक्ती अध्यक्ष दिवाकर तुकारामजी कळंबे (७६) यांचे अल्पशा आजाराने सोमवार २८ एप्रिल ला रात्री १० वाजताचे दरम्यान निधन झाले.यांचे पश्चात एक भाऊ,पत्नी ,२मुले,१ मुलगी असा आप्त परिवार आहे. यांचे पार्थिवावर मंगळवारला दुपारी १२ वाजता लिंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# फळांच्या खरेदीसाठी दुकानात गर्दी

## उन्हामुळे बाजारात रसाळ फळांची मागणी वाढली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** मागील काही दिवसापासून शहराचा उन्हाचा पारा वाढतच आहे. गेल्या दोन दिवसांपासून शहरासह जिल्ह्यातील तापमान हे ४४ अंशाच्या वर गेले आहे. दरम्यान उन्हाळा सुरु होताच नागरिकांचा ओढा रसाळ फळांकडे वाढत असल्याचे दिसून येत आहे. टरबुज, खरबुज, नारळ पाण्याची मागणी अधिक प्रमाणात वाढली आहे. उन्हामुळे फळांची मागणी वाढल्याने ग्राहकांची फळाच्या दुकानांत गर्दी दिसून येत आहे.
निरोगी आरोग्यासाठी डॉक्टर फळे खाण्याचा सल्ला देतात. विविध फळे खाण्याकडे तसेच नारळाचे पाणी पिण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. फळांचा वापर आरोग्यासाठी हितकारक असल्याने वर्षभर त्याचा वापर होतो. परंतु, उन्हाळ्यात रसाळ फळांचे सेवन केल्याने तहान भागवली जाते.



उन्हाळा सुरु होताच रसाळ फळांची मागणी वाढत आहे. त्यामध्ये टरबुज, खरबुजाला सर्वाधिक मागणी असते. सोबतच अंगुर, डाळींब, नारळ पाणी, चिकु, अननस यांनाही मागणी आहे. फळांची दुकाने, रसवंती, ज्युस सेंटर व आईस्क्रीम दुकानांमध्ये नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. टरबूज एक मोठे हिरव्या रंगाचे लाल, पाणीदार व गोड असणारे फळ आहे. ते उत्तम टॉनिक आहे. टरबुजामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. शरीराला उष्णतेपासून बचाव करते, वेगाने वजन कमी करते. टरबुजातील पोषक घटक हृदय निरोगी ठेवते, फ्चन क्रिया सुधारते, किडनी स्टोन पासून मुक्तता मिळते. उन्हाळा सुरु होताच रसवंती, आईस्क्रिम दुकाने, ज्युस सेंटर सारखी दुकाने शहरात अधिक प्रमाणात लागली आहे. उन्हाचा पारा वाढत असला तरी नागरिकांना कामानिमित्त घराबाहेर पडावेच लागते. सध्या उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असून अशावेळी थंड पेय नागरिकांना शीतलता देत आहे.

### टरबूज झाले स्वस्त

उन्हाळ्यात शरीराला पोषक घटक आणि भरपूर प्रमाणात शरीराला ऊर्जा आणि मिनरल देणारे फळ म्हणून टरबूज या फळाची ओळख आहे. सुरुवातीला ४० ते ५० रुपये किलो विक्री होणारे टरबूज बाजारात आवक वाढल्याने आता १५ ते २० रुपये किलो प्रमाणे विक्री होत आहे. त्यामुळे नागरिकांची टरबूज खरेदीसाठी गर्दी होताना दिसत आहे.

# पाणीटंचाई निवारणाची कामे तातडीने पूर्ण करावीत : जिल्हाधिकारी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** जिल्ह्यात प्रामुख्याने ग्रामीण भागात उन्हाळ्याच्या दिवसात पाणीटंचाई जाणवत आहे. गावांचे पारंपारिक पाण्याचे स्त्रोत कोरडे पडल्याने नागरिकांसमोर पाणीटंचाईचे संकट आहे. त्यामुळे पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी पुर्णत्वास आलेल्या योजना तातडीने सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले. जिल्ह्यातील उन्हाळ्यातील पाणीटंचाई निवारणासंदर्भात पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद, नगरपालिकांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर उपस्थित होते.
जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, पाणीटंचाई आणि पाणी पुरवठ्यातील अनियमितता याबाबत तक्रारी आणि निवेदने वाढत आहे. पाणी टंचाई जाणवणाऱ्या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मात्र हा तात्पुरता पर्याय आहे. याबाबत ज्या गावांमध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी कामे सुरू केली आहे, ती तातडीने एक महिन्याच्या आत पूर्ण करावीत, कामे पूर्ण करून नागरिकांना त्यांच्या घरी पाणी पुरवठा कशा प्रकारे करता येईल, याचे नियोजन करावे. जिल्ह्यात जलजीवन मिशनची कामे करण्यात येत आहे. याबाबत आवश्यक असणारी कार्यवाही करून कामे पूर्णत्वास न्यावीत.
उन्हाळ्याच्या दिवसात नागरिकांची टँकरवरील निर्भरता कमी करावी. गावातील पाणी पुरवठा करणारी यंत्रणा सक्षम ठेवावी. गळती, पाईपलाईनची फुटणे यावर तातडीने कारवाई करून त्याच दिवशी पाणीपुरवठा सुरळीत करावा. पाणी पुरवठा करण्यासाठी योग्य दाबाचा विजपुरवठा होईल, याकडे लक्ष द्यावे. जिल्ह्यातील पाच तालुक्यात पाणी पातळी खाली गेलेली आहे. त्यामुळे याठिकाणी जलपुनर्भरणाची कामे मोठ्या प्रमाणात घ्यावी. तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी दिले.

# स्मशानभूमित निनादली ग्राम गीतेतील रामधून

## यावली (शहीद) येथे ग्राम जयंती महोत्सव सोहळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**यावली शहीद, दि. ३० :** येथे वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मस्थान स्मृती मंदिर आयोजित ग्राम जयंती महोत्सवात विविध कार्यक्रम साजरे होत आहे.त्यातील एक आगळावेगळा कार्यक्रम म्हणजे जन्मस्थान ते मोक्षधाम बाग (स्मशानभूमी यावली) दरम्यान रामधून कार्यक्रम. वैशाख महिन्याच्या सुंदर पहाटे (ता.२८) जन्मस्थान ते स्मशानभूमी अशी जय गुरुदेव जयघोषाने रामधुन व स्मशानभूमी येथे सर्व धर्मपंथांच्या देवी-देवतांच्या मूर्तीचे पूजन तथा गत वर्षातील गतातम्यांना सामुदायिक श्रद्धांजली कार्यक्रम घेण्यात आला. जन्मस्थान ते मोक्षधाम मार्गावर ठिकठिकाणी पुष्पवर्षाव, रस्त्यांवर रंगीबेरंगी रांगोळी आणि हजारो कंठातून जय गुरुदेव जयघोषाने यावली शहीद येथील ग्रामस्थ स्मशानभूमी येथे जात. कार्यक्रमाला शेकडोच्या संख्येत महिलांची उपस्थिती उल्लेखनीय अशी होती. स्मशानभूमीतील या रामधून कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी उपसभापती विधानसभा शरद तसरे, प्रमुख वक्ते ह .भ. प. सुनील महाराज लांजुळकर, माहुली पोलीस स्टेशन ठाणेदार गजानन वाघ तर प्रमुख उपस्थिती म्हणून जन्मस्थान स्मृती मंदिर अध्यक्ष रामचंद्र कांडलकर , मोक्षधाम समिती यावली अध्यक्ष सुधाकर होले, सी.ए. श्यामसुंदर राठी, डॉ. सेलचे डॉ.सुभाष तंवर, यावली शहीद
ग्रा.पं.सरपंच शिल्पा खवले, उपसरपंच नितीन पाचघरे, कृषी सहाय्यक ज्योती ठाकरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल तडस यांनी केले. सूत्रसंचालन कल्याणी चांदूरे यांनी तर आभार नरसिंगपूरचे पोलीस पाटील प्रवीण वानखडे यांनी मानले. सुंदर नियोजन काशिनाथ जवणे ,गजानन देशमुख, सतीश उमप, विनोद मनगटे, मनोज चौधरी, सुनील देशमुख, अरुण तडस ,घनश्याम पिकले. गंगाधर श्रीखंडे, किशोर पाचघरे, अरविंद देशमुख, अक्षय भोपळे,अनंत हागोने, जयकृष्ण धर्माळे, प्रभाकर ठाकरे, रंगराव कांडलकर, अरविंद शहापुरे सुधाकर कांडलकर,दीपक कांडलकर,प्रकाश बानाईत सह गुरुदेव सेवा मंडळाच्या तरुणाईचे मोलाचे सहकार्य लाभले .कार्यक्रमाला मोठ्या संख्येने आभालवृद्ध, महिला, भक्तगण उपस्थित होते.



## विद्यापीठाच्यावतीने वार्षिकांक स्पर्धेची घोषणा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि.३०:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने दरवर्षी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाद्वारे प्रकाशित वार्षिकांकामधून उत्कृष्ट वार्षिकांक ला पारितोषिक देण्यासाठी स्पर्धा घेतल्या जाते. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रकाशित वार्षिकांक स्पर्धेतील पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. शहरी विभागांतर्गत व्यावसायिक व बिगर व्यावसायिक गट आणि ग्रामीण विभागांतर्गत व्यावसायिक व बिगर व्यावसायिक गटात सदर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत शहरी विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक भारतीय महाविद्यालय, अमरावतीच्या 'भारती' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या 'क्रिएशन' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळच्या 'शब्दार्क' या वार्षिकांकास घोषित करण्यात आला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पापळ, दि. ३० :** तहसील कार्यालय नांदगाव खंडेश्वर च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजास्व समाधान शिबिर अभियान नुकतेच एडिटोरियम हॉल पापळ येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रभारी तहसीलदार संजय भास्करवार नायब तहसीलदार गुलाब मुजमुले पुरवठा निरीक्षक कु शितल राठोड उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पापड येथील सरपंच सौ उज्वला इंगळे माजी उपसरपंच वाल्मीक इंगळे पोलीस पाटील स्वाती ओंबासे ग्राप सदस्य विजय अजबले देविदास खिराडे उपस्थित होते. मान्यवराचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली या अभियाना अंतर्गत संजय गांधी निराधार योजना,पीएम किसान योजना, डोमेशियल, उत्पन्न दाखले,राशन कार्ड जॉब, कार्ड आधार कार्ड अपडेट, तसेच आरोग्य विभागाच्या समस्या, नागरिकांना भेडसावत असलेल्या विविध समस्यांचे निराकरण यावेळी करण्यात आले तसेच विविध दाखल्याचे वाटप सुद्धा करण्यात आले. अभियान यशस्वी करण्याकरता पापळ मंडळ अधिकारी श्रीमती नंदा साबळे, ग्राम महसूल अधिकारी सचिन कलोरे,सचिन वाघ,संदीप सुरजुसे, सुभाष थोरात स्वाती अंभोरे महसूल सेवक पंकज काळे ओंकार मनोहर प्रदीप बरडे आशिष ढोमणे तसेच आरोग्य सेवक परिसरातील महिला पुरुष मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या .



# जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या इमारतीला मुहूर्त मिळाला

## नवीन इमारतीत पहिली प्रसूती नॉर्मल, २२५ रुग्ण नव्या इमारतीत दाखल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** जिल्हा स्त्री रुग्णालय ची नवीन इमारत अखेर रुग्णसेवेत कार्यान्वित झाली आहे. सोमवार २८ एप्रिल ला या ठिकाणी पहिली प्रसूती यशस्वी झाली आहे. शहरातील पठाण चौक येथील सदा महेश ने एका मुलीला जन्म दिला आहे. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉक्टर विनोद पवार अतिरिक्त जिल्हा सल्फ चिकित्सक डॉक्टर अरुण साळुंखे सुनिता श्रीखंडे यांनी या महिलेचे स्वागत केले.
जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या जुन्या इमारतीमध्ये अपुऱ्या सुविधा लक्षात घेता ५५ कोटी रुपये खर्चूनही येथे नवी इमारत बांधण्यात आली या इमारतीचे उद्घाटन सप्टेंबर २०२४ मध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले होते. तर फेब्रुवारी महिन्यात रुग्णालयातील प्रशासकीय विभाग या नव्या इमारतीमध्ये स्थलांतरित झाला आहे. परंतु किरकोळ कामामुळे ही इमारत रुग्णसेवेत कार्यान्वित झालेली नव्हती. जिल्हाधिकारी सौरभ कटिहार यांनी या नव्या इमारतीची पाहणी केली होती. त्यांनी एप्रिल पासून या ठिकाणी रुग्ण सेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते.
अखेर महिला रुग्णाच्या सेवेत ही नवी इमारत सुरू करण्यात आली.या ठिकाणी पहिली प्रसूती झालेल्या गर्भवतीने एका मुलीला जन्म दिला आहे ही प्रसूती नॉर्मल झाली आहे. तसेच जुन्या इमारतीत आयसीयू विभाग ग जसेच्या ठेवण्यात आले आहे. जुन्या इमारतीत एस एन सी यु विभाग आणि शस्त्रक्रिया विभाग तसेच ठेवण्यात आले आहे. या रुग्णालयातील २५ ते ३० रुग्णावर उपचार केले जाते. त्यामुळे सध्या स्थितीत अजूनही जुन्या इमारतीचा वापर होत आहे.




### जुन्या इमारतीमधील हाल थांबणार

जिल्हास्तरी रुग्णालय येथील नव्या इमारतीमध्ये ५७ खाटांचे नवजात शिशु कक्ष आहेत. तसेच आठ ऑपरेशन थेटर आहे. यामध्ये दोन आपत्कालीन कक्ष आहेत. दोन लेबर रूम आणि सहा वार्ड आहे. काही वार्डात ४० बेड, तर काही मध्ये ३० बेड असतील. तसेच दहा बे चा आयसीयू विभाग या इमारतीमध्ये आहे. या इमारती क्षमता ४०० घाटांची आहे. इमारत कार्यान्वित झाल्याने आता जुन्या इमारतीमध्ये होणारे रुग्णाचे हाल थांबणार आहे. सध्या स्थितीत या इमार नवीन इमारतीत २२५ रुग्ण आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते जलरथाला हिरवी झेंडी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३० :** मृद व जलसंधारण विभाग आणि भारतीय जैन संघाच्या वतीने जलरथाला आज जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी हिरवी झेंडी दाखविली.
यावेळी कमलताई गवई, अपर जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, ज्ञानेश्वर घ्यार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, जिल्हा जलसंधारण अधिकारी सुनिल जाधव, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, सोनाली कोकाटे, गोविंद कासट आदी उपस्थित होते.
जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना शेतकऱ्यांना फायद्याची ठरणारी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी स्वत:हून पुढे येऊन या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.
जलरथ हा गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेची नागरिकांमध्ये जनजागृती करणार आहे. योजनेच्या माहितीसोबतच नागरिकांचे गाळ घेण्याबाबतचे अर्जही यामार्फत भरून घेतले जाणार आहे. तसेच जलरथावर क्यूआर कोड देण्यात आला असून नागरिकांना ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. शेतकऱ्यांना धरणातील सुपिक गाळ शेतामध्ये टाकण्यासाठी मोफत उपलब्ध होणार आहे. केवळ इंधनाचा खर्च संबंधित शेतकऱ्याला करावा लागणार आहे.
राज्यातील विविध जिल्ह्यात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना यशस्वी झाली असून जिल्ह्यातही ही योजना राबविण्यात येत आहे. जलरथाच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत ही योजना पोहोचविण्यात येणार आहे. जिल्ह्यात सध्यास्थितीत ११७ धरणातून गाळ काढण्यात येत आहे. यामुळे जलसाठा वाढण्यासोबतच शेतजमीन सुपिक होण्यास मदत होणार आहे. तसेच भुजल पातळी वाढून विहिरीमध्ये पाणी येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले

अजिंक्य भारत

# यवतमाळ जिल्हा

गुरूवार, दि. ०१ मे २०२५



## घटना-घडामोडी



### वणी विधानसभा अध्यक्षपदी दिलीप भोयर यांची निवड

**वणी :** येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार दिलीप भोयर यांची राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वणी विधानसभा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्षा वर्षा निकम यांनी सोमवारी (दि. २८ एप्रिल) यवतमाळात नियुक्तीपत्र दिले आहे. राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाने ही निवड झाली. भोयर यांनी यापूर्वी वंचित बहुजन आघाडीतही विविध पदे सांभाळली आहेत. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे व गोरगरीब जनतेच्या सेवेतील तत्परतेमुळे पक्षात बळकटी येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नियुक्तीपत्र देताना विधानसभेचे माजी अध्यक्ष सूर्यकांत खाडे, रामदास पखाले उपस्थित होते. भोयर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




### गुणवंत विद्यार्थ्यांसह पालकांचा गौरव

**झरी जामणी :** नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत येथील जिल्हा परिषद शाळांतील जवाहर नवोदय व गोल्डन अॅरो परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा नुकताच सत्कार करण्यात आला. त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी रवींद्र कुमार सांगळे, शाळा समिती अध्यक्ष अनिल काटकर, फेलो अनिल नरवाडे उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांत ओम डोहे, वृषभ मेश्राम, आराध्या चन्नेवार, वेदांत मंचलवार आदींचा समावेश होता. विद्यार्थी-पालक-शिक्षक समन्वयाने यश मिळते, असे पालक जयश्री बोरकर म्हणाल्या. पालक श्याम चन्नेवार यांनी जि.प. शाळांच्या गुणवत्तेचे कौतुक केले. मुख्याध्यापक विनोद मडावी यांनी संचालन, आकाश पेंदोर यांनी आभार मानले. जिल्हाधिकारी विकास मिना, प्र. सीईओ संतोष धोत्रे, सहायक जिल्हाधिकारी अमित रंजन यांचे मार्गदर्शन लाभले.



### रोशन दुपारेंची उन्हाळी शिबिराला भेट

**यवतमाळ :** येथील जय विजय गणेशोत्सव मंडळ व श्री सिद्धिविनायक मंदिरातर्फे सुरू असलेल्या निशुल्क उन्हाळी शिबिरास 'काजू' चित्रपटाचे निर्माते रोशन दुपारे यांनी नुकतीच भेट दिली. त्यांच्यासोबत नायक अमित राऊत व शरवरी हेही होते. यावेळी दुपारे यांनी शिबिरातील काही मुलांना आगामी चित्रपटात अभिनयाची संधी देणार असल्याचे जाहीर केल्याने मुलांमध्ये उत्साह संचारला. मंडळाचे अध्यक्ष सुजित राय यांनी दुपारे व टीमचे आभार मानले व मुलांच्या कलागुणांना व्यासपीठ दिल्याबद्दल अभिनंदन केले. यामुळे मुलांच्या सर्जनशीलतेला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त झाला. संजय सांबजवार, विजय बांडे, हितीक पाटील, सागर कुमरे, रोहन यादव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



### मराठी चित्रपटाचे ऑडिशन संपन्न

**यवतमाळ :** रियल गोल्ड फिल्म व प्रतिभा फाउंडेशनतर्फे एका आगामी मराठी चित्रपटासाठी येथे रविवारी (दि. २७) ऑडिशनचे आयोजन करण्यात आले होते. गोधनी रोड येथील गट संसाधन केंद्रात हे ऑडिशन यशस्वी झाले. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत झालेल्या या ऑडिशनमध्ये अनेक कलाकारांनी सहभाग घेतला. या चित्रपटाचे चित्रीकरण यवतमाळ जिल्ह्यातच होणार आहे. चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक नांदेडचे दीपक भवर पाटील असून, सहदिग्दर्शक यवतमाळच्या इंजि. प्रतिभा पवार आहेत. प्रतिभा फाउंडेशनचेही सहकार्य लाभले. स्थानिक कलाकारांना यातून संधी मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

### स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनेचा पदग्रहण सोहळा

**यवतमाळ :** 'स्त्रियांमधील वाढता कर्करोग टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपचार व प्रबोधनाची गरज आहे,' असे आवाहन अधिष्ठाता डॉ. गिरीश जतकर यांनी केले. ते येथील स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनेच्या पदग्रहण सोहळ्यात नुकतेच बोलत होते. हॉटेल वेनेशियन येथे झालेल्या सोहळ्यात डॉ. अर्चना राठोड (अध्यक्ष) व डॉ. शीतल चव्हाण (सचिव) यांनी पदभार स्वीकारला. पदग्रहण अधिकारी डॉ. पी. के. शाह (मुंबई) होते. आयएमए अध्यक्ष डॉ. आशिष तायडे, डॉ. स्नेहा भुयार, डॉ. गीता बलसारकर उपस्थित होते. नव्या कार्यकारिणीत उपाध्यक्ष डॉ. गीतांजली गुज्जर, डॉ. स्वाती मोतेवार, सामाजिक सचिव डॉ. अमृता पुनसे, सांस्कृतिक सचिव डॉ. प्राची उजवणे आदी आहेत. मावळत्या सचिव डॉ. सुषमा तारक यांनी आभार मानले.

### दुहेरी रस्ते झाले एकेरी, रोज अपघातात निष्पापांचा बळी, प्रशासन कुंभकर्णी झोपेत

# पुसदमध्ये अतिक्रमणांचा विळखा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ प्रा. महादेव गावंडे

पुसद, दि. ३० : शहर सध्या अतिक्रमणांच्या विळख्यात आणि अपघातांचे माहेरघर बनले आहे. शहरातील सर्वच प्रमुख रस्त्यांवर व्यावसायिक आणि इतरांनी केलेल्या अतिक्रमणांमुळे एकेकाळचे दुहेरी रस्ते आता एकेरी झाले आहेत. या अतिक्रमित आणि अरुंद रस्त्यांवर दररोज अपघात होऊन निष्पाप बालके आणि नागरिकांचा बळी जात आहे. मात्र, संबंधित शासकीय यंत्रणा 'कुंभकर्णी' झोपेत असल्याचे संतप्त चित्र आहे.

शहरातील मुख्य रस्ता हा आधीच अरुंद असल्याची तक्रार असताना, अतिक्रमणांमुळे तो आणखी बाधित झाला आहे. या रस्त्याचे बांधकामही अत्यंत संथ गतीने आणि निकृष्ट दर्जाचे सुरू आहे. नाल्या अपूर्ण आहेत, तर रस्ता बनवून एक-दोन वर्षे होत नाहीत, तोच त्यावर खड्डे पडत आहेत. मात्र, ठेकेदाराला जाब विचारायला कोणी तयार नाही, कारण त्याला कथितपणे अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांचा वरदहस्त असल्याची चर्चा आहे. संपूर्ण शहरातच ही बजबजपुरी माजली आहे. दुहेरी रस्ते केवळ नावाला उरले आहेत. छोटे-मोठे व्यावसायिक रस्त्यांना आपली खासगी मालमत्ता समजून त्यावर अतिक्रमण करत आहेत. यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होऊन दररोज अपघात घडत आहेत. अपघात झाल्यावर वाहतूक विभाग तात्पुरता जागा होतो, बांधकाम विभाग झोपेचे सोंग घेतो, तर नगर पालिका 'तो मी नव्हेच' ची भूमिका घेते. लोकप्रतिनिधीही या गंभीर समस्येकडे पाहून न पाहिल्यासारखे करतात. या सर्व अनास्थेमध्ये नाहक गोरगरीब नागरिकांना आपला जीव गमवावा लागत आहे. हा प्रश्न असाच राहणार की कोणीतरी जबाबदारी घेणार, की निष्पाप लोकांचे बळी असेच जात राहणार? यामागे 'कमिशन राज' आणि 'हप्तेखोरी' असून, 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' या वृत्तीमुळेच हा प्रकार सुरू आहे का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. अतिक्रमणे हटवून रस्ते मोकळे केल्यास अपघात टळतील व जीव वाचतील, अशी चर्चा शहरात सुरू आहे.

#### अपघाताची शक्यता

**पुसद शहरातील मुख्य रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने सुरू असून, ते निकृष्ट दर्जाचे आहे. रस्ता बनवून वर्ष होत नाही, तोच खड्डे पडतात, नाल्या अपूर्ण आहेत. ठेकेदाराला कथित राजकीय आणि प्रशासकीय अभय असल्याने तो कामाच्या दर्जाकडे लक्ष देत नाही. अरुंद रस्ता आणि अतिक्रमणांमुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला आहे, तरीही बांधकाम विभाग कोणतीही कारवाई करत नसल्याचे चित्र आहे.**

#### 'तेरी भी चूप, मेरी भी चूप'!

**पुसदमधील अतिक्रमणांवर आणि त्यामुळे होणाऱ्या अपघातांवर कोणतीच यंत्रणा कारवाई करायला तयार नाही. वाहतूक विभाग केवळ नावापुरता, बांधकाम विभाग सुस्त, नगरपालिका जबाबदारी झटकते, तर लोकप्रतिनिधी डोळेझाक करतात. यामागे 'कमिशन' आणि 'हप्तेखोरी' असून, सर्वच घटक 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' यानुसार एकमेकांना पाठीशी घालत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. त्यामुळेच अतिक्रमणे हटवली जात नाहीत.**

### माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात

**उमरखेड ३० :** येथील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १९९४ ते १९९७ च्या दहावी-बारावी बॅचचा स्नेहमेळावा तब्बल ३१ वर्षांनी रविवारी (दि. २७) उत्साहात झाला. यावेळी गुरुजनांप्रति ऋणनिर्देश व्यक्त करण्यात आले. उपस्थित शिक्षकांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त करीत जुन्या आठवणींना उजाळा दिला. विठ्ठल कुंभलवाड यांच्या संकल्पनेतून चॉकलेट किट वाटप झाले. मुख्याध्यापक खोकले सर व शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यशस्वीतेसाठी मारोती माने, डॉ. जयकुमार माने, मारोती बेद्रे, पत्रकार विजय कदम, विठ्ठल कुंभलवाड, बालाजी शामराव माने, दत्तराव माने आदींनी परिश्रम घेतले. मारोती माने यांनी संचालन व प्रास्ताविक केले. ९०% माजी विद्यार्थी सहकुटुंब उपस्थित होते.

## घाटंजी-यवतमाळ बससेवेचा गोंधळ

### वेळापत्रकात अनागोंदी, महत्वाच्या वेळी बससेवाच नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. ३० :** येथील बसस्थानकावरून यवतमाळकडे जाणाऱ्या प्रवाशांना एस.टी. महामंडळाच्या विस्कळीत वेळापत्रकाचा मोठा फटका बसत आहे. विशेषतः सकाळी सव्वानऊ ते सव्वादहा आणि दुपारी साडेचार ते सायंकाळी सहा या महत्त्वाच्या वेळी यवतमाळसाठी बससेवाच उपलब्ध नसल्याने शंभरहून अधिक प्रवाशांना तासन्तास बसस्थानकावर ताटकळत थांबावे लागते, ज्यामुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या वेळेत नियमित प्रवास करणारे शासकीय-खाजगी कर्मचारी, शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच उपचारासाठी यवतमाळला जाणारे रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या



संख्येने बसची वाट पाहत असतात. सकाळी ९:१५ ते १०:१५ या एक तासाच्या काळात आणि दुपारी ४:३० ते ६:०० या दीड तासाच्या वेळेत यवतमाळसाठी एकही बस नसल्याने या सर्वांची मोठी गैरसोय होते. वेळेवर बस न मिळाल्याने विद्यार्थ्यांना शाळेत, कर्मचाऱ्यांना कार्यालयात आणि रुग्णांना दवाखान्यात पोहोचायला प्रचंड उशीर होतो. अनेकांना नाइलाजाने खासगी वाहनांचा महागडा पर्याय निवडावा लागतो. सायंकाळी सहा वाजता अदिलाबाद-यवतमाळ बस स्थानकावर लागल्यानंतर, तोपर्यंत ताटकळलेले सर्व प्रवासी एकाच वेळी बसमध्ये चढण्यासाठी अक्षरशः झुंबड करतात. या गर्दी आणि रेटारेटीमध्ये चोरीच्या घटना घडण्याचीही शक्यता वाढते. प्रवाशांनी या गंभीर समस्येबाबत आगार व्यवस्थापकांकडे अनेक वेळा तोंडी आणि लेखी तक्रारी केल्या आहेत, मात्र अद्याप कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे, एस.टी. महामंडळ प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन सकाळ आणि सायंकाळच्या वेळेत तातडीने नियमित व अतिरिक्त बस फेऱ्या सुरू कराव्यात, जेणेकरून प्रवाशांची गैरसोय दूर होईल, अशी जोरदार मागणी जोर धरत आहे.

### राज्यव्यापी स्वच्छता अभियान

**महागाव, दि. ३० :** राज्याचे नवनियुक्त स्वच्छता दूत, माहूर येथील आनंद दत्तधाम आश्रमाचे मठाधिपती प.पू. साईनाथ महाराज वसमतकर यांनी सोमवारपासून (दि. २८) राज्यव्यापी स्वच्छता अभियानाचा शुभारंभ केला. श्रीक्षेत्र माहूरगड येथील श्री दत्त शिखर संस्थानात महंत प.पू. मधुसूदन भारती व गुरु अच्युत भारती यांच्या आशीर्वादाने अभियानास प्रारंभ झाला. हे अभियान राज्यभरातील धार्मिक स्थळे, मठ, आश्रमांत राबविले जाणार आहे. कुठलेही मानधन न घेता भक्तगणांसह हे कार्य करण्याचा निर्धार महाराजांनी व्यक्त केला. त्यांनी नियुक्तीबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह शासनाचे आभार मानले. नुकताच माहूरमध्ये त्यांचा नागरिक सत्कारही झाला होता.

## लोकसेवा हक्क कायद्यावर जनजागृती कार्यक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नेर, दि. ३० :** येथील नेहरू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 'महाराष्ट्र लोकसेवा हमी अधिनियम २०१५' बाबत जाणीव जागृती कार्यक्रम झाला. तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांनी विद्यार्थ्यांना कायद्याची माहिती दिली. प्राचार्य डॉ. ए. एन. भोरजार यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम झाला.

'शिक्षणाने माणूस समृद्ध होतो, पण सरकारी सेवांच्या अधिकारांबाबतही जागृत रहावे. पारदर्शक, कार्यक्षम, कालबद्ध सेवेसाठी लोकसेवा हक्क कायदा आहे, तो समजून घ्या,' असे प्रतिपादन प्रमुख अतिथी तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांनी केले. त्यांनी 'आपले सरकार आरटीएस महाराष्ट्र' अॅप व ऑनलाईन प्रणालीद्वारे सेवा मिळवण्याबाबत व तक्रार करण्याबाबत माहिती दिली. तसेच विविध कार्यालयांच्या सेवांसाठी क्यूआर कोड उपलब्ध करून दिला. मंचावर उपप्राचार्य डॉ. एस. व्ही. अडसोड, नायब तहसीलदार लक्ष्मीकांत देशपांडे, नायब तहसीलदार प्रवीण इंगोले, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. व्ही. गावंडे उपस्थित होते. डॉ. अडसोड यांनी स्वागत केले. कार्यक्रमास डॉ. संदीप काटोले, प्रा. सुरेश इंगळे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नेर येथे लोकसेवा हक्क अधिनियम दिन साजरा



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नेर, दि. ३० :** येथील दि इंग्लिश हायस्कूलमध्ये तहसील कार्यालयातर्फे महाराष्ट्र लोकसेवा हमी अधिनियम दिवस साजरा झाला. तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांनी कायद्याचे महत्त्व सांगितले. प्राचार्य गजानन उईके अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थी, पालकांना माहिती देणे हा उद्देश होता.

तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, 'हा नागरिकांना अधिकार देणारा व प्रशासनाला जबाबदार, उत्तरदायी करणारा क्रांतिकारी कायदा आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नायब तहसीलदार पि. यु. इंगोले, निवासी नायब तहसीलदार लक्ष्मीकांत देशपांडे, उपप्राचार्य प्रा. किशोर राठोड, प्रा. मनिषा बनसोड यांनीही समयोचित विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनंत हिरुळकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन राहुल चिरडे यांनी केले. कार्यक्रमास मोहन भलावी, राहुल खेरे, सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सेवा हक्क दिवसाची शपथ घेऊन सांगता झाली.

### विषमुक्त शेतीवर प्रशिक्षण शिबिर

**यवतमाळ, दि. ३० :** येथील दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या सेंद्रिय शेती प्रकल्पातर्फे विषमुक्त शेती निवासी प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे. ३ मे ते ८ मे दरम्यान निळोणानजीकच्या दीनदयाल प्रबोधिनीमध्ये नाममात्र शुल्कात हे शिबिर होईल. यात सेंद्रिय शेतीतज्ज्ञ माऊली कापसे मार्गदर्शन करतील. कमी खर्चाची शेती, मृदा सुपोषण, विषमुक्त अन्ननिर्मिती हे उद्देश आहेत. गोसंवर्धन, मशागत, कीड नियंत्रण, भू-सूक्ष्मजीवशास्त्र, बीजसंस्कार आदी विषयांवर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले जाईल. महिला-पुरुषांसाठी स्वतंत्र निवास व्यवस्था आहे. शिबिर संयोजक बाबा कपिले व शरद माहुरे यांनी शेतक?यांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## मुख्यमंत्री वारकरी महामंडळ कागदावरच?

### अंमलबजावणीसाठी कलावंत समिती आक्रमक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३० :** शासनाने १४ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय काढून जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री वारकरी महामंडळा'ची वर्ष उलटूनही अंमलबजावणी न झाल्याने अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राज्यातील कीर्तनकार व वारकऱ्यांसाठी सोयीसुविधा पुरवण्याच्या उद्देशाने स्थापन झालेले हे महामंडळ अद्याप कार्यान्वित नसल्याने, त्याच्या तात्काळ अंमलबजावणीसाठी समितीने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

समितीच्या म्हणण्यानुसार, शासन निर्णय पारित होऊन एक वर्ष होत आले तरी महामंडळाची रचना, कार्यपद्धती, आर्थिक तरतूद यापैकी काहीही निश्चित झालेले नाही. याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे विचारणा केली असता, कोणतीही अद्ययावत माहिती उपलब्ध नसल्याचे किंवा मंडळाच्या आर्थिक तरतुदीसाठी लेखाशीर्ष ठरवण्याचे काम सुरू असल्याचे उत्तरे मिळत आहेत (उपसचिव जगदीश देवरे यांनी दिलेल्या माहितीनुसार). विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर वारकरी आणि कलावंतांची मते मिळवण्यासाठी मतांची ओंजळ भरण्याचा हा फंडा वापरल्याची चर्चा वारकरी व कलावंतांमध्ये सुरू असल्याचे समितीने म्हटले आहे. विशेषतः आळंदी येथील वारकऱ्यांवरील लाठीचार्जमुळे नाराज झालेल्या लाखो वारकऱ्यांची समजूत काढण्यासाठी हे 'ओवाळणी पॅकेज' दाखवण्यात आले, असा आरोपही होत आहे. निवडणूक होऊन सत्ता आल्यानंतर सरकारला वारकरी कल्याणाचा आणि प्रस्तावित महामंडळाच्या घोषणेचा सोयीस्कर विसर पडला आहे, त्यामुळे सरकारला जागे करणे गरजेचे असल्याचे समितीचे म्हणणे आहे. समिती वारकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी कटीबद्ध असून, लवकरच संस्थापक अध्यक्ष सोमनाथ गायकवाड यांच्या नेतृत्वात प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदन देऊन मुख्यमंत्र्यांपर्यंत आपल्या वेदना पोहोचवणार असल्याचा इशारा समितीचे राष्ट्रीय महासचिव अॅड. श्याम खंडारे यांनी दिला आहे. महामंडळ तात्काळ कार्यान्वित न झाल्यास तीव्र आंदोलन केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## दिग्रस तालुक्यातील ग्रामीण भागात भीषण पाणीटंचाई

### सुट्टीतही 'मामाचं गाव' झालं नकोसं, पाणीबाणीने नागरिक त्रस्त; ग्रामपंचायतींच्या कारभारावर संताप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ जय राठोड

**दिग्रस, दि. ३० :** तालुक्यातील बहुतांश गावांना सध्या भीषण पाणीटंचाईने ग्रासले असून, नागरिकांचे, विशेषतः महिलांचे प्रचंड हाल होत आहेत. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, बाहेरगावी नोकरी करणारे किंवा शिक्षण घेणारे तरुणही उन्हाळ्याच्या सुट्टीत आपल्या मूळ गावी येण्यास कचरत आहेत. मुलांचे आवडते 'मामाचे गाव' सुद्धा पाणीटंचाईमुळे दुरापास्त झाले असून, या सर्व परिस्थितीला ग्रामपंचायतींचा सुस्त कारभार जबाबदार असल्याची संतप्त भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.



उन्हाचा कडाका वाढल्याने शाळांना सुट्ट्या लागल्या आहेत. मात्र, 'केशर-आंबा खाऊ या, मामाच्या गावाला जाऊ या' म्हणणाऱ्यांना चिमुकल्यांच्या उत्साहावर पाणीटंचाईने पाणी फेरले आहे. शहरात किंवा तालुक्याच्या ठिकाणी परीक्षेसाठी मुलांना घेऊन गेलेले अनेक पालक, गावातील पाणीबाणीमुळे पैसे मोजून शहरातच भाड्याने राहणे पसंत करत आहेत. गावाकडे परतण्याची त्यांची इच्छा पाण्याअभावी मरून गेली आहे. सध्या लग्नसराई जोरात सुरू आहे, त्यामुळे कामानिमित्त बाहेरगावी असलेले अनेकजण गावी परतत आहेत. मात्र, शहरात सवयीने राहणाऱ्या कुटुंबाला गावाकडच्या उकाड्यात, तेही पाण्याविना कसे ठेवायचे, हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. वधूपित्याला तर लग्नात पाहुण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे. महिला वर्गापुढे 'घर चालवावे की पाणी भरावे' असा प्रश्न आहे. अनेक ठिकाणी कुपनलिका नादुरुस्त आहेत, तर काही ठिकाणी अधिग्रहण केलेल्या विहिरींचे पाणीही पुरेसे मिळत नाही. या सर्व समस्यांसाठी ग्रामस्थ स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनालाच जबाबदार धरत असून, त्यांच्या निष्क्रियतेमुळेच नागरिकांवर ही वेळ आल्याचा आरोप होत आहे. सुरळीत पाणीपुरवठा कधी होणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

#### पाण्यामुळे गाव नकोसे

**मी पुणे येथील एका खासगी कंपनीत नोकरी करतो. मुलांना सुट्ट्या लागल्याने गावी (आरंभी) जाण्याचा विचार होता, पण पाण्याअभावी तो रद्द केला. वर्षातून दिवाळी आणि उन्हाळ्यातच गावी येणे होते, पण आता विजेचा लपंडाव आणि भीषण पाणीटंचाईमुळे गावात येण्याचीही हिंमत होत नाही. पाण्याअभावी आपलेच गाव नकोसे झाले आहे.**

**- भारतसिंह चव्हाण**
**रहिवासी, आरंभी**

#### ग्रामपंचायती अपयशी?

**दिग्रस तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचे चित्र आहे. पदाधिकारी आणि प्रशासनाच्या कथित निष्क्रियतेमुळे पाणी योजना असूनही त्या कार्यान्वित नाहीत किंवा पाणी वितरण अनियमित आहे. याचा थेट परिणाम लोकांच्या जीवनमानावर होत असून, गाव असूनही तेथील विद्यार्थी, नोकरदार आणि व्यावसायिकांना आपले गाव पाण्याअभावी परके वाटू लागले आहे, अशी संतप्त भावना व्यक्त होत आहे.**

अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५



## थोडक्यात

### सोन्याची चैन लंपास

**यवतमाळ :** यवतमाळ बसस्थानकावरून महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन लंपास केली. या प्रकरणी यवतमाळ येथील बसस्थानकावर बसमध्ये चढत असतांना अज्ञात चोरट्याने गर्दीचा पायदा घेवून महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन किंमत ४१,३०० रूपयाची हातचलाखीने चोरून नेली. ही घटना २९ एप्रिलला घडली. याप्रकरणी प्रकाश कृष्णराव गुल्हाने यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### श्रीकृष्ण नगरात घरफोडी

**यवतमाळ :** श्रीकृष्ण नगरात घरफोडी केल्याची घटना घडली. याप्रकरणी घराबाहेर कुलुप लावुन गेले असता अज्ञात चोरट्याने कुलूप कोंडा तोडुन आत प्रवेश करून कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेला सोन्याचा १४ ग्रॅम ९७० मीला गोप किंमत ४५,५१२ रूपयाचा चोरून नेला. याप्रकरणी आशिष सुभाष भोयर यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद केला.

### मोटार सायकल लंपास

**यवतमाळ :** मोटार सायकल लंपास केल्याची घटना सरकारी दवाखाना यवतमाळ येथे घडली. याप्रकरणी हीरो होन्डा स्प्लेंडर कंपनीची मोटार सायकल किंमत ३०,००० रूपयाची घटनास्थळावरून चोरून नेली. याप्रकरणी संध्या शैलेश बिजुलकर यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद केला.

### चहा कॅन्टींगमधून साहित्य लंपास

**बाभूळगाव :** चहा कॅन्टींगमधुन साहीत्य लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी चहा कॅन्टींग व पानठेल्याच्या दुकानाचे टिनपत्रे काढुन आत प्रवेश करून काउंटरच्या ड्राव्हरमधील नगदी ७ हजार रूपये व कोल्ड्रींग बॉटल असा एकुण १२००० रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केला. याप्रकरणी शेख अफरोज शेख उमर यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद केला.

### २० हजारांचा मुद्देमाल लंपास

**बाभूळगाव :** तातडी ले-आऊटमध्ये घरफोडी केल्याची घटना घडली. याप्रकरणी घरात प्रवेश करून घरातील ऐसर कंपनीची एलईडी टी.व्ही. किंमत २० हजार व पत्नीच्या पर्समधील ६ हजार असा एकुण २६ हजाराचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी मुजीब शहा मेहबुब शहा यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

---

यवतमाळ गुन्हे शाखेने रॅकेट केले उघड | गोरगरिबांच्या हक्काच्या धान्याची खुलेआम तस्करी | पुरवठा साखळीतील भ्रष्टाचारावर शिक्कामोर्तब | ट्रकसह मुद्देमाल जप्त; दोघांना अटक | गोडाऊन कीपर, दुकानदारही सामील असल्याचा संशय

# रेशनचा तांदूळ काळ्या बाजारात!

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. 30 :** गोरगरिबांसाठी सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे येणारा रेशनचा तांदूळ थेट काळ्या बाजारात विकणाऱ्या मोठ्या रॅकेटचा यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. शहरापासून जवळ असलेल्या मनदेव घाटात सापळा रचून पोलिसांनी सुमारे 58 लाख रुपये किमतीचा तांदूळ आणि ट्रक जप्त केला असून, दोघांना अटक केली आहे. या कारवाईमुळे पुरवठा साखळीतील मोठ्या भ्रष्टाचाराची शक्यता वर्तवली जात आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात खासगी वाहनाने पेट्रोलिंग करत असताना, त्यांना एका ट्रक (क्र. एम.एच.



29 बी.ई. 8532) मधून रेशनचा तांदूळ अवैधरीत्या खुल्या बाजारात विक्रीसाठी यवतमाळमार्गे गोंदियाकडे नेला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ मनदेव घाटात सापळा रचला आणि संशयास्पद ट्रक अडवला. ट्रकमधील दोघांना त्यांचे नाव-गाव विचारले असता, त्यांनी आपली नावे शेख मोहसीन शेख कादर (34, रा. देऊळवाडी पुनर्वसन, दिग्रस) आणि हाफीज बेग सनाउल्ला बेग (34, रा. बाराभाई मोहल्ला, दिग्रस) अशी सांगितली. त्यांच्याकडे ट्रकमधील तांदळाबाबत चौकशी केली असता, ते समाधानकारक उत्तरे देऊ शकले नाहीत किंवा तांदळासंबंधी कोणतीही वैध कागदपत्रे वा बिल सादर करू शकले नाहीत. हा तांदूळ शासकीय रेशनचा असल्याचा प्रथमदर्शनी संशय आल्याने पोलिसांनी पंचनामा करून ट्रक व तांदूळ जप्त केला. यवतमाळ तहसीलदारांनीही हा तांदूळ सार्वजनिक वितरण प्रणालीचाच असल्याचा अहवाल दिला.

### गोडाऊनमधूनच रेशनचा तांदूळ गायब?

- **या कारवाईमुळे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे. घाटंजी, झरी, केळापूर तालुक्यात गोडाऊन कीपर आणि स्वस्त धान्य दुकानदार संगनमताने थेट शासकीय गोडावूनमधूनच रेशनचे धान्य तस्करांना विकत असल्याचा संशय आहे. 'या महिन्याचा कोटा आला नाही,' असे खोटे सांगून हे दुकानदार गोरगरिबांना त्यांच्या हक्काच्या धान्यापासून वंचित ठेवत असल्याचे बोलले जात आहे. या रॅकेटची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.**

पोलिसांनी एकूण 57 लाख 64 हजार 200 रुपयांचा मुद्देमाल जप्त करून शेख मोहसीन आणि हाफीज बेग यांच्यासह या हेराफेरीमागील मुख्य आरोपीविरुद्ध यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्यात अत्यावश्यक वस्तू अधिनियम कलम 3 व 7 अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक, पियुष जगताप, पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलिस निरीक्षक संतोष मनवर, पोलिस अंमलदार योगेश गटलेवार, अजय डोळे, विनोद राठोड, प्रशांत हेडाऊ, नीलेश राठोड, रितुराज मेडवे, आकाश सहारे, सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

---

## पालकमंत्री राठोड यांच्याहस्ते आज ध्वजारोहण

**यवतमाळ, दि.30:** महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या स्थापना दिनानिमित्त पालकमंत्री तथा राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्याहस्ते, उद्या गुरुवार, दि. 1 मे रोजी सकाळी 8 वाजता मुख्य ध्वजारोहण होणार आहे. येथील समता मैदान (पोस्टल ग्राउंड) येथे ध्वजारोहणाचा मुख्य समारंभ पार पडणार आहे. पालकमंत्र्यांच्या हस्ते बरोबर 8 वाजता ध्वजारोहण होईल. यावेळी लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, स्वातंत्र्य संग्राम सैनिक, माजी सैनिक व त्यांचे कुटुंबीय उपस्थित राहणार आहे. नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.



---

## CAPTION शोभा यात्रेचे स्वागत!



**यवतमाळ : अखिल ब्राह्मण समाजाचे आराध्य दैवत भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त बुधवारी सायंकाळी शहरातील प्रमुख मार्गावरून शोभा यात्रा काढण्यात आली. शहरातील ब्राह्मण समाज बांधव या शोभायात्रेत मोठ्या संख्येत सहभागी झाले. शोभा यात्रेचे स्वागत करताना ब्राह्मण भगिणी.**

(छायाचित्र : प्रसाद नायगावकर)

---

## जागेचा वाद विकोला गेल्याने भावानेच केली भावाची हत्या

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.30:** जागेचा वाद विकोपाला जाऊन भावानेच भावाची चाकूने वार करून हत्या केल्याची घटना आज, बुधवारी (दि.30) सायंकाळी स्थानिक पिंपळगाव येथील अनुश्री पार्क परिसरात येथे घडली.



शहर गुन्हे शाखेच्या (डीबी) पथकाने दिलेल्या माहितीवरून प्रमोद पंढरी पेन्दोर (वय 45) रा. अनुश्री पार्क व त्याचा भाऊ बालाजी पंढरी पेन्दोर (वय 41) रा अनुश्री पार्क हे दोघे सख्खे भाऊ असून या दोघांमध्ये जागेवरून वाद सुरू होता. या वादातून प्रमोदवर अनेकदा हल्ला करण्यात आला. मात्र शेजाऱ्यांनी या वादाला समजूत घालून प्रकरण निवळले. मात्र, आज दुपारी सुरू झालेल्या वादात संशयित आरोपी बालाजी याने प्रमोदवर चाकूने हल्ला चढविला यात बालाजीने प्रमोदच्या गळ्यावर, पोटावर तसेच मानेवर वर्मी घाव घातल्याने अतिरक्तस्त्राव झाला. प्रमोद याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, अतिरक्तस्त्राव झाल्याने डॉक्टरांनी प्रमोद याला मृत घोषित केले. या घटनेची माहिती शहर पोलिस स्टेशनला मिळताच पिंपळगाव येथील अनुश्री पार्क गाठून या प्रकरणातील संशयित आरोपी बालाजी यास ताब्यात घेऊन विचारपूस करण्यात आली. या घटनेची तक्रार वृत्त लिहीपर्यंत दाखल करण्यात आली नव्हती.

---

## राजमाता जिजाऊ पतसंस्थेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि.30:** येथील श्रीरामपूरमधील राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्थेत बुधवारी, दि. 30 एप्रिल रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. ग्रामगिताचार्य गणेश धर्माळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले.

सर्वप्रथम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस ग्रामगिताचार्य गणेश धर्माळे यांनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले. यानंतर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. महादेव गावंडे, संस्थेच्या संचालिका स्मिता धर्माळे, व्यवस्थापक प्रशांत वानखेडे तसेच उपस्थित असलेल्या संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी आदरपूर्वक प्रतिमेचे पूजन केले. या छोटेखानी कार्यक्रमात



पूजनानंतर राष्ट्रवंदना घेण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीता आणि कीर्तनाच्या माध्यमातून समाजात सामाजिक सलोखा, बंधुता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि ग्रामविकासाचे अत्यंत महत्त्वपूर्ण विचार रुजवले. त्यांचे हे कार्य समाजासाठी आजही दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमातून त्यांच्या कार्याला उजाळा मिळाला व त्यांच्या मानवतावादी विचारांचे स्मरण करण्यात आले.

---

## अक्षय तृतीयेच्या दिवशी रोखले 4 बालविवाह

### बाल संरक्षण कक्ष व विविध विभागांची संयुक्त कारवाई, जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशाप्रमाणे विवाह रोखण्यात यश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.30:** अक्षय तृतीयेच्या दिवशी बालविवाह होण्याची शक्यता असल्याने जिल्हाधिकारी विकास मीना यांनी वारंवार वाढावा घेऊन असे विवाह होणार नाहीत, यासाठी सतर्क राहण्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे या दिवशी होऊ घातलेले असे 4 बालविवाह रोखण्यात प्रशासनास यश आले आहे.

अक्षय तृतीयेच्या दिवशी होणारे विवाह थांबविण्यासाठी नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन देखील करण्यात आले होते. या दिवशी होणाऱ्या सर्व लग्नांची माहिती ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका,



नगरपरिषद व इतर कर्मचारी यांच्याद्वारे एकत्रित करण्यात आली होती. त्यानुसार जिल्ह्यात एकूण 152 विवाह होणार असल्याचे आढळले. यापैकी ज्या वर व वधूचे वय कमी आहे, अशा विवाहस्थळी प्रत्यक्ष भेटी देवून कार्यवाही करण्यात आली. पुसद व गोपालनगर येथील वेळेवर होणारे दोन बालविवाह दोन दिवसांपूर्वी थांबविण्यात आले व अक्षय तृतीयेच्या मुहुर्तावरील दोन बाल विवाह थांबविण्यात आले. दिग्रस तालुक्यातील डोळंबा व मारेगाव तालुक्यातील गोंड बुरांडा येथे अल्पवयीन मुलीचा बालविवाहहोत असल्याची माहिती प्राप्त झाली होती. जिल्हा बाल संरक्षण कक्षाने तत्काळबालिकेच्या वयाचा पुरावा मिळविला असता बालिकेचे वय 18 वर्षापेक्षा कमी असल्याचे आढळून आले. त्यामुळे बालविवाह रोखण्यासाठी सर्व यंत्रणा एकत्र येऊन प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली. या कार्यवाहीमध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे संरक्षण अधिकारी माधुरी पावडे, चाइल्ड हेल्पलाइनचे प्रकल्प समन्वयक फाल्गुन पालकर, निरीक्षक गणेश आत्राम, डोळंबवाडीचे सरपंच श्री. पाटील, ग्रामसेवक श्री. हांडे, आर्णी पोलिस स्टेशनचे अरविंद जाधव, श्री. मिश्रा, तहसीलदार उत्तम नाईकवाड, गटविकास अधिकारी भीमराव वानखडे, ठाणेदार संजय सोळंखे, मारेगावचे एकात्मिक बालविकास अधिकारी दीपक कळमकर, जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या कुमारी माधुरी पावडे, मारेगाव पोलिस स्टेशनचे विकी जाधव, जमादार दिगंबर किनाके, पोलिस अंमलदार कपिल जीवने, पोलिस अंमलदार अंकिता वडे, पोलिस पाटील भास्कर पिंपळकर, ग्रामसेवक श्री राशेकर, अंगणवाडी सेविका भारती वासुदेव आत्राम इत्यादींनी बालविवाह प्रतिबंधक कार्यवाही केली. सदर कारवाई जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव, दिग्रसचे तहसीलदार श्री. राऊत, आर्णीचे तहसीलदार वैशाख वाघूरवाघ, बालविकास प्रकल्प अधिकारी श्री. माने, आर्णी पोलिस स्टेशनचे ठाणेदार श्री. नाईक, दिग्रस पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक राहुल वाघ, परिविक्षा अधिकारी रवींद्र गजभिये, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजूरकर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

---

## लोणाडी, सिंदखेड शेत शिवारात वाघाचे दर्शन

### नेर तालुक्यातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण, वन विभागाने गस्त वाढविली

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नेर (परसोपंत), दि. 1 :** तालुक्यातील लोणाडी आणि सिंदखेड गावांच्या शेतशिवारात एकाच वेळी चार वाघ दृष्टीस पडल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. हे शेतशिवार वनविभागाच्या हद्दीला लागून असल्याने वन्यप्राण्यांचा वावर नवीन नसला, तरी चार वाघ एकत्र दिसल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे. वन विभागाने या वृत्ताला दुजोरा दिला असून, परिसरात गस्त वाढवण्यात आली आहे.

लोणाडी आणि सिंदखेड परिसरातील शेतशिवार हे वनविभागाच्या बिट क्रमांक 417 ला लागून आहे. या भागात यापूर्वीही वाघ आणि बिबट्यांचे वास्तव्य असल्याचे, तसेच त्यांच्या पाऊलखुणा आढळून आल्याचे ग्रामस्थ सांगतात. काल सायंकाळच्या सुमारास काही शेतकऱ्यांना शेतात काम करीत असताना हे चार वाघ निदर्शनास आले. यामुळे शेतकऱ्यांसह संपूर्ण पंचक्रोशीत दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी आता सायंकाळनंतर घराबाहेर पडणे किंवा शेतात जाणे टाळले आहे. अनेकजण तालुक्याच्या ठिकाणाहून सायंकाळ होताच घराकडे परतत आहेत. शेतकऱ्यांनी भीतीपोटी रात्रीची शेतीची कामे, विशेषतः सिंचन, पूर्णपणे थांबवली आहेत. वनविभागाने या परिसरात वाघांचा वावर असल्याची पुष्टी केली असून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना म्हणून गस्त वाढविली आहे. तसेच, वनपरिक्षेत्रात हालचालींवर नजर ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरेही बसवण्यात आले आहेत. मात्र, वारंवार होणाऱ्या या प्रकारामुळे आणि संभाव्य धोक्यामुळे, वनक्षेत्राला लागून असलेल्या शेतशिवारांना जाळीचे संरक्षक कुंपण घालून द्यावे, जेणेकरून वन्यप्राणी शेतात किंवा मानवी वस्तीकडे येणार नाहीत, अशी जोरदार मागणी आता शेतकऱ्यांकडून केली जात आहे. प्रशासनाने यावर तातडीने विचार करण्याची गरज आहे.

> **या वनपरीक्षेत्रात वाघाचा वावर आहे. गत दहा वर्षांपासून हा वाघ याच परिसरात भटकंती करीत असतो. वनक्षेत्रात वन्य प्राण्यांकरिता पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे. जवळपास 400 सिमेंट बांध असून पाण्याने भरलेले आहे. या भागात वनरक्षक यांची गस्त असून, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. नागरिकांनी घाबरून न जाता सावधगिरी बाळगावी.**
> **- सुभाष लंबे, वनपरीक्षेत्र अधिकारी**



---

## समाजहिताचे कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करणार

### राम देवसरकर : गो.सी. गावंडे महाविद्यालयात पत्रकार सन्मान सोहळा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि.30:** येत्या वर्षापासून, विदर्भ पातळीवर समाजहितासाठी काम करणाऱ्या पत्रकारांना स्व. डॉ. आत्माराम गावंडे यांच्या स्मरणार्थ पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची घोषणा यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर यांनी केली आहे. समाजातील समस्या आणि चांगल्या गोष्टी समोर आणणाऱ्या पत्रकारांना प्रोत्साहन मिळावे, हा या पुरस्काराचा उद्देश आहे. पुरस्कारामध्ये मानचिन्ह आणि रोख रक्कम असेल.




ही घोषणा स्थानिक गो.सी. गावंडे महाविद्यालयात आयोजित पत्रकार सन्मान सोहळ्यात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे सचिव डॉ. या. मा. राऊत होते. तसेच, व्यासपीठावर विभागीय संचालक (अमरावती) प्रा. डॉ. सुभाष सोनवणे, उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, पोलिस निरीक्षक शंकर पांचाळ, शिक्षणशास्त्र प्रमुख (नाशिक) प्रा. डॉ. दयाराम पवार, आणि प्राचार्य एम. बी. कदम उपस्थित होते. हा कार्यक्रम